1 Lakh sq ft
Premium Furniture & Exclusive Gift Mall.
couchpuffy
Architectural Choice Furniture!
डिम्पलँड, 99300-94691 8585-9552-85

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अकोला, ■ बुधवार १७ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०

पूनम
मोती नगर, अमरावती.
इलेक्ट्रॉनिक्स & सोफा
फक्त ₹1000* भरून उपलब्ध
फायदा हँव थोडं दुर या, जुंन दया नवीन घ्या!!
SAMSUNG Godrej Panasonic ---TRUSTED NAME---



1 Lakh sq ft
Premium Furniture & Exclusive Gift Mall
couchpuffy
Architectural Choice Furniture
99300-94691
8585-9552-85

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

▪ वाशिम ▪ बुधवार १७ सप्टेंबर २०२५ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठे १०

पूनम
मोती नगर, अमरावती.
इलेक्ट्रॉनिक्स & सोफा
फक्त ₹1000* भरून उपलब्ध
SAMSUNG Godrej Panasonic ---TRUSTED NAME---



1 Lakh sq ft
Premium Furniture & Exclusive Gift Mall.
couch puffy
Architectural Choice Furniture
डिम्ज़लँड, खाटगांव रोड, अमरावती
99300-94691
8585-9552-85


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ बुधवार १७ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०


स्वस्त
पूनम
मोती नगर, अमरावती.
इलेक्ट्रॉनिक्स & सोफा
सोफा. बेड. अलमारी. कुलर. टीव्ही
फक्त ₹1000* भरुन उपलब्ध
फायदा हंव थोडं दुर या, जुनं द्या नवीन घ्या !!
SAMSUNG Godrej Panasonic --- TRUSTED NAME ---








# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ बुधवार १७ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०










# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी पर्यंत पूर्ण करा

## -सर्वोच्च न्यायालयाचे राज्य सरकारला निर्देश

**मुंबई/प्रतिनिधीः-**
राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता राज्य सरकारला मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार आता राज्य सरकारला ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र, ही मुदत आता संपत आली असूनही एकाही स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक पार पडली नाही. यासंदर्भात मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने राज्य सरकारला निवडणूक प्रक्रियेतील विलंबाविषयी जाब विचारला. तेव्हा राज्य सरकारने आपली बाजू मांडली असता न्यायालयाने आता राज्य सरकारला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता ३१



जानेवारीपर्यंत राज्य निवडणूक आयोगाला सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेऊन त्यांचा निकालही जाहीर करावा लागेल. या निर्णयामुळे मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यासह रखडलेल्या महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे.


यापूर्वी मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील चार महिन्यांत घ्या, असा महत्त्वपूर्ण आदेश दिला होता. ही मुदत आता संपत आल्याने राज्य सरकारने पुन्हा मुदत वाढवून मागितली होती. यावर सर्वोच्च न्यायालयाने आम्ही दिलेल्या चार महिन्यांच्या मुदतीत निवडणुका का घेतल्या नाहीत, असा जाब राज्य सरकारला विचारला. तसेच आता सप्टेंबर ते डिसेंबर इतका कालावधी तुम्हाला कशासाठी हवा आहे, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली. यावर राज्य सरकारने आपली बाजू मांडताना कर्मचाऱ्यांची कमतरता आणि सणांचे कारण पुढे केले. आमच्याकडे ईव्हीएम यंत्रे ही नोव्हेंबर महिन्यात उपलब्ध होणार आहेत. याशिवाय, सध्या प्रभाग रचनेचे काम सुरु आहे. ही प्रक्रिया मोठी असल्याने ती पूर्ण होण्यासाठी वेळ लागत आहे. त्यामुळे आम्हाला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी राज्य निवडणूक आयोगाने केली होती.

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी मुदत वाढवून मागितली. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जाब विचारला होता. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ पर्यंतची नवी मुदत ठरवून दिली. त्यानुसार आता ठरवलेल्या वेळेत काम संपवा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले.

# काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आज अमरावतीत

### स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी महत्त्वपूर्ण बैठक

### जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांची माहिती



**अमरावती/प्रतिनिधीः-** काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ १७ सप्टेंबर रोजी अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दुपारी एक वाजता काँग्रेस भवन येथे जिल्हा कार्यकारिणीसह ग्रामीण व शहरातील तालुका अध्यक्षांची बैठक घेणार आहेत. याबाबत जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी माहिती दिली.

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका व नगरपरिषद निवडणुका तोंडावर आलेल्या असताना, या निवडणुकांसाठीचे नियोजन आणि संघटनात्मक आखणी करण्याकरिता ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. काँग्रेस पक्ष सज्ज होत असल्याचे संकेत मिळत असून, स्वता: प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या मार्गदर्शनामुळे पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होणार असल्याची अपेक्षा आहे. या बैठकीला जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्यासह खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी आमदार वीरेंद्र जगताप आदीं प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती राहणार आहे. काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीला बळकटी देण्याच्या दृष्टीने ही बैठक निर्णायक मानली जात आहे.

# एकच मिशन एसटी आरक्षण...

## सकल बंजारा समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा

अमरावती/प्रतिनिधीः-
बंजारा समाजाला एसटी संवर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी बंजारा समाज आक्रमक झाला आहे. राज्य भरात आंदोलन सुरु करण्यात आले असून आज मंगळवार १६ सप्टेंबर रोजी शहरात सकल बंजारा समाजाच्या वतीने एसटी संवर्गाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेटनुसार आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तसा जीआर काढण्यात आला आहे.



मराठा समाजाला आरक्षण मिळाल्यानंतर ओबीसी समाज व बंजारा समाजाने आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रामुख्याने बंजारा समाजाने एसटी संवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी राज्यभरात आंदोलन सुरु केले आहे. त्यानुसार शहरात मोर्चा काढण्यात आला.

'एकच मिशन – एसटी आरक्षण' अशा जोशपूर्ण घोषणा देत समाजबांधवांनी आपली ताकद दाखवली. मोर्चात महिला व युवकांचा देखील मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला. हैदराबाद गॅझेट इतर जातींना जसं जाहीर केलं तसं बंजारा समाजाला सुद्धा जाहीर करा व आदिवासींचे आरक्षण आम्हाला मिळावे, अशी मागणी यावेळी बंजारा समाजाने केली. यावेळी समाजातील नेत्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन एसटी आरक्षण तात्काळ लागू करण्याची मागणी केली. अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा दिला. या मोर्चामध्ये हजारोच्या संख्येने बंजारा बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पारंपारिक वेशभूषा मध्ये समाज बंधू सहभागी झाले.

# अमरावती-मुंबई फ्लाईट आता आठवड्यातून चार दिवस

### अलायन्स एअर कंपनीने केला टाइमिंगमध्ये बदल

### -प्रवाशांना होणार सुविधा

**अमरावती/प्रतिनिधीः-**
बहु प्रतिक्षेनंतर अमरावती विमानतळावरून मुंबईसाठी विमान सेवा सुरू करण्यात आली आहे. पूर्वी येथून आठवड्यातून तीन दिवस विमानसेवा सुरू होती, पण आता एअरलाइन्स कंपनीने विमानसेवाच्या टाइमिंग मध्ये परिवर्तन केले आहे तसेच ऑक्टोबर पासून आता आठवड्यातून तीनच्या जागी चार दिवस विमानसेवा उपलब्ध होणार आहे. यामुळे प्रवाशांना सुविधा होईल. माहितीनुसार अमरावती विमानतळावरून आधी आठवड्यातून तीन दिवस फ्लाईट टेकऑफ करत होती. पण ऑक्टोबर पासून चार दिवस टेकऑफ होणार आहे. विशेष म्हणजे कंपनीने फ्लाईटच्या टाइमिंग मध्ये पण परिवर्तन केले आहे. त्यानुसार आता मुंबई ते अमरावती फ्लाईट सकाळी ७.५ वाजता मुंबईवरून निघून सकाळी ८.५० वाजता अमरावती पोहोचणार आहे. येथून ९.१५ वाजता मुंबईसाठी फ्लाईट





उडणार आहे. ही फ्लाईट सकाळी ११ वाजता मुंबईला पोहोचेल. प्रवाशांच्या वाढत्या मागणीनुसार एअरलाइन्स कंपनीने आता एक दिवस अधिक विमानसेवा वाढवली आहे.

शहरातील व्यापारी, नोकरी करणारे आणि शिक्षणासाठी जाणा-या लोकांची संख्या अधिक आहे. त्यासाठी ही विमानसेवा सुविधा जनक आहे. प्रवाशांच्या मागणीनुसार फ्लाईटच्या टाइमिंग मध्ये परिवर्तन करून अतिरिक्त सेवा सुरू करण्यात येत आहे. याचा नक्कीच फायदा होईल असे बोलले जात आहे.

# बिजीलॅंड मार्केटच्या कला निकेतन प्रतिष्ठानमध्ये भीषण आग

## -परिसरात खळबळ, फर्निचरसह कापड जळून खाक

### अग्निशमन विभागाच्या ९ वाहनांची मदत

अमरावती/प्रतिनिधीः-
नागपूर महामार्गावर स्थित बिजीलॅंड व्यापारी संकुलच्या लाईन नंबर ४ मध्ये असणाऱ्या कलानिकेतन प्रतिष्ठानमध्ये आज मंगळवारी १६ सप्टेंबरच्या सकाळी ९.४० वाजता अचानक आग लागली. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. यामध्ये १ कोटीचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दुकानातील फर्निचर सह कापड जळून खाक झाला. अग्निशमन दलाच्या नऊ वाहनाने घटनास्थळावर पोहोचून आगीवर नियंत्रण आणले.

माहिती नुसार बिझीलॅंड मध्ये विकी वरदानी यांचे कलानिकेतन होलसेल रेडिमेट कपड्याचे दुकान आहे. मंगळवारी सकाळी ९.४० वाजता या दुकानात आग लागल्याची माहिती विक्की वरदानी यांनी अग्निशमन





दलाला दिली.

माहिती मिळाल्यावर केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे व पाळी प्रमुख सुनील काकडे यांच्या आदेशानुसार फायर लॉरी क्रमांक एम एच २७ बीएक्स ६९१३ चे चालक नितीन इंगोले आणि कर्मचारी घटनास्थळी तात्काळ रवाना झाले. घटनास्थळावर पोहोचल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले की आग ही भीषण प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे त्यांनी तात्काळ अग्निशमन मुख्यालय नियंत्रण कक्ष येथून मदत मागवली असता एमएच २७ बी एक्स ७२०२ वाहन तसेच जवळच असलेल्या MIDC अग्निशमन केंद्रातील फायर लॉरी क्रमांक एम एच ०७ एजे १७५० व अग्निशमन अधिकारी वाघमारे घटनास्थळी दाखल झाले.

या आगीची दाहकता जास्त असल्यामुळे धुराचे लोट निघत होते. यामुळे कर्मचाऱ्यांना आगीवर नियंत्रण मिळवण्यात मोठी समस्या निर्माण होत होती.स्मोक एक्झॉक्स फॅन व फायर जम्बो टेंडरच्या मदतीने आग आग आटोक्यात आणण्यात आली. परिसरातील व्यापारी भयभीत झाले होते. आजूबाजूला संपूर्ण दुकाने असल्यामुळे बिकट परिस्थिती येथे निर्माण झाली होती.

### चार तासाच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात-

अग्निशमन दलाच्या नऊ वाहनाने चार तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आणली.या घटनेत दुकानातील रिटेल कापडाचे व फर्निचर चे मोठे नुकसान झाले आहे. अंदाजे एक कोटीचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

अग्निशमन यंत्रणा वेळेत पोहोचल्यामुळे बिजलॅंड येथील आजूबाजूच्या दुकानांचे मोठे नुकसान होण्यापासून वाचवण्यात यश आले.आग विजवण्यासाठी अधीक्षक संतोष केंद्रे, वाहन चालक नितीन इंगोले, सागर टपके, विकास इंगळे, कासम खान, राजेश गजबे, गौरव दंदे, हर्षद दहातोंडे, सतीश घाटे, गोविंद घुले. श्याम भोपळे रोशन आलुडे, ईमदाद खान,सुरज लोणारे ,शेहे बाजीदीन,अजय पांधरे ,राजू शेंडे,अतुल कपले,शिरभते, अक्षय देशमुख यांनी अथक प्रयत्न केले.

# कर्जबाजारी तरुणाची आत्महत्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीत कठोरा गावात कर्जबाजारी झाल्यामुळे एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना सोमवारी समोर आली आहे. श्रीकांत अण्णासाहेब काळे (वय ४३,बापूसाहेब कॉलनी, कठोरा ) असे मृतक व्यक्तीचे नाव आहे. माहितीनुसार श्रीकांत काळे यांच्यावर काही लोकांचे कर्ज होते. या कर्जामुळे ते गेल्या दोन वर्षापासून त्रस्त झाले होते. कर्जासाठी त्यांना लोकं तगादा लावत होते. त्यामुळे त्यांनी सोमवारी आपल्या घरात विष प्राशन करून आत्महत्या केली. कुटुंबीयांच्या लक्षात आल्यावर त्यांचे भाऊ प्रशांत काळे यांनी त्यांना डॉ.पंजाबराव देशमुख रुग्णालयात दाखल केले.जेथे उपचारादरम्यान सोमवार रात्री त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणात प्रशांत काळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### बेपत्ता मुलाचा रक्ताने माखलेला

त्याचा काहीही पत्ता लागला नाही.

शेवटी, सोमवारी (१५ सप्टेंबर) ध्रुपचे वडील विजय राठोड यांनी कु-हा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपास सुरू केला असतानाच मंगळवारी दुपारी गावातील नागरिकांना शेततलावात एका मुलाचा संशयास्पद अवस्थेतील मृतदेह दिसून आला. त्यांनी तात्काळ पोलिसांना याची माहिती दिली.

पोलिसांनी डॉग स्क्वॉड, फिंगरप्रिंट एक्सपर्ट आणि फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने घटनास्थळी पंचनामा केला. मृतदेह संशयास्पद व मारहाणीच्या खुणा असलेल्या अवस्थेत आढळला आहे. त्यामुळे ही हत्या असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पोस्टमार्टम अहवाल आल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. दरम्यान, या दुर्दैवी घटनेमुळे राठोड कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे. ध्रुपच्या मृत्यूमागील कारण, तो तलावाजवळ कसा गेला, त्याच्यासोबत नेमके काय घडले याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

### धामण सापाच्या अंड्यातून

सुरक्षितरीत्या भरणीत ठेवले असता त्या धामण जातीच्या सापाने भरणीतच अंडे दिले. यावेळी या अंड्याबाबत अनकवाडी येथील अनुभवी सर्पमित्र शुभम विघे यास माहिती देण्यात आली. त्यानंतर धामण सापाला सुरक्षितरित्या जंगलात सोडून देण्यात आले आणि त्या अंड्याची व्यवस्थित काळजी घेत शुभम विघे याने त्यातुन पिल्लं बाहेर काढण्यासाठी प्रयोग राबविला.विघे याने वनविभागाला माहिती दिल्यावर अंड्याना एका प्लॅस्टिक स्ट्रे मध्ये भुसभुशीत माती व लाकडी भूश्याच्या साहाय्याने सुरक्षित ठेवण्यात आले. त्यासाठी पाहिजे तसे नैसर्गिक वातावरण निर्मित केले. तब्बल ७० दिवसापर्यत अंड्याना त्या वातावरणात ठेवल्यावर त्यातून मोठ्या पिल्लं बाहेर पडली.या सर्व पिल्लांना अलीकडेच तीन दिवसांपूर्वी सुखरूप जंगलात सोडल्यात आले. आजवरच्या कालखंडात सापाच्या अंड्यातील पिल्ल बाहेर काढण्याचा हा तिवसा तालुक्यातील पहिलाच प्रयोग असल्याचे बोलल्या जात आहे.

जेव्हा धामण सापाला सोडले तेव्हा भरणीतील अंडे हस्तगत केले.अंड्यातून पिल्लं बाहेर काढण्यासाठी प्रक्रियेचा पुस्तकातून अभ्यास केला.वनविभागाला याबाबत माहिती देऊन ७० दिवस अंड्याची काळजी घेतली व त्यातून पिल्लं बाहेर काढली.हा जवळपास पहिलाच प्रयोग यशस्वीपणे पार पडला.

**-शुभम विघे सर्पमित्र,अनकवाडी(तिवसा)**

### लोतवाडा रस्त्यासाठी भिमराव

जुलैला दिले होते. त्यानंतर ८ ऑगस्टला दुसरे पत्र दिले. व त्यामध्ये १६ सप्टेंबरला उपोषणाला बसण्याचा इशारा दिला असताना त्या गोष्टीकडे लोकप्रतिनिधी व प्रशासनाने लक्ष दिले नाही. १५ सप्टेंबरपर्यंत शासनाने कुठली कारवाई केली नसल्याने आज (दि. १६) रोजी भिमराव कुऱ्हाडे यांनी रस्त्यावर ट्रॅक्टरमध्ये जलत्याग व आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

### विद्युत अभियंता सोबत

ग्राहकाला समजून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु मुजीब खान यांनी विद्युत अभियंता सोबत अरेरावी व कामात अडथळा निर्माण केला तसेच वीज ग्राहक बाजूच्या घरातून चोरून वीज वापरत असल्याचे सुद्धा निदर्शनास आले होते. त्यावरून अंजनगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला.पुढील तपास अंजनगाव सुर्जी पोलीस करीत आहे.

### टाकरखेडा संभू परिसरात

ज्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

गावातील शेतजमिनीमध्ये पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. तसेच परिसरातील जिल्हा परिषद शाळा व उर्दू शाळा या दोन्ही ठिकाणचे विद्यार्थी देखील पावसाच्या पाण्यात अडकले. अखेर गावकऱ्यांनी मुलांना खांद्यावर उचलून सुरक्षित घरी पोहोचवले.

अचानक झालेल्या या मुसळधार पावसामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाकडून तत्काळ उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

### भाजपा कार्यकर्त्यांकडून निषेध

करून सुरक्षा सुनिश्चित करावी.

यावेळी भाजपा अचलपूर शहर व तालुका शाखेचे प्रामुख्याने कुंदन यादव (शहराध्यक्ष), शंकर मालखेडे (तालुकाध्यक्ष), नयना जोशी (महामंत्री), विशाल काकड (उपाध्यक्ष), रुपेश ढेपे, मामराज वर्मा, शंकर भाषांनी ,सतीश शर्मा, सचिन कडु, प्रवीण मेहरे, रितेश केने, गौरव रघुवंशी, महेश देशमुख, स्वप्नील भोंडे, रोशन घन, आनंद मेहरे, अक्षय पखाले, मयंक शर्मा, श्याम सावरकर, राजु रहमतकार, प्रफुल्ल कुहेकर, सुनील खानझोडे, गजानन शर्मा, अक्षय बुंदेले, निखील करकरे,शैलेश चौरसिया, सनी गौर, महेश कडु, अमर मेघवानी, ग्यानीराम गेहानी, कुलदीप बावरी, अनुप मसराम, अजुन निराटकर, अनील बर्वे, सागर गाळवे, मंगला पारधी, उज्वला माकोडे, अरुणा शहाणे, वंदना येळणे, बबीता महाजन आगरकर, ताई जसवंते, ताई प्रतीक चौधरी, हर्षल चंदेल, मनीष समुंद, आदित्य राणे, पराग सोनवणे, अजय बैस यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

### गांजा तस्करीवर चांदूर रेल्वे

आडे (वय ४०, रा. लालखेड) असे आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मालखेडमार्गे अमरावतीकडे गांजा वाहतूक होणार असल्याचे समजताच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने लालखेड रस्त्यावर देशमुख यांच्या शेताजवळ सापळा रचला. थोड्याच वेळात संशयास्पद हालचाल करणारा एक युवक बॅग घेऊन पायी चालताना पोलिसांना दिसला. झडती घेतल्यावर बॅगेत चार खाकी टेपने गुंडाळलेले ८ किलो गांजा आढळला. त्याच्याकडून एक मोबाईल फोनसह एकूण २ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल पवार, पोलिस निरीक्षक अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रत्यक्ष कारवाईत एपीआय शरद आहेर, नितेश आजडे, रोहित कुडले, नंदलाल लिंगोट, शिवाजी घुगे, प्रवीण मेश्राम, राहुल इंगळे, गजानन वाघमारे, प्रशांत ढोके, संदीप वासनिक, संदीप बडुकेले, स्वप्नील परिहार यांनी मोलाची भूमिका बजावली. तसेच प्रत्यक्ष सापळा कारवाईत मुरमे, प्रकाश बिरोले व चंद्रकांत गाडे यांनी सहभाग घेतला.

### १०० ग्रॅमपेक्षा अधिक

मोठ्या प्रमाणात चरस जप्त केला होता. आतापर्यंत अनेक तस्कर पोलिसांच्या जाळ्यात अडकले असून, पुढे आणखी मोठ्या माफियांचा पर्दाफाश होईल अशी अपेक्षा आहे. यासोबतच अँटीनार्कोटिक्स शाखेत दोन पीएसआय व तीन कर्मचारी नव्याने नेमले गेले असून, नार्कोटिक्स विभागालाही अपडेट करण्यात आले आहे. यामुळे तपास अधिक व्यापक आणि काटेकोर होणार आहे. शहरातील तरुणाईला ड्रग्जच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी पोलिस प्रशासनाची ही मोहिम निर्णायक ठरणार असून, आगामी काळात अमरावतीतील मोठे ड्रग्ज माफिया पोलिसांच्या सापळ्यात अडकण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसत आहेत.

### पलाश लाईन परिसरात ५.५०

दागिने चोरीस गेल्याचे लक्षात आले. चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांमध्ये ७.२९ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी (किंमत ५३,३१६ रु.), आणखी ७ अंगठ्या (किंमत ४९ हजार रु.), ६ लॉकेट (किंमत ४२ हजार रु.), १ चेन (किंमत २४ हजार रु.), लहान मुलांच्या १० अंगठ्या (किंमत ७० हजार रु.), कानातील झुमके (किंमत १० हजार रु.), बाली असे एकूण ३६.२९ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरीला गेले असून त्याची किंमत ५ लाख ५५ हजार ३१६ रुपये इतकी आहे. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. सध्या पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### विजय लोहकरे झाले अंजनगाव

कार्यशैलीतून वेगळी छाप निर्माण केली. नगर परिषद क्षेत्रात अनेक विकासात्मक योजना गतीमान केल्या तसेच नागरिक सुविधांसाठी ठोस पावले उचलली. त्यामुळेच ते स्थानिक नागरिकांमध्ये प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून लोकप्रिय झाले.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, शासनाने त्यांची बदली ही केवळ प्रशासनिक प्रक्रियेअंतर्गत केली असली तरी, ते कुठेही काम करतील तिथे आपल्या कार्यशैली व समर्पणातून नवी ओळख निर्माण करतील.

धारणी व चिखलदरा येथील जनतेपासून आता अंजनगावातील नागरिकही असा विश्वास व्यक्त करीत आहेत की विजय लोहकरे येथे देखील उत्तम कार्य करीत जनतेचा विश्वास संपादन करतील आणि नगर परिषदेच्या विकासात नवी ऊर्जा आणतील

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


# शिव पांदण रस्ते विषयक मोहिमेला शेतक-यांनी प्रतिसाद द्यावा!

## आ. भावना गवळी यांचे शेतकऱ्यांना आवाहन; आजपासून सर्वेक्षणाला प्रारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**महाराष्ट्र शासनाच्या पारदर्शक व लोकाभिमुख कार्यप्रणालीचा भाग म्हणून नकाशावर असणारे व नकाशावर नसणारे अशा दोन्ही प्रकारच्या पांदण रस्त्यांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत महसूल विभागामार्फत ही मोहिम राबविली जाणार आहे. या अंतर्गत पाणंद गाव रस्त्यांचे सविस्तर नकाशे तयार करून नागरिकांना तसेच ग्रामपंचायत व तहसील कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या मोहिमेला जिल्हाभरातील शेतकऱ्यांनी प्रतिसाद द्यावा असे आवाहन आमदार भावना गवळी पाटील यांनी केले आहे.**



प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता मिळावा यासाठी राज्य शासन आग्रही आहे. यासाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना आणली जाणार आहे. या अनुषंगाने सेवा पंधरवडा अभियानाच्या पहिल्या टप्प्यामध्ये १७ ते २२ सप्टेंबरच्या कालावधीमध्ये शिव पांदण रस्त्यांचे सर्व्हेक्षण करणे, ज्या पांदण रस्त्यांची नोंद निस्तार पत्रक / वाजिब उल अर्जामध्ये करण्यात आलेली नाही त्याची नोंद घेण्याबाबत कार्यवाही करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करुन देण्यासाठी संमती पत्र घेणे, रस्ता अदालत आयोजित करुन शेतरस्त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे आदी कामे करण्यात येणार आहेत. सीमांकनासाठी रस्त्यांच्या किनारी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. या मोहिमेत सर्व लोकप्रतिनिधी सहभागी होणार आहेत. प्रत्येक शेताला सुमारे १२ फुटांचे रस्ते उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असे आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी सांगितले आहे.

**प्राथमिक यादीस ग्रामसभेची मान्यता ! :** पहिल्या टप्प्यात पोलिस पाटील, महसूल सेवक व स्थानिक नागरिक यांच्या उपस्थितीत गावनिहाय शिवार फेरी करून पांदण व रस्त्यांची पडताळणी करण्यात येऊन रस्त्यांच्या प्राथमिक यादीस ग्रामसभेची मान्यता घेण्यात येणार आहे. त्यानंतर सर्व पांदण रस्त्यांचे भूमी अभिलेख विभागामार्फत सिमांकन करुन गाव नकाशांवर दर्शविण्यात येणार आहे. पांदण नकाशे प्रत्येक गावांसाठी तयार करून सर्व ग्रामपंचायत कार्यालयात तसेच तहसील कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**अनधिकृत अतिक्रमणांवर नियंत्रण :** या उपक्रमामुळे ग्रामीण रस्त्यांची माहिती पारदर्शकपणे आणि सोप्या पद्धतीने उपलब्ध होईल, तसेच नागरिकांच्या तक्रारींचे निवारण व गैरसमजांना आळा बसेल. विकास आराखड्यांमध्ये अचूक माहितीचा उपयोग होईल, अनधिकृत अतिक्रमणांवर नियंत्रण येईल, ग्रामसंपत्तीचे संरक्षण होणार आहे.

**रस्त्यांना मिळणार विशिष्ट क्रमांक! :** शासन निर्णयान्वये ठरविलेल्या मानक कार्यपद्धतीनुसार टप्प्याटप्पाने रस्त्यांचे कामकाज होणार आहे. त्यानुसार ग्रामस्तरावर रस्त्यांची यादी तयार करणे, अतिक्रमित रस्त्यांबाबत प्रस्ताव तयार करणे, ग्रामसभेत प्राथमिक यादी ठेवणे, भूमी अभिलेख विभागामार्फत सिमांकन, रस्त्याच्या एकत्रित नोंदीची माहिती तयार करणे व रस्त्यांना विशिष्ठ क्रमांक देणे या प्रमाणे कारवाई केली जाणार आहे.

# आपत्तीग्रस्त शेतकरी नुकसानभरपाई पासून वंचीत



### - आपत्ती निवारण विभागात गैरप्रकाराचा आरोप - 'जलसमाधी'चा निवेदनकर्त्यांचा इशारा

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील भुली या गावातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी दोन वर्षांपूर्वी झालेल्या अतिवृष्टी मधून वगळलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी जिल्हास्तरीय चौकशी समिती गठित करावी तथा भरपाईपासून वंचित ठेवणाऱ्या दोषी अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई न झाल्यास जलसमाधी आंदोलन करण्याचा लेखी इशारा तालुका महसूल प्रशासनाला दिला आहे.

भुली येथील अजय नाना पुसांडे, राजेश दयाराम राठोड, खुशाल मधुकर दोनतकर, मिथुन सुनील चव्हाण, देवानंद रामकृष्ण शिंदे, यशवंत विठ्ठल धामणकर आदी शेतकऱ्यांनी तहसीलदार डॉ. संतोष येवलीकर यांना लेखी निवेदन देऊन २२ जुलै २०२३ रोजी भुली परिसरामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे काही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली व असंख्य नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे मंजूर झालेली अनुदानाची रक्कम तालुका आपदा नियंत्रण प्राधिकारी कार्यालयातील काही भ्रष्ट प्रवृत्तीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी न देता या नुकसानग्रस्त शेतकऱ्यावर मोठे अन्याय केल्यामुळे नुकसान भरपाई पासून वंचित शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यासाठी उपोषण, रास्ता रोको आंदोलन सुद्धा केल्याचे निवेदनामध्ये नमूद केले आहे.

आंदोलन केल्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी केलेल्या चौकशीमध्ये केवळ ४८ शेतकऱ्यांना नुकसान ग्रस्त दर्शविल्याचे सांगण्यात आले मात्र प्रत्यक्षात २०९ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत दिल्या गेल्याने यापूर्वी झालेल्या चौकशी अहवालावर वंचित शेतकऱ्यांनी आक्षेप घेतलेला आहे.

भुली येथील आपत्ती ग्रस्त व नुकसान भरपाई पासून वंचित शेतकऱ्यांना भरपाई मिळण्यासाठी आतापर्यंत चार वेळा उपोषण करूनही मदत मिळत नसल्याने आता वंचित शेतकऱ्यांना दोन वर्षांपूर्वीच्या आपदे मधील नुकसान भरपाई मिळण्यासाठी निष्पक्ष जिल्हास्तरीय चौकशी समिती घटित करण्यात यावी व या चौकशी समितीमध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनाही सहभागी करून घेण्यात यावे तथा नुकसानीपासून वंचित ठेवणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची सुद्धा चौकशी करण्यात येण्याची मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे. सातत्याने उपोषणे, आंदोलने करूनही न्याय मिळत नसल्याने २२ सप्टेंबर पासून जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा निवेदनकर्त्यांनी निवेदनामध्ये नमूद केला आहे.

## समृद्धी महामार्गावर विचित्र अपघातामध्ये पाच जखमी

### नागपूर कॉरिडोर वर चैनल क्रमांक १७३ वरील घटना



**कारंजा :** प्राप्त माहिती नुसार दी .१६ सप्टेंबर मंगळवार रोजी सकाळी ४:३० च्या सुमारास चॅनल क्रमांक १७३ नागपूर कॉरिडोर ट्रक क्रमांक ळइ ७२ एऊ ५७६० जालन्यावरून नागपूरकडे जात असताना त्या ट्रकचा टायर पंचर झाल्यामुळे तो स्पीड लिमिट ८० च्या लाईन मध्ये उभा असता ट्रक क्रमांक ँ १९ ० ९३१८ ने मागून जबरदस्त धडक दिली. या अपघातामध्ये तीन व्यक्ती गंभीर झाले. चालक अनिल कुमार पांडे वय २८ रा प्रयागराज शिवेंद्र यादव वय २२ व त्याचा भाऊ शिशेन्द्र यादव २४ त्यामध्ये हे गंभीर जखमी झाले व दुसऱ्या ट्रक मधील जखमींची नावे फैजल खान ,सतीश यादव रा प्रयागराज हे किरकोळ जखमी झाले. पंचर झालेल्या ट्रकच्या मदतीसाठी रोडवर उभा असलेला ट्रक क्रमांक ळइ७० थ्ऊ७२१३ या ट्रक मधील देखील दोन व्यक्ती किरकोळ जखमी झाले. भूषण देव यादव व संतोष कुमार यादव हे किरकोळ जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच. समृद्धी महामार्ग १०८ लोकेशन पायलट अतिश चव्हाण डॉक्टर , भास्कर राठोड हे तात्काळ घटनास्थळी पोहोचून जखमी रुग्णांना कारंजा उपजिल्हा रुग्णालया मध्ये दाखल केले व काही जखमी असलेले पेशंट रुग्णवाहिका १०८ लोकेशन शिवनी द्वारे उपजिल्हा रुग्णालया मध्य दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर केले.

## धानोरा (बु) गावात पाण्याच्या पाईपलाईन प्रकरणातून दोन समाजांमध्ये तणाव

### मारहाणी, जातिवाचक शिविगाळ; १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील धानोरा (बु) गावात रविवारी (दि. १४ सप्टेंबर) सकाळी पाण्याच्या पाईपलाईन कापल्याच्या कारणावरून दोन समाजांमध्ये तीव्र वाद निर्माण झाला. किरकोळ वादाचे रूपांतर थेट मारहाणीपर्यंत झाले असून गावात काही काळ भीतीचे व तणावपूर्ण वातावरण पसरले. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

घटनेचा उगम गावातील जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बॅनरवरून झालेल्या किरकोळ वादातून झाला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी बौद्ध समाजाच्या मोहल्ल्यातील पाईपलाईन कापल्याने पाणीपुरवठा बंद पडला. यावरून नागरिकांमध्ये संताप उसळला. बौद्ध समाजातील नागरिक अर्जुन मोरे यांच्या घरासमोर एकत्र जमले असता कुणबी समाजातील लोकही तेथे दाखल झाले आणि वाद चिघळत गेला. वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन लोखंडी पाईप व लाकडी काठ्यांचा वापर करून परस्परांवर हल्ले करण्यात आले. यात अनेक जण जखमी झाले असून महिलांवरही हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. शिवाय बौद्ध समाजावर जातिवाचक शिविगाळ झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला



आहे.तक्रारदार राजेश महादेव वंजारे (रा. धानोरा बु.) यांच्या फिर्यादीवरून १५ ते १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामध्ये धनंजय उर्फ अनिल भोसले, सौरभ भोयर, नारायण काळे, अतुल माने, हरीष शिंदे, रोहन भोसले, श्याम साळुंके, गणेश भोसले, अर्जुन मुळे यांसह काही महिलांचा समावेश आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमे तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमांतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या गंभीर प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून गावात पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. सध्या परिस्थिती तणावपूर्ण पण नियंत्रणाखाली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## धनादेश अनादरप्रकरणी आरोपीस शिक्षा

**अकोला :** कोरोना काळात घेतलेल्या उसनवारीची परतफेड न केल्यामुळे दाखल झालेल्या धनादेश अनादरप्रकरणात अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. डी. एस. दाभाडे यांच्या न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत शिक्षा सुनावली. मनिष रमेश कटारीया (रा. अकोला) यांनी आर्थिक अडचणीमुळे आपल्या परिचयातील गोवर्धन चंदुमल रोहडा (रा. अकोला) यांच्याकडून रुपये ७५,००० हातउसने घेतले होते. त्याबदल्यात दिलेला धनादेश अनादरीत झाल्याने फिर्यादीने न्यायालयात संक्षिप्त फौजदारी मुकदमा (क्र. २७८/२०२१) दाखल केला होता. आरोपी कटारीया यांना दोषी ठरवत रु. ७५,००० अनादरीत धनादेशाची रक्कम तसेच रु. ५,००० नुकसानभरपाई पोटी ३० दिवसांच्या आत अदा करण्याचे आदेश दिले आहेत. अन्यथा तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा भोगावी लागेल, असेही नमूद केले आहे. या प्रकरणी फिर्यादीतर्फे अधिवक्ता महेंद्र व्यास व अधिवक्ता विरेंद्र व्यास यांनी काम पाहिले.

## धानोरा अत्याचार प्रकरणाने पेटले जनतेचे रोष

### मंगरूळपीर पोलीस ठाण्यावर उमेश हिवराळे यांची आंदोलनाची धग

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मंगरूळपीर तालुक्यातील धानोरा चेहेल गावात बौद्ध समाजावर झालेल्या जातीआधारित अत्याचाराच्या घटनेनंतर संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाला न्याय मिळावा यासाठी आंबेडकरी चळवळीचे नेते उमेश हिवराळे यांनी येत्या १८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता मंगरूळपीर पोलीस ठाण्यावर धडक आंदोलन करण्याची घोषणा केली आहे.

धानोरा चेहेल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बॅनर लावण्यात आला होता. मात्र, तो जातीवाद्यांच्या डोळ्यात खुपल्यामुळे वाद निर्माण झाला. याचदरम्यान ग्रामपंचायतीमार्फत बौद्ध वस्तीत टाकण्यात आलेली पाणीपुरवठ्याची पाईपलाईन



फोडण्यात आली. या प्रश्नावर विचारणा करण्यास गेलेल्या बौद्ध समाजातील महिला-पुरुषांवर जातीवादी गटाकडून हल्ला, शिवीगाळ व मारहाण करण्यात आली. घटनेचे व्हिडिओ पुरावे असतानाही बौद्ध समाजाने ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर उलट त्यांच्यावरच गंभीर व खोटे दरोड्याचे गुन्हे दाखल करण्यात आले.

या प्रकाराला दुहेरी अत्याचार असे संबोधत उमेश हिवराळे यांनी संताप व्यक्त केला. ते म्हणाले, 'प्रथम बौद्ध समाजावर हल्ला करणे आणि त्यानंतर त्याच पीडितांवर खोटे गुन्हे दाखल करणे हा उघड अन्याय आहे. ॲट्रॉसिटी कायद्याला कमकुवत करण्यासाठी जातीवादी दरोड्याचे खोटे गुन्हे वापरत आहेत. हा अन्याय आम्ही थांबविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.' या आंदोलनात तालुक्यातील सर्व आंबेडकरी जनता आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भीमसैनिक नेते विलास दंदे, भीमराव भगत व राहुल तायडे यांनी केले आहे. या आंदोलनामुळे धानोरा चेहेल प्रकरणाचा वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## समता परिषदेचा गुरुवारी नागपूरला ओबीसी मेळावा

**मालेगाव :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचा ता १८ गुरुवार रोजी नागपूरला ओबीसी मेळावा आयोजित करण्यात आला आहे या मेळाव्यास अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगनराव भुजबळ मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन समता परिषदेचे प्रदेश चिटणीस प्रा अरविंद गाभणे यांनी केले आहे. महात्मा फुले समता परिषद, विविध ओबीसी संघटना व बहुजन यांनी मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसी मधून आरक्षण देण्यास तीव्र विरोध केलेला आहे. असे असतांना राज्य शासनाच्या मराठा मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीने, मराठा आंदोलकांच्या दबावात येवून ता २ सप्टेंबर २०२५ ला काळा शासन निर्णय काढून, मराठा जातीला कुणबी प्रमाणपत्रे देण्याचा शासन निर्णय काढून, ओबीसींची फसवणूक केलेली आहे.

## कारंजा मध्ये रक्तदान शिबिरात रचला विक्रम

### २०२ समाजशील दात्यांचे विक्रमी रक्तदान

■ प्रतिनिधी | कारंजा ■

असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हील इंजिनिअर्स अँड आर्किटेक्टस् व कारंजा कंन्स्ट्रक्शन कॉन्ट्रक्टर युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या जयंती व अभियंता दिवसानिमित्त १४ सप्टेंबर रोजी स्थानिक महेश भवन येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिरात तब्बल २०२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांची ही संख्या कारंजा शहराच्या रक्तदान चळवळीच्या इतिहासातील एक विक्रम ठरला असून, त्यामुळे शहराच्या रक्तदान चळवळीमध्ये उत्साह संचारला आहे. शिबिराचे उद्घाटन आमदार



सईताई डहाके यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शिबिराला सुरुवात झाली.

या शिबिरात तब्बल २०२ रक्तदात्यांनी रक्तदान करून राष्ट्रीय कार्यात अनमोल योगदान दिले. एका शिबिरात तब्बल एवढ्या मोठ्या संख्येने रक्तदान होणे ही कारंजा शहराच्या इतिहासातील पहिली वेळ असून, यापूर्वी एका शिबिरात १७३ जणांनी रक्तदान केल्याची नोंद आहे. आजच्या शिबिराने हा विक्रम मोडीत काढला असून, यानिमित्ताने कारंजा रक्तदान चळवळीच्या वतीने आयोजकांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, या शिबिराला माजी नगराध्यक्ष दत्तराज डहाके, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीनचे (एमआईएम) प्रदेश उपाध्यक्ष मो. युसुफ पुंजानी, तहसीलदार कुणाल झाल्टे, विदर्भ कॅन्सर रिलीफ सेंटरचे अध्यक्ष डॉ.शार्दुल डोणगावकर, केमिस्ट अँड ड्रॅगीस्ट असो.चे अध्यक्ष आशिष बंड, गो ग्रीन फाउंडेशनचे पद्माकर मिसाळ, गोरक्षण संस्थेचे सचिव आशिष तांबोळकर, भारतीय स्टेट बँकेचे शाखाधिकारी संग्राम पाटील, शरद व्याख्यान मालाचे अध्यक्ष डॉ.राम गुंजाटे, शीतल देवडा, परमेश्वर व्यवहारे, प्रज्वल गुलालकरी आदींनी भेट देऊन आयोजक व रक्तदात्यांचा उत्साह वाढवला. सूत्रसंचालन सौरभ गुगलीया, आशिष डहाके तर आभार इंजिनिअर असोसिएशनचे अध्यक्ष अजय राऊत यांनी मानले. बडनेरा येथील संत गाडगेबाबा केंद्रातर्फे डॉ. अनिल कवीमंडल आणि त्यांच्या टीमने रक्त संकलित केले.

## जागतिक ओझोन दिनानिमित्त एसएमसी इंग्लिश स्कूल येथे कार्यशाळा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक एस.एम.सी .इंग्लिश स्कूल ,वाशीम येथे मंगळवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय ओझोन दिनानिमित्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला प्राचार्य मिना उबगडे यांनी विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरच्या माध्यमातून विविध स्लाईड द्वारे मार्गदर्शन केले .यावेळी ओझोन वायू बद्दल विद्यार्थ्यांना महत्त्वाची माहिती देण्यात आली .यामध्ये ओझोन वायू सूर्यापासून निघणाऱ्या किरणांपासून होणारे नुकसान थांबविते परंतु क्रोटोकॉल प्रोटोकॉलच्या संदर्भातुसार गेल्या काही दशकांमध्ये प्रदूषणामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे यामध्ये क्लोरीन ,प्रोटीन यांच्यापासून तयार होणाऱ्या क्लोरोफिरो कार्बन्स मुळे ओझोनचा थर दिवसेंदिवस विरळ होत चाललेला आहे त्याचा परिणाम पृथ्वीवरील जीवसृष्टीवर होत आहे .सूर्याच्या किरणांपासून त्वचेचा कर्करोग ,झाडांची वाढ खुंटणे ,निसर्गात झालेली अनियमित्ता ,बदललेले ऋतुचक्र यासह इतर बाबी घडून येतात .ओझोन वायू वाचवायचा असल्यास आपल्या सभोवताली जास्तीत जास्त वृक्षांची लागवड करणे गरजेचे आहे.


**कार्यालय नगर परिषद खामगांव जिल्हा बुलडाणा**

**निविदा सुचना**

बांधकामनअ/३३२/२०२५ दिनांक १५/०९/२०२५

नगरपरिषद खामगांव अंतर्गत खालील नमुद कामासाठी शासनाच्या सार्व. बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील पंजीबध्द कंत्राटदाराकडून निविदा ब - १ प्रपत्रात ऑनलाईन प्रणालीव्दारे मागविण्यात येत आहे.

**(महाराष्ट्र जिल्हा वार्षिक योजना नगरोत्थान २०२५-२६)**

1)2025_DMA_1219007_1 2)2025_DMA_1219007_2 3)2025_DMA_1219007_3
4)2025_DMA_1219007_4 5)2025_DMA_1219007_5 6)2025_DMA_1219007_6
7)2025_DMA_1219007_7 8)2025_DMA_1219007_8 9)2025_DMA_1219007_9
10)2025_DMA_1219007_10 11)2025_DMA_1219007_11 12)2025_DMA_1219007_12
13)2025_DMA_1219007_13 14)2025_DMA_1219007_14 15)2025_DMA_1219007_15
16)2025_DMA_1219007_16 17)2025_DMA_1219007_17 18)2025_DMA_1219007_18
19)2025_DMA_1219007_19 20)2025_DMA_1219007_20

(नगरपरिषद खामगांव मालकीच्या जनुना तलाव येथे जलाशयावर बोटींग व जल क्रिडा सुविधा पुरविणे)

1)2025_DMA_1218699_1

शर्ती व अटी इतर तपशील http: www/mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इतर शर्ती व अटी नगरपरिषदेच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**मुख्याधिकारी**
नगर परिषद, खामगांव


### अखेर 'त्या' ठेकेदारावर गुन्हे दाखल

## ठेकेदाराच्या ढिसाळ कामामुळे अकोट–हिवरखेड–जळगाव जामोद राज्यमार्गावरील वाहतूक पुन्हा ठप्प

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

अकोट–हिवरखेड–जळगाव जामोद या महत्त्वाच्या राज्य मार्गावरील हिवरखेड व खंडाळा फाटा येथील रखडलेल्या पुलांच्या अपूर्ण कामामुळे वाहतूक वारंवार विस्कळीत होत आहे. १६ सप्टेंबर रोजी अपूर्ण बांधकाम आणि पर्यायी पुलाचा भराव वाहून गेल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. या पार्श्वभूमीवर वस्तुनिष्ठ बातम्या प्रकाशित करणाऱ्या पत्रकाराला वारंवार धमक्या देणे, अश्लील शिवीगाळ करणे आणि खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी देणे या गंभीर आरोपांखाली संबंधित ठेकेदार राजेश देशमुख यांच्यावर हिवरखेड पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल झाला आहे.



या पुलांच्या रखडलेल्या कामामुळे आधीच अनेक अपघात झाले असून एका आदिवासी युवकाचा मृत्यूही झाला आहे. याची नोंद पोलीस ठाण्यात आहे. प्रामाणिक वृत्तांकन करणाऱ्या पत्रकाराला ठेकेदाराने प्रत्यक्ष पुलाजवळ तसेच फोनवरून अश्लील भाषेत शिवीगाळ करून गंभीर स्वरूपाच्या धमक्या दिल्या होत्या. त्यामुळे हिवरखेडमधील पत्रकार बांधवांनी ठेकेदाराविरोधात जोरदार निषेध नोंदवून संरक्षण कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी केली होती.

**पुलाचे काम दुसऱ्या कंत्राटदाराकडे द्यावे :** सदर ठेकेदाराला निर्धारित मुदतीत पुलाचे काम पूर्ण करता आले नाही. मुदतवाढ दिल्यानंतरही काम रखडले. सार्वजनिक बांधकाम विभागाने फक्त प्रतीदिवस ५०० रुपये दंड आकारण्याचा प्रस्ताव मांडल्यामुळे ठेकेदाराला उघड पाठबळ मिळत असल्याचा आरोप प्रवासी व ग्रामस्थांनी केला आहे. प्रत्येकी जवळपास दोन कोटी खर्चाच्या या पुलांच्या कामात ढिसाळ कारभार झाल्याने त्रस्त नागरिक आता हे काम सक्षम व अनुभवी दुसऱ्या कंत्राटदाराला युद्धपातळीवर देण्यात यावे, अशी मागणी करत आहेत.

**पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत कारवाईची मागणी :** पत्रकाराला दिलेल्या धमक्यांच्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असला तरी, ही कारवाई पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गतच व्हावी अशी पत्रकार बांधवांची एकमुखी भूमिका आहे. या संदर्भातील निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही सादर करण्यात येणार आहेत.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक २९० ■ बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर महिलांना न्याय मिळणार- रुपाली चाकणकर

### -महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांतर्गत वर्ध्यात जनसुनावणी

- ७६ तक्रारींची नोंद
- दोन जोडप्यांचा संसार वाचला



**वर्धा जनमाध्यम :** कायदा, सुरक्षा व प्रशासन हे प्रत्येक नागरिकांसाठी असले तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी महत्त्वाची आहे. महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमातून अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या महिलांना खऱ्या अर्थाने दिलासा मिळेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी केले.

राज्य महिला आयोगाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जनसुनावणीत महिलांच्या तक्रारी ऐकून घेऊन त्यांचे निवारण करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुराग जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ. पद्मश्री बैनाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

**महिलांसाठी मोठा दिलासा**

रुपाली चाकणकर म्हणाल्या, 'मुंबईत तक्रार करण्यासाठी जाणे सर्वसामान्य महिलांना शक्य होत नाही. यासाठीच जिल्हास्तरावर जनसुनावणी घेण्यात येत असून या उपक्रमामुळे महिलांचा वेळ व खर्च वाचणार आहे. त्याचबरोबर जागेवरच न्याय मिळवून देऊन अन्याय व अत्याचाराविरुद्ध महिलांना मदत होणार आहे.'

**चार पॅनलसमोर तक्रारी**

तक्रारींच्या निवारणासाठी चार पॅनल स्थापन करण्यात आली होती. यात न्यायिक अधिकारी, पोलीस अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी तसेच समुपदेशकांचा सहभाग होता. आलेल्या महिलांना नोंदणी करून टोकन दिले गेले व त्यानंतर संबंधित पॅनलसमोर त्यांनी आपली मांडणी केली.

या सुनावणीत तटातूट होऊ पाहणाऱ्या दोन जोडप्यांचा संसार समुपदेशनाद्वारे सावरला गेला. यावेळी चाकणकर यांनी त्यांना पुष्प देऊन पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

**महिलांनी निर्भयपणे पुढे यावे**

जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी, जिल्हा प्रशासन महिलांच्या तक्रारी सोडवण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले. महिलांनी कुठलीही भीती न बाळगता आपले हक्कासाठी पुढे आले पाहिजे, असे त्यांनी आवाहन केले. तर मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी समुपदेशनामुळे अनेक वाद सामोपचाराने सुटल्याचे नमूद केले.

न्याय मिळवून देणारा स्तुत्य उपक्रम महिला आयोग आपल्या दारी हा उपक्रम महिलांना प्रत्यक्ष न्याय मिळवून देणारा ठरत असून त्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे उपस्थित मान्यवरांनी मत व्यक्त केले.

**तक्रारींचा तपशील**

- एकूण तक्रारी : ७६
- वैवाहिक व कौटुंबिक : ६६
- सामाजिक : २
- आर्थिक व मालमत्ता विषयक : ५
- कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ : १
- इतर : २

## बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी कोचिंग योजना देण्याची मागणी

### -गरीब कामगारांच्या पोटी जन्मलो, म्हणून स्वप्नं अपुरी राहू नयेत : अग्निहोत्री

**वर्धा जनमाध्यम :** बांधकाम कामगारांच्या मुलांना दरवाजे बंद करणाऱ्या महागड्या कोचिंग क्लासेस विरोधात स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी थेट सरकारला इशारा दिला आहे. 'नोंदणीकृत बांधकाम मजुरांच्या मुलांसाठी स्पर्धा परीक्षा आणि व्यावसायिक प्रवेश परीक्षा कोचिंग सहाय्य योजना तातडीने सुरू करा, अन्यथा हजारो मुलांचे भविष्य अंधारात ढकलले जाईल, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कामगारमंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे केली.

**सध्याची स्थिती**

मंडळामार्फत शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्य व खर्च भरपाई



मिळते, पण MPSC, UPSC, NEET, JEE सारख्या मोठ्या स्पर्धा परीक्षांसाठी कोणतेही सहाय्य उपलब्ध नाही. महागड्या क्लासेसना परवडत नसल्याने कामगारांची मुले स्पर्धेत मागे राहतात.एम पी एस सी /यु पी एस सी परीक्षांसाठी दरवर्षी ? ७५.००० पर्यंत मदत तसेच नीट / जेईई साठी दरवर्षी ? ९०.००० पर्यंत सहाय्य फी थेट मान्यताप्राप्त संस्थांना अदा होणार पात्रता : नोंदणीकृत मजुरांची मुले, आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेले विद्यार्थी

**सामाजिक परिणाम**

या योजनेमुळे गरीब व वंचित कुटुंबांना न्याय्य संधी मिळेल. बांधकाम कामगारांची मुले सरकारी सेवा, वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रात झेप घेऊ शकतील.

उमेश अग्निहोत्री म्हणाले, 'कामगारांची लेकरं ही महाराष्ट्राची ताकद आहेत. त्यांना दर्जेदार शिक्षणापासून वंचित ठेवणे हा सामाजिक अपराध आहे. सरकारने त्वरित योजना राबवली नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून लढू.

## झाडाला धरून पत्नीचा बचाव; पती पुराच्या प्रवाहात वाहून बेपत्ता

**आष्टी जनमाध्यम :** तालुक्यातील आनंदवाडी परिसरात सोमवारी सायंकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे नाल्याला आलेल्या अचानक पुरात मध्यप्रदेशातील रहिवासी जगनलाल उईके (वय ६०) हे वाहून बेपत्ता झाले. त्यांच्या पत्नीला झाडाचा आधार मिळाल्याने थोडक्यात जीव वाचला. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उईके दाम्पत्य आठवडी बाजाराहून गावाकडे परतत होते. मुसळधार पावसामुळे नाला भरून वाहत असतानाच दोघेही पुराच्या पाण्यात अडकले. क्षणभरात वाहत्या पाण्याने त्यांना आपल्याबरोबर वाहवत नेले. त्यावेळी महिलेच्या हाती झाड आल्याने ती कसाबसा बचावली. मात्र, तिच्या डोळ्यांसमोरच पती जगनलाल वाहून गेल्याने ती हतबल झाली.

संपूर्ण रात्र ती नाल्याच्या काठावरच थांबलेली होती. सकाळी ग्रामस्थांना याची माहिती मिळताच त्यांनी प्रशासनाशी संपर्क साधला. तत्काल ठाणेदार मंगेश भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक खंडार व त्यांच्या सहकाऱ्यांनी शोधमोहीम सुरू केली. गेल्या ४८ तासांपासून मोहीम सुरू असली तरी अद्याप उईके यांचा मागोवा लागलेला नाही.

## कुख्यात गुंड बबलू पोलिसांच्या जाळ्यात

### इतवारा भागात हातकड्या ठोकून पायी नेले, नागरिकांचा पोलिसांना सलाम

**वर्धा जनमाध्यम :** विविध गंभीर गुन्ह्यांत सहभागी असलेला कुख्यात गुंड बबलू उर्फ अयाज रफिक शेख (४२) अखेर रामनगर पोलिसांच्या जाळ्यात अडकला. बराच काळ पोलिसांना गुंगारा देणाऱ्या या गुंडाला खडसे ले-आऊट परिसरातून तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे ताब्यात घेण्यात आले.



रामनगर पोलिस ठाण्यातील तरुणावर झालेल्या हल्ल्याच्या प्रकरणातील हा मुख्य आरोपी होता. या गुन्ह्यात इतर काही आरोपी आधीच ताब्यात होते, मात्र बबलू फरार होता. अखेर पोलिस उपनिरीक्षक दिनेश कांबळे, राय व त्यांच्या पथकाने सोमवारी सायंकाळी मोठी कारवाई करत बबलूला पकडले.

चौकशीदरम्यान त्याने इतवारा परिसरात काही कपडे व साहित्य लपवल्याचे कबूल केले. ते जप्त करण्यासाठी पोलिसांनी त्याला घटनास्थळी नेले. रस्ता अरुंद असल्याने पोलिसांचे वाहन आत नेणे शक्य झाले नाही. त्यामुळे हातकड्या घातलेल्या अवस्थेत बबलूला पोलिसांनी पायी काही अंतर चालवत नेले. त्याची एकेकाळी दहशत असलेल्या परिसरात पोलिसांच्या ताब्यात तो अशा स्वरूपात पायी चालताना दिसल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. या धाडसी कामगिरीबद्दल स्थानिक नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले.

## सेवाग्राम रुग्णालयातून महिलेस अटक

### -जीएस फायनान्स कंपनीच्या फसवणूक प्रकरणात कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** तब्बल ४१ लाख रुपयांच्या फसवणुकीत फरार असलेल्या स्वाती मगर (३१, रा. नागपूर) हिला शहर पोलिसांनी मंगळवारी (१६ सप्टेंबर) सेवाग्राम येथील रुग्णालयातून अटक केली. तिच्यासह पती गजानन सातव आणि सहकारी कमलेश धोटे यांनी जीएस फायनान्स कंपनीच्या माध्यमातून शंभराहून अधिक लोकांना कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली फसवले होते.

नागपूर मार्गावरील शाळेच्या परिसरात त्यांनी कार्यालय सुरू केले. विविध बँकांशी संपर्क साधून कर्ज प्रकरणे तयार झाली. मात्र, कर्जाची रक्कम स्वतःकडे घेऊन ठराविक वेळेनंतर परत देण्याचे आश्वासन देण्यात आले. पैसे न दिल्याने पीडितांनी तक्रारी दाखल केल्या.

१० एप्रिल २०२४ रोजी



तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. जून महिन्यात कमलेश धोटे अटकेत गेला होता. मात्र, सातव व मगर हे दोघे वारंवार ठिकाण बदलून पोलिसांना चकमा देत होते. स्वाती मगर हिची आई सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार घेत असल्याने तिला भेटण्यासाठी ती येथे पोहोचली. याची माहिती मिळताच शहर पोलिसांनी सापळा रचून तिला अटक केली.

ही कारवाई पोलिस अधिकारी संतोष टाले, प्रमोद रासेकर यांच्या मार्गदर्शनाखाली इम्रान खिलची, विजय खाडे व नम्रता यांनी केली.

## पायदळ दर्शनासाठी समुद्रपूरहून युवक डोंगरगडला रवाना

**समुद्रपूर जनमाध्यम** – नवरात्री पूर्वसंध्येला समुद्रपूरातील नवयुवक भक्तांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी डोंगरगड (छत्तीसगड) येथील माँ बमलेश्वरी माताच्या दर्शनासाठी पायदळ यात्रेला प्रारंभ केला. मागील सलग अकरा वर्षांपासून ही धार्मिक परंपरा सुरू असून दररोज तब्बल ४५ कि.मी. अंतर पार करीत युवक नवरात्रीच्या पहिल्या दिवशी देवीचे दर्शन घेतात.



मंगळवार, दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी संत गजानन महाराज तसेच दुर्गामाता देवस्थानात विधीवत पूजा-अर्चना करून ढोल-ताशांच्या गजरात यात्रेला प्रस्थान झाले. निखिल मानकर, दीपक गिरोले, कैलास मानकर, नितेश कोल्हे, विशाल चौधरी, शशिकांत वझे, साहिल देवतळे यांच्यासह अनेक युवक भक्त या यात्रेत सहभागी झाले आहेत.

प्रत्येक टप्प्यावर 'मातेचा जयजयकार' करत पायपीट करणारे हे भक्त नवरात्रीच्या प्रथम दिवशी घट स्थापनेच्या वेळीच माँ बमलेश्वरीचे दर्शन घेतील व त्यानंतर परतीच्या यात्रेला प्रारंभ करणार आहेत. समुद्रपूरमधील नागरिकांनी या पवित्र यात्रेच्या यशस्वितेसाठी मातेशी प्रार्थना केली.

## स्काऊट गाईड चळवळीतून आदर्श नागरिक घडतात-डॉ.गजभिये

### -सात दिवसीय स्काऊट मास्टर गाईड कॅप्टन प्राथमिक प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

**वर्धा जनमाध्यम :** 'शालेय जीवनापासून चांगल्या सवयी, स्वयंस्फूर्थ शिस्त, देशप्रेम, साहस, हस्तकला व दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती मुला-मुलींमध्ये निर्माण होणे काळाची गरज आहे. या दृष्टिकोनातून भारत स्काऊट गाईड चे प्रशिक्षण व उपक्रम प्रशंसनीय आहे. म्हणजेच स्काऊट गाईड चळवळीतून आदर्श नागरिक घडतात, असे प्रतिपादन स्काऊट गाईडचे जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ महेंद्र गजभिये यांनी वर्धा जिल्हा स्काऊट गाईड प्रशिक्षण केंद्र येथे स्काऊट मास्टर व गाईड कॅप्टन यांच्या प्राथमिक प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी १६ सप्टेंबर रोजी केले.



स्काऊट मास्टर व गाईड कॅप्टन प्राथमिक शिबिर हे १५ ते २१ सप्टेंबर दरम्यान आयोजित असून यात २६ शिक्षक स्काऊट मास्टर म्हणून तर ४३ शिक्षिका गाईड कॅप्टन म्हणून सात दिवसीय प्रशिक्षण घेत आहे.

सदर शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा मुख्य आयुक्त डॉ महेंद्र गजभिये तर प्रमुख अतिथी म्हणून वर्धा डायटचे ज्येष्ठ अधिष्ठाता संजय नवले, रोव्हरचे जिल्हा आयुक्त कॅप्टन मोहन गुजरकर, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त किरण जंगले, गाईडच्या जिल्हा प्रशिक्षण आयुक्त उर्मिला चौधरी, स्काऊट मास्टर प्राथमिक प्रशिक्षण शिबिराचे शिबिर प्रमुख तथा जिल्हा संघटक नितेश झाडे, गाईड कॅप्टन प्राथमिक प्रशिक्षण शिबिराच्या शिबिर प्रमुख तथा जिल्हा संघटक वैशाली घोम, राजहंस जंगले, दीपक गुढेकर, रेणुका भोयर व जयश्री थूल उपस्थित होते.आपल्या भाषणात अतिथी म्हणून बोलताना संजय नवले म्हणाले नाविन्यपूर्ण उपक्रमातून शिक्षण देणे आजच्या काळाची गरज आहे आणि या दृष्टिकोनातून स्काऊट गाईडचे शिक्षण प्रशंसनीय आहे. जिल्हा संघटक नितेश झाडे म्हणाले प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षित अध्यापक त्यांच्या शाळेत स्काऊट गाईडची चळवळ सक्रिय करणार आहे.

शिबिराच्या यशस्वी ते करिता प्रियंका ठोसर, हेमलता वाढिले, राजेश जयस्वाल व सुषमा कार्लेकर अथक प्रयत्न करीत आहेत.

## डेंगूच्या वाढत्या प्रादुर्भावावर नियंत्रण ठेवण्यासाठी भाजपाचे निवेदन

**देवळी जनमाध्यम** –देवळी शहरात दिवसेंदिवस डेंगू रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रुग्णालयांमध्ये गर्दी वाढली असून अतिपावसामुळे शहरातील नाले व मोकळ्या जागेतील डबक्यात मोठ्या प्रमाणात मच्छरांची उत्पत्ती होत असल्याने डेंगूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी देवळी शहर व युवा मोर्चाच्या वतीने नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात शहरातील प्रत्येक प्रभागात आठवड्यातून किमान दोन वेळा नियमितपणे फवारणी करून डेंगू तसेच इतर साथीच्या रोगांवर नियंत्रण आणण्याची मागणी करण्यात आली आहे.

भाजप पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षितता लक्षात घेऊन नगर परिषदेकडून तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे, अन्यथा परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते.



या निवेदनावेळी डॉ. नरेंद्र मदनकरमानी (उपाध्यक्ष), राहुल चोपडा, योगेश आदमने, संजय मुजबैले, कवीश सुरकार, स्वप्नील बुट्टे, अनिल क्षीरसागर, शुभम तर्हेकर, विनोद भगत, शरदराव आदमने, दिवाकरराव झाडे, वसंता धोटे, आयुष आंबटकर, विनोद राठोड आदी भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

### आरोपी ड्रोन सर्चमधून अटक

## तलावकाठच्या हत्येचे गूढ उकलले; सावंगी पोलिसांची कारवाई

**वर्धा जनमाध्यम:**सालोड हिरापूर गावाजवळ तलावाच्या काठावर झालेल्या हत्या प्रकरणातील फरार आरोपींना पोलिसांनी अवघ्या तीन दिवसांत गजाआड केले. विशेष म्हणजे आरोपींच्या शोधासाठी पोलिसांनी जंगल परिसरात ड्रोनचा वापर करीत दिवस-रात्र मोहीम राबवली होती.



शनिवारी (दि.१३) विशाल उर्फ ब्लेड विठ्ठल उजवणे (रा. सालोड हिरापूर) याचा गळा आवळून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात त्याचे सोबती बॉबी दिलीप महेशगौरी (२५) व विजय देवरावजी मसराम (१९, दोघेही रा. सालोड हिरापूर) यांच्यावर संशय घेण्यात आला होता. मात्र, गुन्ह्यानंतर दोघेही फरार झाले होते. पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन पथकांनी आरोपींचा शेतशिवार, जंगल, गाव परिसरात शोध घेतला. आरोपी सतत ठिकाण बदलत असल्याने अडचणी येत होत्या. अखेर मंगळवार दि.१६ सप्टेंबर रोजी आरोपी पडेगाव शिवारात दिसून आले. त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न होताच ते पळाले. मात्र पोलिसांनी पाठलाग करून दोघांना पकडले. चौकशीत त्यांनी हत्या केल्याची कबुली दिली.ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, सपोनि. पंकज वाघोडे यांच्यासह पथकाने केली.

## चहा बनवण्यास नकार, विकृताचा विनयभंग

### -तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

**वर्धा जनमाध्यम :** सातव्या वर्गातील १२ वर्षीय मुलीने चहा बनवण्यास नकार दिल्याचा राग आल्याने एका विकृताने तिचा विनयभंग केला. या धक्कादायक प्रकारानंतर न्यायालयाने आरोपीस तीन वर्षांचा सश्रम कारावास आणि दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

१ डिसेंबर २०१८ रोजी कारंजा तालुक्यातील पीडित मुलगी शाळा सुटल्यावर घरी आली होती. आईवडील शेतात, तर लहान बहीण अंगणात खेळत असताना



आरोपी गोपाल उर्फ गोपीचंद श्रीरामजी डोंगरे (४८) हा घरी शिरला. चहा बनवण्यास सांगितले असता मुलीने नकार दिला. त्या रागातून आरोपीने पलंगावर विसावलेल्या मुलीकडे जाऊन अश्लील चाळे करीत विनयभंग केला. पीडितेच्या आरडाओरड्या नंतर तिची लहान बहीण धावत आली. त्यावेळी आरोपीने दहा रुपये देत 'चॉकलेट घेऊन ये' असे सांगून पळ काढला. घडलेला प्रकार पीडितेने आईला सांगताच कुटुंबीयांनी आरोपीचा जाब विचारला, मात्र त्याने वाद घातला. पुढे १५ फेब्रुवारी २०१९ रोजीही आरोपीने मुलीशी अश्लील वर्तन केले. कारंजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शासकीय अभियोक्ता विनय घुडे यांनी सहा साक्षीदारांची साक्ष नोंदवून आरोपीविरुद्ध ठोस पुरावे मांडले. अखेर अतिरिक्त विशेष जिल्हा न्यायाधीश (३) वर्धा एस.एन. मेनजोगे यांनी आरोपीला दोषी ठरवत तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

## शेजारी राहणाऱ्या निष्पाप चिमुरडीवर अत्याचार; नराधमास २० वर्षांचा सश्रम कारावास

**वर्धा जनमाध्यम :** शेजारी राहणाऱ्या सहा वर्षीय निष्पाप चिमुरडीचा विनयभंग करण्याचे पाशवी कृत्य एका नराधमाने केले. मात्र पोलिसांच्या तपासानंतर न्यायालयाने या नराधमास २० वर्षांचा सश्रम कारावास ठोठावत समाजाला दिलासा दिला आहे. ६ ऑक्टोबर २०२२ रोजी सावंगी मेघे येथील पोटदुखे लेआउटमध्ये धक्कादायक प्रकार घडला. सहा वर्षांची चिमुकली घराबाहेर निरागसपणे खेळत असताना शेजारचाच सुशील गुलाबराव सरदार (वय ४२) याने तिला आपल्या घरात ओढले आणि तिचा विनयभंग केला. आवाज काढू नये म्हणून मारहाण करून जीवघेणी धमकी देण्याचे धाडसही या नराधमाने केले.

मुलगी घरी न आल्याने आईने शोध सुरू केला. आरोपीच्या घराचे दार ठोठावले असता आतून पीडित मुलीनेच दरवाजा उघडला आणि आईला पाहताच नराधम पळून गेला. पीडितेने आईला सत्य सांगितले. त्यानंतर पालकांनी आरोपीला जाब विचारला असता त्याने त्यांनाही धमकावले. अखेर पोलिसांत तक्रार दाखल झाली.

उपनिरीक्षक अनुराधा फुकट यांच्या तपासातून प्रकरण न्यायालयात गेले. सरकार पक्षाने ९ साक्षीदारांच्या जबाबांद्वारे आरोपीचे अपराध सिद्ध केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा न्यायाधीश-३ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.एम. मेनजोगे यांनी आरोपीस २० वर्ष सश्रम कारावास आणि दंडाची शिक्षा ठोठावली.

हा निकाल म्हणजे अल्पवयीन बालिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि समाजातील नराधमांना धडा शिकवणारा ठरला आहे.

# युतीच्या चर्चेत राज ठाकरेंचे पारडे जड

## उद्धव 'दादू' बॅकफूटवर जाण्याची चिन्हे, तो मुद्दा ठरणार गेमचेंजर



**मुंबई :** आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची युती निश्चित मानली जात आहे. मात्र या युतीमध्ये राज ठाकरे यांचे पारडे जड असल्याचे बोलले जात आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेची अवस्था सध्या नाजूक आहे. २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे शिवसेनेत फूट पडल्यानंतर ठाकरे गट दिवसेंदिवस खिळखिळा होताना दिसतो. गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीतही ठाकरेंना केवळ २० जागा मिळाल्या. गेल्या तीन वर्षात अनेक बडे नेते, माजी मंत्री-आमदार यांच्यापासून माजी नगरसेवक आणि कार्यकर्त्यांनीही उद्धव ठाकरेंची साथ सोडल्यामुळे मराठी मतांसाठी त्यांना राज ठाकरेंच्या मदतीची गरज आहे, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेने जवळपास तीन दशकं मुंबई महानगरपालिकेवर निर्विवाद वर्चस्व राखलं होतं. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत भाजप शिवसेनेच्या अगदी जवळ पोहोचली, त्यामुळे शिवसेनेचं वर्चस्व एकहाती नसल्याचं दिसून आलं. त्यावेळी राज्यात युती असतानाही भाजपने विरोधी बाकावर बसून शिवसेनेला महापालिकेचा कारभार हाती घेऊ दिला. परंतु शिवसेनेला अनेक मुद्द्यांवर घेरण्याचाही प्रयत्न केला. उद्धव ठाकरे हे आशियातील सर्वात श्रीमंत अशा मुंबई महापालिकेला 'दुभती गाय' किंवा 'सोन्याचं अंडं देणारी कोंबडी' मानतात, असा आरोपाही विरोधकांनी केला होता.



## महाराष्ट्रातील पायाभूत प्रकल्पांबाबत यापुढे...
## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठ महत्त्वाचे निर्णय

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठ मोठे निर्णय घेण्यात आले. मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निर्वाह भत्त्यात वाढ करण्यात आली आहे. तर भंडारा ते गडचिरोली दरम्यान ९४ किलोमीटरचा द्रुतगती महामार्ग बांधण्यात येणार आहे.

मंत्रिमंडळाचे आठ निर्णय

(उद्योग विभाग) महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी धोरण २०२५ जाहीर. सन २०५० पर्यंतचे नियोजन. सुमारे ३ हजार २६८ कोटी रुपयांचा आराखडा.




(वस्त्रोद्योग विभाग)

अकोला येथील दि निळकंठ सहकारी सूतगिरणीला 'खास बाब' म्हणून शासन अर्थसहाय मिळणार. अर्थसहाय्याच्या ५:४५:५० या गुणोत्तरानुसार निवड

(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य) मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निर्वाह भत्ता तसेच विद्यार्थीनीसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीने वाढ. हजारो विद्यार्थ्यी- विद्यार्थिनींना दिलासा

(सहकार व पणन विभाग)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस पुढील दोन वर्षांसाठी मुदतवाढ. राज्यभरात ११६ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी, व अस्तित्वातील भवनांच्या दुरूस्तीसाठी असा एकूण १३२ कोटी ४८ लाखांचा खर्च

## महाराजांचे नाव घेता अन् बळीराजाकडे ढुंकूनही पाहत नाही- शरद पवार

**नाशिक:** कांद्याला भाव नाही. शेतकऱ्यांचा संसार अडचणीत आहे. त्यामुळे केवळ होर्डिंग लावून नव्हे, शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या. देवाभाऊ, शिवाजी महाराजांच्या काळात दुष्काळ पडला होता, त्या वेळी त्यांनी सोन्याची नाणी दिल्याने शेतकरी शेती करू शकले. आज तुम्ही शिवाजी महाराजांचं नाव घेत आहात आणि बळीराजाकडे ढुंकून पाहत नाही, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर हल्लाबोल केला.



आगामी ठराविक दिवसांत तुम्ही मदत केली नाही तर नाशिकचा हा मोर्चा भविष्यात आणखी उग्र रूप घेईल. 'देवाभाऊ, देशाच्या आजूबाजूला बघा काय घडत आहे. नेपाळमधे सरकार गेलं आणि भगिनीच्या हातात राज्य आले आहे. आणखी काही मी बोलणार नाही,' असा इशाराही पवारांनी या वेळी दिला. शेतकरी कर्जमाफी, पिकाला हमीभाव, ओला दुष्काळ घोषित करण्यासह विविध प्रश्नांबाबत पवारांच्या उपस्थितीत नाशिकमध्ये सोमवारी (दि. १५) बळीराजाचा आक्रोश मोर्चा आयोजित करण्यात आला होता. मोर्चाला मार्गदर्शन करताना पवारांनी देवेंद्र फडणवीस यांचे थेट नाव न घेता, त्यांच्यावर हल्लाबोल केला.

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देऊन सातबारा कोरा करा, या प्रमुख मागणीसह राज्यातील विविध प्रश्नांबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातर्फे सोमवारी (दि.१५) शेतकरी आक्रोश मोर्चा काढून महायुती सरकारविरोधात एल्गार पुकारला.

## लाडकी बहीण योजनेत अपात्र, तरी लाभ घेतला



**छत्रपती संभाजीनगर :** लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाच माहिती समोर आली आहे. राज्यातील केवळ पात्र महिलांनाच या सरकारी योजनेचा लाभ घेता येणार आहे. मात्र तरीही पात्र नसलेल्या अनेक महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचं अनेकदा समोर आलं आहे. आता पुन्हा एकदा मराठवाड्यातून याबाबत अपात्र महिलांची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. तब्बल १ लाख २५ हजार महिलांनी अपात्र असतानाही लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला. आता या सव्वा लाख महिलांना योजनेतून वगळण्याचे, त्यांचा लाभ थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मराठवाड्यातील ८ जिल्ह्यातील मिळून ६५ वर्षांवरील १ लाख ३३ हजार लाडक्या बहिणींचे अर्ज तपासण्यात आले. यापैकी ४० हजार महिलांचे अर्ज अपात्र करण्याचं सांगण्यात आलं आहे. या ६५ वर्षांवरील महिलांनी खोटे अर्ज देत, खोटी कागदपत्र तयार करुन अपात्र असूनही लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला. त्याशिवाय २१ वर्षांखालील महिलांनीही या योजनेचा लाभ घेतल्याचे या सर्व्हेतून समोर आलें आहे.

## पेट्रोलमध्ये इथेनॉलप्रमाणे डिझेलमध्ये आयसोब्युटेनॉल मिसळणार- गडकरी

**नागपूर:** ज्या लोकांनी डिझेल गाड्या घेतल्या आहेत ते जादा पैसे मोजून गाड्या घेतल्या तरी खूश आहेत. परंतु, त्यांच्यासाठी एक महत्वाची अपडेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. आता पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळले जाते, तसेच डिझेलमध्ये आयसोब्युटेनॉल मिसळण्याबाबत गडकरी यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.

पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी सध्या समाजमाध्यमांमध्ये ट्रोल होत आहे. त्यावर गडकरी यांनी बऱ्याचदा खुलासा केला आहे. सर्वोच्च न्यायालयानेही याबाबतची याचिका फेटाळली आहे. दरम्यान गडकरी यांनी डिझेलमध्ये आयसोब्युटेनॉल मिसळण्याबाबत सांगितले की, सरकार डिझेलमध्ये



आयसोब्युटेनॉल मिसळण्याच्या प्रक्रियेवर काम करत आहे. ते इथेनॉलपासूनच बनते. हे डिझेलसोबत मिसळले जाऊ शकते. किर्लोस्कर कंपनीने एक जनरेटर तयार केले आहे. हे जनरेटर आयसोब्युटेनॉलवर चालते. त्यामुळे शेतीशी संबंधित ट्रॅक्टर आणि इतर वाहनही डिझेलमध्ये आयसोब्युटेनॉल मिसळून चालू शकते. त्याबाबत नुकतीच ट्रॅक्टर कंपन्यांसोबत झालेल्या बैठकीत माझी चर्चाही झाली. त्यांनीही सकारात्मकता दर्शवल्याचे गडकरी म्हणाले.

पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळणे यशस्वी झाल्या नंतर शास्त्रज्ञ डिझेलमध्ये १० टक्के इथेनॉल मिसळण्याचा प्रयोग करत होते. परंतु हा प्रयोग फसला आणि डिझेल शुद्धच राहिल्याचे गडकरी म्हणाले. परंतु, इथेनॉलपासून बनणाऱ्या आयसोब्युटेनॉलवर प्रयोग सुरु आहेत. या प्रयोगांच्या निकालावर पुढील दिशा ठरेल असे ते म्हणाले. शनिवारी (१३ सप्टेंबर) नितीन गडकरी अँग्रीकॉस वेलफेअर सोसायटीच्या नागपुरात झालेल्या एका कार्यक्रमात बोलत होते.

नितीन गडकरी यांनी आपल्या मुलाच्या व्यवसायाविषयी सविस्तर बोलताना सांगितले की ते त्याला फक्त नवे-नवे विचार देतात. त्यांनी म्हटले, 'माझ्या मुलाचा आयात-निर्यात व्यवसाय आहे. त्याने अलीकडेच इराणमधून ८०० कंटेनर सफरचंद आयात केले आणि इथून १ हजार कंटेनर केळी पाठवली. माझा मुलगा गोव्याहून ३०० कंटेनर मासळी घेऊन सर्बियाला पोहोचला. त्याने ऑस्ट्रेलियात मिल्क पावडर बनवणारा कारखानाही उभारला आहे. तो अबू धाबी आणि इतर ठिकाणी १५० कंटेनर पाठवतो असेही गडकरी म्हणाले.

नितीन गडकरी म्हणाले की, त्यांना लक्ष्य करण्यासाठी पैशाने चालवलेले एक अभियान सध्या समाजमाध्यमांवर राबवले जात आहे. त्यात काहीही तथ्य नाही. सर्व काही पारदर्शक आहे.

## ओबीसी आरक्षणावरून भुजबळ मुख्यमंत्र्यांच्या शहरातूनच सरकारला इशारा देणार!

**नागपूर:** ओबीसीमधून आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी मुंबईत केलेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैद्राबाद गॅजेटचा शासन निर्णय काढत मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. यानंतर मनोज जरांगे यांचे आंदोलन शांत झाले असले तरी राज्यातील ओबीसी समाज मात्र आक्रमक झाला आहे.

विदर्भामध्ये काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी १० ऑक्टोबरला मोठा मोर्चा आयोजित केला आहे. तर दुसरीकडे राज्य सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनीही मराठा आरक्षणाच्या शासन निर्णयावरून सरकारलाच घरचा आहेर दिला आहे. यानंतर भुजबळ आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शहरातूनच ओबीसी आरक्षणासाठी सरकारला



इशारा देणार आहेत.

महात्मा फुले समता परिषद, विविध ओबीसी संघटना व बहुजन यांनी मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसीमधून आरक्षण देण्यास तीव्र विरोध केलेला आहे. असे असताना राज्य शासनाच्या मराठा मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीने, मराठा आंदोलकांच्या दबावात येवून २ सप्टेंबर २०२५ ला काळा शासन निर्णय काढून, मराठा जातीला कुणबी प्रमाणपत्रे देण्याचा शासन निर्णय काढून, संविधान, उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निकाल, जात पडताळणीचा कायदा हे सारे डावलून, ओबीसींची फसवणूक केलेली आहे. त्याचा ओबीसी बहुजनांकडून सर्वत्र निषेध होत असून, अनेक ओबीसी युवक तरुण ओबीसींचे आरक्षण या घुसखोरीमुळे संपले या नैराशेपोटी आत्महत्त्या करीत आहेत. हे लोण मराठवाड्यातून आता विदर्भामध्येही पोचण्याची शक्यता आहे.

## राज्यावरील कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढतोय

**मुंबई:** निवडणूक काळात लोकोपयोगी योजनांच्या केलेल्या घोषणांची पूर्तता, विस्कटलेली आर्थिक घडी यामुळे राज्यावरील कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. जून अखेरीसच कर्जाचा आकडा ८ लाख ५५ हजार ३९७ कोटी रुपयांवर पोहचला आहे. आर्थिक वर्षाच्या सुरुवातीच्या तीन महिन्यांतच सरकारने २४ हजार कोटींचे कर्ज घेतले असून वर्षअखेर कर्जाचा आकडा ९ लाख ३२ हजार २४२ कोटींवर पोहोचण्याचा अंदाज वित्त विभागाकडून वर्तविण्यात आला आहे.

राज्य सरकारला स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत जास्तीत जास्त २५ टक्क्यांपर्यंत कर्ज घेता येते. या आर्थिक वर्षात या मर्यादेच्या १८ टक्क्यांपर्यंत कर्ज घेण्यात आले आहे. मर्यादेनुसार केंद्र सरकारने २०२५- २६ या आर्थिक



वर्षात राज्य सरकारला १ लाख ४६ हजार कोटी ६८७ कोटी रुपये इतके कर्ज उभारण्यास परवानगी दिली आहे. यापैकी पहिल्या नऊ महिन्यांसाठी ९९ हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारले जाणार आहे.

या कर्जापैकी १० हजार कोटींचे कर्ज नाबार्ड आणि नॅशनल हौसिंग बँकेकडून घेण्यात येणार आहे.

वित्त विभागाच्या आकडेवारीनुसार सरकारने २०२५-२६ या नव्या आर्थिक वर्षाच्या एप्रिल महिन्यात एकूण ३४ हजार ५८९ कोटी ३५ लाख रुपयांचे कर्ज घेतले. त्याच महिन्यात २१ हजार ९५६ कोटी रुपयांचे कर्ज फेडले. मे महिन्यात सरकारने १९ हजार १७३ कोटी रुपयांचे कर्ज उचलले आणि १९ हजार २५४ कोटी रुपयांची कर्जफेड केली, तर जून महिन्यात सरकारने २२ हजार ७२५ कोटींचे कर्ज घेतले आणि त्याच महिन्यात १२ हजार २६२ कोटी रुपयांचे कर्ज फेडले.

# संक्षिप्त

## आयुष्मान-फुले योजनेत २३९९ उपचार उपलब्ध

**मुंबई:** एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेमध्ये मिळणाऱ्या उपचारांची संख्या २३९९ पर्यंत वाढविण्याचा तसेच हृदय, फुफ्फुस, किडनी प्रत्यारोपणासारख्या पाच लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी स्वतंत्र निधी उभारण्याचा निर्णय सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य या दोन्ही योजनांच्या एकत्रित अंमलबजावणीच्या धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्याकरीता गठित राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या नियामक परिषदेची बैठक फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ हे उपस्थित होते. तर आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे दूरचित्र संवादाच्या माध्यमातून उपस्थित होते.आरोग्य विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण यांनी सादरीकरणाद्वारे जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत केलेल्या प्रमुख उद्दिष्टपूर्तीचे तसेच योजनेतील उपचारांच्या यादीत सुधारणेसाठी नेमलेल्या अभ्यास समितीचा अहवाल मांडला. त्याला मान्यता देताना महात्मा फुले व प्रधानमंत्री जन आरोग्य या दोन्ही योजनेत सुचीबद्ध असलेल्या रुग्णालयांचे तालुकानिहाय मॅपिंग करण्याचे आदेश फडणवीस यांनी दिले.

## कोकण रेल्वेचे नवे ॲप

**मुंबई :** कोकण रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना एका क्लिकवर रेल्वेगाड्यांची सद्यस्थिती समजणार आहे. कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने 'केआर मिरर' केआरसीएल मोबाइल ॲपसुरू केले आहे. मराठीसह चार भाषांत हे ॲप कार्यान्वित आहे.



नव्याने डिझाइन केलेल्या मोबाइल ॲपमध्ये वापरातील सुलभता, प्रवेश योग्यता आणि वैयक्तिकरणावर भर देण्यात आला आहे.'केआर मिरर' मोबाइल ॲपमध्ये प्रवाशांना आवश्यक प्रवासाची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. बहुभाषिक ॲप असल्याने याद्वारे प्रवासादरम्यान सुरक्षा जागरूकता मोहीम राबवणे सहज शक्य होणार आहे. कोकणातील विविध पर्यटनस्थळे आणि ठिकाणे यांची माहिती यामध्ये असल्याने प्रवासाचे नियोजन करणे अधिक सोपे होणार आहे. ॲपची जोडणी कोकण रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळाला देण्यात आली आहे. यामुळे ॲपमधून थेट संकेतस्थळावर पोहोचणे शक्य आहे.

## पंधरा हजार जागांसाठी पोलीस भरती जाहीर

**नाशिक :** राज्य पोलिस दलासह कारागृह विभागातील शिपाई संवर्गातील एकूण १५ हजार ६३१ रिक्त पदांवर होणाऱ्या भरतीकरीता घटकनिहाय प्रक्रिया राबविण्यासंदर्भात गृह विभागाने आदेश जारी केले आहेत. दिवाळीनंतर भरतीची शक्यता असून,



सन २०२२ ते २०२५ या वर्षात वयोमर्यादा ओलांडलेले उमेदवार एक अखेरची संधी म्हणून अर्जासाठी पात्र आहेत. त्यामुळे नियमित सराव करणाऱ्यांसह वय ओलांडणाऱ्यांनीही 'खाकीचे स्वप्न' पूर्ण करण्यासाठी कंबर कसण्यास सुरुवात केली आहे. यासह पोलिस घटकांनीही आगामी निवडणुकांसह सणोत्सवाचा आढावा घेत भरतीचे नियोजन हाती घेतले आहे.गृह मंत्रालयाने राज्यात १५ हजार रिक्त पदांवर पोलिस भरतीची घोषणा केल्यानंतर सर्व पोलिस घटकांत भरती प्रक्रियेसंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. नाशिक शहरात रिक्त पदे शिल्लक नसली, तरी ग्रामीण पोलिस दलात १७२ रिक्त पदांवर भरतीची शक्यता आहे. सिंहस्थापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण झाल्यास नवप्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांचे 'बळ' प्राप्त होईल. त्यामुळे अर्ज नोंदणीकडे उमेदवारांचे लक्ष असून, बारावीपासून विविध विद्याशाखेतील उच्च पदवीधरांनीही त्याकरीता तयारी सुरू केली आहे.

## वकिलाचे एक वाक्य अन् दाम्पत्याने मिटवला १२ वर्षांचा न्यायालयीन वाद

**पुणे :** तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या मुलीच्या भवितव्याचा विचार करून घटस्फोटित दाम्पत्याने १२ वर्षांची न्यायालयीन भांडणे मिटवून एकमेकांविरोधात केलेले सहा दावे माघारी घेतले. घटस्फोटानंतरही एकाच छताखाली राहणाऱ्या या दाम्पत्याने लोकअदालतीतील



समुपदेशनानंतर कन्येच्या भविष्यासाठी मतभेद व न्यायालयीन लढाईला पूर्णविराम दिला. विनय आणि विशाखा (नावे बदलली आहेत) यांचा २००५ मध्ये पारंपरिक पद्धतीने विवाह झाला. लग्नानंतर दोन वर्षांत त्यांना मुलगी झाली. विशाखा नोकरी करीत होती; विनय वाणिज्य शाखेचे क्लास घ्यायचा. मुलगी पाच-सहा वर्षांची असताना, या दाम्पत्यामध्ये खटके उडू लागले. २०१३मध्ये दोघांनी एकमेकांविरोधात न्यायालयात धाव घेतली. पत्नीने पतीसह सासरच्या मंडळीवर रॉकेल ओतून पेटवण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार दाखल केली, तर पतीने क्रूर वागणुकीचा आरोप ठेवून घटस्फोटाची मागणी केली.

## महानगर प्रदेशात डोक्यावर टांगते 'रॉड'

**ठाणे :** ठाणे, भिवंडी, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली या मुंबई महानगर प्रदेशातील शहरांमध्ये मेट्रोची कामे जोशात सुरू आहेत. रस्ते खोदून मेट्रोचे उंचच उंच खांब उभारले जात आहेत. काही ठिकाणी या खांबांवर गर्डरही टाकले गेले आहेत. या सर्व कामांसाठी अजस्त्र यंत्रे रस्त्यांवर उभी असतात. शहराची मान उंचावणाऱ्या या मेट्रोसेवेच्या कामांमुळे सामान्य नागरिक मात्र धास्तावलेले असतात. गाडीवरून किंवा पायी जाताना वरून कधी काय पडेल, याचा नेम नसतो.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# मणिपूरमधील संदेश

केंद्र सरकार मणिपूरच्या जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे; मात्र येथील विविध गटांनी हिंसाचाराचा त्याग करावा. मणिपूरमध्ये आशा आणि विश्वासाची नवी पहाट उगवत आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चुराचंदपूर येथे काढले. पंतप्रधानांचे हे उद्गार नक्कीच आश्वासक आहेत. मे २०२३ मध्ये मणिपुरात हिंसाचार सुरू झाल्यानंतर प्रथमच राज्यात आलेल्या पंतप्रधानांनी संक्रमण शिबिरातील विस्थापितांशी संवाद साधला. चुराचंदपूर येथे त्यांनी जाहीर सभेतही भाषण केले आणि तेथे तसेच इंफाळमध्ये वांशिक हिंसाचारामुळे विस्थापित झालेल्या नागरिकांशी संवादही साधला. मणिपूरमध्ये वांशिक हिंसाचारामुळे ६० हजार लोक विस्थापित झाले असून, २५० जणांचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री बिरेन सिंह यांना राज्यातील आग विझवण्यात मुळीच यश आले नाही आणि तरीही ते पदाला चिकटून राहिले होते. शेवटी त्यांना पायउतार व्हावे लागले. मुख्मंत्रिपदाबाबत भाजपमध्ये सहमती होऊ न शकल्याने मणिपुरात राष्ट्रपती राजवट लागू केली; पण विधानसभा स्थगित ठेवली असून, त्यामुळे पुन्हा लोकनियुक्त सरकार स्थापन करण्याचा पर्याय खुला ठेवला. मैतेई आणि कुकी-झो या समाजांमध्ये तीव्र चकमकी झाल्या असून, त्यांच्यात दरी निर्माण झाली आहे. ६० सदस्यीय मणिपूर विधानसभेत भाजपचे ३७ आमदार निवडून आले होते. वांशिक संघर्षानंतर मुख्यमंत्र्यांना बदलण्याची मागणी सत्ताधारी भाजप तसेच एनडीएच्या घटक पक्षांनी केली होती; पण तेथे शांतता प्रस्थापित करणे हे सर्वात महत्त्वाचे असून, पक्षांतर्गत राजकारणाचे काय करायचे, ते नंतर पाहू, असा सुज्ञ विचार दिल्लीच्या नेतृत्वाने केला. गेल्या फेब्रुवारीत मणिपूर विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार होते. त्यात विरोधकांनी अविश्वासाचा ठराव दाखल केला. भाजपचे काही आमदार विरोधात मतदान करणार असल्याची कुणकुण पक्षनेतृत्वाला लागली.सभागृहातील अविश्वास ठरावावरील मतदानात सरकार गडगडले असते, तर भाजपची शोभा झाली असती. हे सारे टाळण्यासाठी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला बिरेन सिंह यांचा राजीनामा घेऊन राष्ट्रपती राजवट लागू केली; मात्र स्थगित विधानसभा पुन्हा परिस्थिती सुधारल्यास कार्यान्वित केली जाऊ शकते. मणिपूर विधानसभेची मुदत मार्च २०२७ पर्यंत असल्यामुळे तेथे लोकनियुक्त सरकार पुन्हा स्थापन होऊ शकते. हे लक्षात घेतले पाहिजे. विकासाची पायाभरणी होण्यासाठी शांततेची गरज असते. गेल्या ११ वर्षांत केंद्र सरकारला ईशान्येतील अनेक संघर्ष व वाद मिटवण्यात यश आले. लोकांनी शांततेचा मार्ग स्वीकारून विकासाला प्राधान्य दिले आहे. यापुढे विकास करण्यासाठी सर्व संघटनांनी पुढे यावे आणि आपापल्या मुलांचे भविष्य सुनिश्चित करावे. केंद्र सरकार मणिपूरच्या जनतेसोबत आहे, या मोदी यांच्या आश्वासक उद्गारांनी मणिपूरवासीयांच्या जखमांवर फुंकर घातली. मणिपूरमधील हिंसाचाराला ८६४ दिवस उलटलेले आहेत; पण जानेवारी २०२२ मध्ये मोदी मणिपूरला प्रचारासाठी गेले होते. त्यानंतर ते पेटले असताना आणि तेथील महिलांची विवस्त्र धिंड काढली गेली असताना, मोदींनी मणिपूरला भेट का दिली नाही, असा सवाल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी विचारला; मात्र पंतप्रधानांनी भेट दिली नसली, तरी मणिपूरवासीयांच्या पुनर्वसनाचे काम अथकपणे सुरू होते. मणिपूरच्या विकासासाठी कोणते प्रकल्प आणता येतील, याबद्दलची आखणी पंतप्रधानांच्या कार्यालयामार्फत सुरू होती.नुसता दौऱ्याचा उपचार करण्यापेक्षा विकासाचे ठोस पॅकेज घेऊन जाणे, हे अधिक हिताचे असते व मोदींनी तोच विचार केला. आता राज्यातील हिंसाचारामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांसाठी ७ हजार घरे बांधण्यासाठी केंद्र सरकार मदत करत आहे. अलीकडेच मणिपूरसाठी ३ हजार कोटी रुपयांचे विशेष पॅकेजही मंजूर केले. विस्थापितांच्या मदतीसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली. याआधी डोंगराळ भागात आणि आदिवासी पाड्यांवर चांगल्या शाळा व रुग्णालये उभी करणे, हे स्वप्नवत होते; पण आता ही स्वप्ने साकार होत आहेत. चुराचंदपूरमध्ये वैद्यकीय महाविद्यालय उभारले जात असून, ही लक्षणीय बाब आहे. मणिपुरात ७,३०० कोटी रुपयांच्या प्रकल्पांची पंतप्रधानांच्या हस्ते पायाभरणी केली. त्यात मणिपूरमधील नागरी रस्ते, मलनिःसारण प्रकल्प, इन्फोटेक प्रकल्प, नोकरदार स्त्रियांसाठी वसतिगृहे, सुपरस्पेशालिटी इस्पितळ व आरोग्य सुविधा अशा अनेक कामांसाठी भरीव तरतुदी केल्या आहेत. गेल्या १० वर्षांत ईशान्य भारतास देशाच्या मुख्य विकासधारेत आणण्यासाठी पद्धतशीर पावले टाकली जात आहेत. रस्ते, पूल, विमानतळ आणि रेल्वेमार्ग यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जात आहे. पूर्वी उल्फा, नागा व अन्य बंडखोर गटांची दहशतवादी कृत्ये ज्या प्रमाणात सुरू होती, तीही कमी झालेली आहेत. गेली जवळपास दोन वर्षे जळत असणारे मणिपूर डिसेंबर २०२४ पासून मात्र शांत आहे. दंगलग्रस्तांच्या छावणीत अन्न व औषधे व्यवस्थितपणे पुरवली जात आहेत. या छावण्यांत मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाची सोय केली. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या तांत्रिक तसेच वैद्यकीय शिक्षणासाठी ऑनलाईन व्यवस्था केली. १९९३ ते १९९८ या काळातही मणिपुरात नागा-कुकी असा संघर्ष निर्माण झाला होता व त्यामध्ये ७५० लोक मरण पावले होते. २०१७ मध्ये मणिपूरमध्ये भाजपचे सरकार आल्यानंतर सुरुवातीला तिथे शांतताच होती; पण मागच्या ५ वर्षांत दरवर्षी मणिपूरमध्ये गडबडी होऊन अनेक दिवस सर्व व्यवहार ठप्प झाले होते. मणिपूर उच्च न्यायालयाने आरक्षणासंबंधी दिलेल्या निर्णयानंतर तेथे वांशिक दंगल सुरू झाली. मध्यंतरी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यासाठी दिल्लीत एक बैठक घेतली होती. त्यास मैतई आणि कुकी समाजाचे प्रतिनिधी प्रथमच समोरासमोर बसले होते. या बैठकीत संघर्षाच्या विविध पैलूंवर चर्चा झाली. राज्यातील प्रदीर्घ अशा तणावाच्या पार्श्वभूमीवर वाटाघाटी हाच उपाय असतो. आता मणिपूरमधील दोन्ही समाजांना एकत्र आणण्याचे काम स्थानिक राजकीय नेतृत्वाने केले पाहिजे. समाजात एकोपा निर्माण झाल्यास मणिपूरची प्रगती कोणीही रोखू शकणार नाही.

# ऊर्जा क्षेत्रात डिजिटायझेशन

> ''डिजिटायझेशन', 'फाईव्ह जी नेटवर्क्स'चा वापर, एआय'चा स्वीकार आणि वाढती क्लाउड मागणी यामुळे भारताचा डेटा सेंटर उद्योग अभूतपूर्व वाढीच्या मार्गावर आहे. २०३० पर्यंत देशातील डेटा सेंटर्स भारताच्या एकूण विजेपैकी सुमारे तीन टक्के वापर करतील. त्यामुळे भारत ऊर्जा क्षेत्रात डिजिटायझेशन आणि हरित ऊर्जेचे आव्हान पेलू शकेल का, याचा विचार करणे आवश्यक आहे''

आज जगभरात ऊर्जेची मागणी वाढत आहे. ऊर्जेच्या पुरवठ्यातील त्रुटी दूर करण्यावर, त्यात डिजिटलायझेशन आणण्यावर जगभरातील ऊर्जा वितरण कंपन्यांचा भर आहे. त्यातही आता ऊर्जेच्या निर्मितीतील संसाधनांना मर्यादा आल्याने जगभरात अक्षय ऊर्जा, हरित ऊर्जेचा वापर करण्याकडे कल वाढला आहे. जगभरात डाटा सेंटरचे महत्त्व वाढत आहे. त्यांना अखंडित विजेची गरज लागते. मुंबई, बेंगळुरू, चेन्नई आणि दिल्लीसारख्या महानगरांमध्ये हायपरस्केल डेटा सेंटर असतात. हायपरस्करेल डाटा सेंटर म्हणजे एखाद्या मोठ्या टेक कंपनीने बांधलेले आणि मालकीचे असलेले डेटा सेंटर, याला क्लाउड डेटा सेंटर असेही म्हणतात. एका हायपरस्केल सुविधेत ५० हजार चौरस फूट किंवा त्याहून अधिक जागेत हजारो सर्व्हर असू शकतात. या सुविचा बहुतेकदा मोठ्या शहरांच्या बाहेरील भागात असतात. पारंपरिक ग्रीड्सना, विशेषतः महानगरीय क्षेत्रांच्या पलीकडे डेटा सेंटर्सना लागणारी अखंड, उच्च गुणवत्तेची वीज पुरवण्यात अनेकदा अडचणी येतात. त्यामुळे ट्रान्समिशन पायाभूत सुविधांवर अतिरिक्त दवाव येतो. महत्त्वाच्या डिजिटल सेवांसाठी अपटाइम राखण्यासाठी वीज पुरवठा, वितरण आणि लवचिकता धोरणांचा मूलभूत पुनर्विचार करणे आवश्यक आहे. भविष्यातील विकेंद्रित, बुद्धिमान ऊर्जा परिसंस्था या आव्हानांना तोंड देण्यासाठी या क्षेत्राने स्वयंपूर्ण ऊर्जा परिसंस्थांकडे वळले पाहिजे. यासाठी मायक्रोग्रीड्स, बॅटरी ऊर्जा साठवण प्रणालींद्वारे वाढवलेल्या अक्षय ऊर्जा आणि रिअलटाइम ऊर्जा ऑप्टिमायझेशन तंत्रासह हायब्रीड ऊर्जा स्रोतांचे एकत्रीकरण आवश्यक आहे. विकेंद्रित वीज वितरण संरचना अस्थिर ग्रीड्सवरील अवलंबित्व कमी करतात. त्यामुळे ग्रामीण डेटा नोड्स, टेलिकॉम टॉवर्स आणि स्मार्ट कारखाने यासारख्या प्रमुख संस्थांना उच्च गुणवत्तेसह स्वायत्तपणे ऑपरेट करता येते. पायाभूत सुविधांचे निरीक्षण आणि एआय' संचालित ऊर्जा व्यवस्थापन भार वितरण आणि भविष्यसूचक देखभाल सुधारू शकते.

### भारताचे अक्षय ऊर्जा लक्ष्य

२०३० पर्यंत ५०० गीगावॅट अक्षय क्षमता साध्य करण्याचे भारताचे महत्वाकांक्षी अक्षय ऊर्जा लक्ष्य आहे. सरकारी प्रोत्साहनांमुळे डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये हरित ऊर्जेचे एकत्रीकरण वेगाने होत आहे. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी ऑपरेटर रूफटॉप सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि प्रगत शीतकरण तंत्रज्ञानाचा वापर वाढवत आहेत. उल्लेखनीय म्हणजे केद्र सरकारने दिलेल्या प्रोत्साहन अनुदानामुळे ऊर्जा साठवण उपकमांनी बॅटरी स्टोरेजचा अवलंब करण्यास गती दिली आहे. ती पुरवठा मागणी तफावत भरुन काढण्यासाठी आणि अक्षय ऊजेची अनियमित उपलब्धता कमी करण्यासाठी महत्वपूर्ण आहे. गुंतवणूकदार आणि ऑपरेटर भारतातील अत्यंत पर्यावरणीय परिस्थितीत कार्य करण्यास सक्षम असलेल्या मॉडयूलर, स्केलेबल पॉवर युनिट्ससह पायाभूत सुविधांचा विस्तार करत आहेत. उच्चकार्यक्षमता अखंड वीजपुरवठा, कृत्रिम बुध्दिमत्त (एआय) आधारित देखरेख प्लॅटफॉर्म आणि हायब्रीड ग्रीडस्टोरेज संयोजन यासारख्या तंत्रज्ञानामुळे सातत्यपूर्ण वीज गुणवत्ता आणि लवचिकता सुनिश्चित होते. या प्रगतीमध्ये ऑपरेशन लवचिकतादेखील समाविष्ट आहे. त्यामुळे डेटा सेटर्सना मागणी आणि पुरवठयातील चढ-उतारांनुसार विजेची गरज समायोजित करता येते. त्यामुळे एकूण खर्च आणि शाश्वततेचा धोका कमी होतो.

### नावीन्यपूर्ण दृष्टिकोनाची आवश्यकता

भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या आणि ऊर्जा पायाभूत सुविधांच्या सहजीवन वाढीमुळे जटिल आव्हाने निर्माण होतात. त्यासाठी नावीन्यपूर्ण आणि एकात्मिक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. सक्रिय गुंतवणूक आणि सक्षम धोरणांद्वारे डेटा सेंटर्सच्या उदयोन्मुख गरजांनुसार तयार केलेल्या विकेंद्रित, बुद्धिमान आणि हरित ऊर्जा प्रणालींचा विकास अत्यंत महत्त्वाचा असेल. या आव्हानांना यशस्वीरित्या तोंड दिल्यास भारताची डिजिटल परिसंस्था मजबूत आणि अनुकूल राहील आणि पुढील दशकात जागतिक तंत्रज्ञान महासत्ता म्हणून त्याचे स्थान सुरक्षित होईल. अशा परिस्थितीत या पारंपरिक ऊर्जेचे स्रोत मोठ्या प्रमाणात वापरले गेल्यास हे पारंपरिक स्रोत संपुष्टात आल्यावर एक गंभीर समस्या उदभवेल. म्हणूनच जगभरात अपारंपरिक ऊर्जा स्रोतांना प्रोत्साहन देण्याची गरज भासू लागली आहे. अक्षय ऊर्जा स्रोतांपासून ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. अक्षय म्हणजे जी कधीही संपत नाही अशी. म्हणजेच अक्षय ऊर्जा ही प्रत्यक्षात ऊर्जेचा अमर्याद पर्याय आहे आणि आजच्या काळात कोणत्याही राष्ट्राच्या अक्षय विकासाचा मुख्य आधारस्तंभ देखील आहे. पर्यावरणीय चिंता लक्षात घेता, गेल्या काही वर्षापासून अशी ऊर्जा आणि तंत्रज्ञान मर्यादित नैसर्गिक संसाधने आहेत आणि पर्यावरणीय असंतुलन आणि विस्थापना सारखी गंभीर आव्हाने आहेत. गंभीर समस्या आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी अक्षय ऊर्जा हा एकमेव सर्वोत्तम पर्याय आहे, जो पर्यावरणीय समस्यांना तोंड देण्याबरोबरच ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यात प्रभावी ठरेल; परंतु अक्षय ऊर्जेच्या मार्गात अनेक आव्हाने उभी आहेत. देशभरात अक्षय



ऊर्जा उत्पादनाची अनेक लहान युनिट आहेत, त्यांना एका ग्रीडमध्ये आणणे हे एक अतिशय आव्हानात्मक काम आहे. भारतात अक्षय ऊर्जेच्या विविध खोतांचा प्रचंड साठा आहे: परंतु त्यापासून ऊर्जा निमांग करणारी बहुतेक उपकरणे परदेशातून आयात केली जातात. केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या आकडेवारीनुसार देशातील एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता ४५० गिगावॉटपेक्षा जास्त झाली आहे. त्यापैकी २३० गिगावॉटपेक्षा जास्त ऊर्जा विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे जागतिक तापमानवाढीच्या वाढत्या समस्येपासून जगाला काही प्रमाणात दिलासा मिळू शकेल.

### अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा वापर अनिवार्य

आज कोणत्याही राष्ट्राला स्वतःला विकसित करण्यासाठी प्रदूषणमुक्त अक्षय ऊर्जा स्रोतांचा योग्य वापर करण्याची आवश्यकता आहे. आज केवळ भारतच नाही, तर संपूर्ण जगाकडे विजेसारख्या महत्त्वाच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उल्लेखनीय म्हणजे केंद्र सरकारने दिलेल्या प्रोत्साहन अनुदानामुळे ऊर्जा साठवण उपक्रमांनी बॅटरी स्टोरेजचा अवलंब करण्यास गती दिली आहे. ती पुरवठा-मागणी तम्ववत भरून काढण्यासाठी आणि अक्षय ऊर्जेची अनियमित उपलब्धता कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. गुंतवणूकदार आणि ऑपरेटर भारतातील अत्यंत पर्यावरणीय परिस्थितीत कार्य करण्यास सक्षम असलेल्या मॉडयूलर, स्केलेबल पॉवर युनिट्ससह पायाभूत सुविधांचा विस्तार करत आहेत. उच्चकार्यक्षमता अखंड बीजपुरवठा, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित देखरेख प्लॅटफॉर्म आणि हायब्रीड ग्रीडस्टोरेज संयोजन यासारख्या तंत्रज्ञानामुळे सातत्यपूर्ण वीज गुणवत्ता आणि लवचिकता सुनिश्चित होते. या प्रगतीमध्ये ऑपरेशनल लवचिकतादेखील समाविष्ट आहे. त्यामुळे डेटा सेंटर्सना मागणी आणि पुरवठ्यातील चढ-उतारांनुसार विजेची गरज समायोजित अक्षय ऊर्जेच्या स्रोतांद्वारे मिळवली जात आहे. त्यात सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जैव-शक्ती आणि लघु जल प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय मोठ्या जलविद्युत प्रकल्प आणि अणुऊर्जेतूनही अक्षय ऊर्जानिर्मिती केली जात आहे. एकूण वीज निर्मितीमध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा सतत वाढत आहे. त्यामुळे भारत जगातील आघाडीच्या देशांमध्ये स्थान मिळवतो. २०४० पर्यंत भारतातील एकूण ऊर्जेची मागणी सध्याच्या तुलनेत जवळजवळ दुप्पट होईल.

घरगुती आणि कृषी क्षेत्रांव्यतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात विशेषतः वीज आणि इंधनाच्या स्वरूपात वापरल्या जाणाऱ्या ऊर्जेची मागणी सतत वाढत आहे. वीज आणि पेट्रोलियमसारख्या महत्त्वाच्या ऊर्जेच्या सुमारे ५५ टक्के स्रोतांचा वापर केवळ औद्योगिक क्षेत्रात केला जातो. ज्या विजेने आपण आपली घरे, दुकाने किंवा कार्यालये उजळवतो, ती वीज किंवा पेट्रोलियम आणि ऊर्जेचे इतर स्रोत देशाला विकासाच्या मार्गावर पुढे नेण्यासाठी वापरले जातात. आपल्याला ती बीज किंवा इतर ऊर्जेचे स्रोत किती मोठी किंमत देऊन मिळतात, याचा विचार कुणीच करत नाही. ही किंमत केवळ आर्थिकदृ?ष्ट्याच नव्हे, तर पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून पाहताही खूप जास्त आहे. जगभरातील ऊर्जा क्षेत्रातील सुमारे ७५ टक्के कार्बन उत्सर्जन वीज उत्पादनातून होते, म्हणूनच आता सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जा स्रोतांना विशेष महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे अक्षय ऊर्जा व्यावहारिक आणि शाश्वत होईल. ग्रीन हायड्रोजन मिशन अंतर्गत २०३० पर्यंत पाच दशलक्ष टन उत्पादन करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे, जेणेकरून भारत केवळ त्याच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करणार नाही, तर निर्यात करणारा देश बनेल. आज आपण आर्थिक संकट आणि प्रचंड पर्यावरणीय विनाशाच्या किमतीवर धर्मल, हायड्रो आणि अणुऊर्जा यासारख्या पारंपरिक ऊर्जा स्रोतांवर अवलंबून रहात आहोत. त्याऐवजी तुलनेने अतिशय स्वस्त आणि कार्बनमुक्त पर्यावरणपूरक ऊर्जास्रोतांच्या विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करण्याची वेळ आली आहे.

**प्रा. सुखदेव बखळे**

## भारताची अर्थव्यवस्था भक्कम

अलीकडेच डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताची अर्थव्यवस्था मृत अर्थव्यवस्था आहे अशी शेरेबाजी केली.जर भारताची अर्थव्यवस्था इतकी डबघाईला गेली आहे असे डोनाल्ड ट्रम्प यांना वाटत असेल तर त्यांचे जिवलग मित्र असलेल्या इलॉन मस्कने भारतात मोठी गुंतवणूक केली नसती. याशिवाय बऱ्याच अमेरिकन कंपन्यांनी भारतात मोठे प्रकल्प उभारायला सुरुवात केलेली आहे. महत्वाचा भाग म्हणजे आजच्या या तंत्रज्ञानाच्या युगात जगाच्या अर्थव्यवस्थेचे भवितव्य बदलत्या तंत्रज्ञानावर अवलंबून आहे. आणि तंत्रज्ञानामध्ये भारताने मोठी प्रगती केलेली आहे. अगदी अमेरिकेतल्या सिलिकॉन व्हॅलीलासुद्धा जगातल्या प्रत्येक देशांवर अवलंबून राहावे लागते. तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्था एकमेकांशिवाय राहू शकत नाही. भारताने या दोन्ही क्षेत्रात मोठी झेप घेतल्याने जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने फारच वेगाने पुढे जात आहे. याउलट अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला गेल्या काही वर्षात धक्के बसले आणि भविष्यकाळात ही व्यवस्था कोलमडू नये म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांनी टेरिफचे हत्यार उपसले आहे. सगळे जग काही अमेरिकेवर अवलंबून नाही. कोरोना काळात अनेक देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडल्या होत्या. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेवर कोणताही परिणाम झाला नव्हता. इतक्या मोठ्या जागतिक संकटातही भारतीय अर्थव्यवस्था टिकून राहिली हे नाकारता येणार नाही.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या या टीकेच्या सुरामुळे भारतातल्या काही राजकीय नेत्यांनादेखील आपला सूर मिसळला आहे. राजकीय लाभासाठी कदाचित ये योग्यही असू शकते. परंतु राजकारणाच्या पलीकडे जाऊन अर्थकारणाचा जर विचार केला तर भारताची स्थिती बऱ्यापैकी चांगली आहे. सर्वाधिक लोकसंख्या तितकीच मोठी गरिबी, बेरोजगारी आणि अनेक प्रकारची विविधता या सगळ्यांमधून मार्ग काढीत भारतीय अर्थव्यवस्थेला प्रवास करावा लागत अनेक क्षेत्रात भारताने स्वयंपूर्णता प्राप्त केली आहे. स्वाभाविकपणे अमेरिकेसारख्या देशावर अवलंबून राहण्याचे दिवस संपले आहेत. भारताची ही प्रगतीदेखील डोनाल्ड ट्रम्प यांना अडचणीची वाटत असेल असे दिसून येते. अगदी दहशतवाद्यांच्या लढ्यातसुद्धा भारताने स्वतःच्या ताकदीवर पाकिस्तानला गुडघे टेकायला लावले आहे. ऑपरेशन सिंदूरचा जागतिक परिणामही प्रभावी ठरला आहे. भारत-पाकिस्तान संघर्षामध्ये डोनाल्ड ट्रम्प यांची मध्यस्थी भारताने सपशेल फेटाळून लावली होती. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा इगो दुखावला गेला असण्याची शक्यता आहे. म्हणूनच आता त्यांच्या तोंडी पाकिस्तानला गोंजारण्याची भाषा ऐकू येत आहे. खरे तर एकूणच अमेरिकेचे भवितव्य डोनाल्ड ट्रम्प यांच्या हातात सुरक्षित आहे की नाही याबद्दल अमेरिकन लोकांनाच शंका वाटू लागली आहे. आणि अशा परिस्थितीत त्यांनी भारताविषयी शेरेबाजी करण्याचे काहीच कारण नव्हते. भारताला मृत अर्थव्यवस्था ठरवून आपल्या राजकीय ब्रेड बटरची व्यवस्था होऊ शकते. बदललेल्या आंतरराष्ट्रीय वातावरणाचा विचार केला.

**प्रा. मधुकर चुटे**

## आत्मनिर्भर व सामर्थ्यवान भारत

देशाला आत्मनिर्भर व सामर्थ्यवान बनवण्याच्या दृष्टीने अनेक प्रकल्प उभारले जात आहे. अशाच एका प्रकल्पापैकी एक प्रकल्प म्हणजे अंदमान निकोबार द्विप समूह मधील ग्रेट निकोबार हा प्रकल्प. मलाक्का समुद्रधुनीपासून चाळीस किलोमीटर अंतरावरील या बेटावर दीर्घ धावपट्टी असलेले वायूदळाचे तळ, नौदल तळ आणि लॉजिस्टिक हब निर्माण करण्यात येणार आहे.या आधुनिक बंदरामुळे भारत जागतिक नौकावाहतुकीचे केंद्र होऊ शकतो यातून लाखोंच्या संख्येने रोजगार,पर्यटन वाढ यासह किनारपट्टी जवळील राज्यांना आर्थिक लाभ मिळेल आणि चीनच्या या परिसरात वाढत्या वर्चस्वाला शह देणे शक्य होणार आहे. तसेच हे क्षेत्र भूकंप सुनामी प्रवर क्षेत्र असल्याने त्याचा धोका लक्षात घेऊन सुरक्षित आराखडे सिद्ध करायला लागतील. अणुऊर्जेवरील पाणबुड्या आणि विमानवाहू नौका हिंदू महासागरात अधिकाधिक संख्येत तैनात करायला लागतील तसंच या समुद्रधुनीतून जाणाऱ्या नौकांवर लक्ष ठेवण्यासाठी उपग्रह, रडार आणि ड्रोन नेटवर्क उभारावे लागतील. तसेच अमेरिका जपान ऑस्ट्रेलिया यांच्या समवेत संयुक्त नौदल सराव वाढवल्यास चीनला सूचक संदेश जाऊ शकतो. अशा प्रकारे उपाय योजल्यास विकास आणि पर्यावरण संतुलन हातात हात घालून भविष्याची वाटचाल करू शकतो ज्यामुळे भारत आंतरराष्ट्रीय पटलावर भौगोलिक सामर्थ्य, उत्कृष्ट नियोजन क्षमता,आर्थिक आत्मनिर्भरता, जागतिक स्पर्धा, सामरिक सजगता याद्वारे सागरी वर्चस्व बळकट करू शकतो.

**लीना गाडगीळ**

## खेळाचे राजकारण

जात, धर्म, राष्ट्रवाद यावरून खरेतर राजकारण, सत्ताकारण होऊ नये, मात्र मतांचे राजकारण आणि सत्ताकारण करताना केवळ हेच मुद्दे उकरून काढले जातात. कोणीही कोणाला राष्ट्रवादाचे प्रमाणपत्र देतो तर कोणाला राष्ट्रद्रोही ठरवतो. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष हे अमित शहा यांचे चिरंजीव आहेत यावरून देखील राजकारण केले जात आहे, तर सरकारच्या धोरणानुसार सामना खेळला गेला असे बीसीसीआयने स्पष्ट केले आहे. क्रिकेट खेळात सर्वाधिक आर्थिक उलाढाल होते. सट्टेबाजार, बेटिंग होते. वास्तविक खेळ आणि राजकारण या दोन्ही गोष्टी वेगळ्या आहेत मात्र गेल्या काही वर्षांपासून देशात खेळाचे राजकारण आणि राजकारणाचा खेळ जोमाने सुरू आहे. त्यामुळेच राजकारणाचा खेळखंडोबा झाला आहे आणि खेळात राजकारण शिरले आहे.

**विनायक अंबुलकर**

## पावसाचे थैमान

यंदा मौसमी पावसाने लवकरच हजेरी लावून देखील अजूनही तो पाठ सोडताना दिसत नाही. यंदा देशात ८३५.२ मिमी. पाऊस पडला असून, तो सामान्य पावसापेक्षा सात टक्के जास्त आहे! आजही देशभर पावसाने हाहाकार माजविला आहे. जीवित व वित्तहानीने खूपच नुकसान झाले आहे. त्यामुळे चिंता वाटते. यंदा पाऊस लवकर सुरू झाला, त्यामुळे बळीराजाची तारांबळ उडून मशागतीअभावी यंदा पेरा कमीच झाला! जिरायत वा कोरडवाहू पिकांसाठी अगदीच प्रमाणीत पावसाची गरज असली तरी अतिरिक्त पाऊस झाला तर हाताशी आलेल्या पिकांचेही नुकसानच होऊ शकते. धरणे, तलाव, जलसाठे तुडुंब भरून ओसंडून वाहू लागले आहेत. शेत शिवारातील छोटे ओहोळ देखील खळाळू लागले आहेत. भविष्यातील पाणीटंचाईचे संकट निश्चितच टळले आहे, म्हणून वरुणराजाने आता थांबावे किंवा थोडी उसंत घेऊन पुन्हा हलकेच बरसून निरोप घ्यावा असेच मनोमन वाटते.

**दिपक थेर**

## फटाक्यांवर बंदी घाला

प्रदूषण नियंत्रणाबाबत जर फटाक्यांवर बंदी घालायची असेल तर सरसकट देशभरात त्यावर बंदी घालावी. देशभरात समान धोरण असले पाहिजे. दिल्ली-एनसीआरमधील नागरिकांना शुद्ध हवा मिळण्याचा हक्क असेल, तर इतर शहरातील नागरिकांना तो हक्क का नाही? या संदर्भात संपूर्ण देशासाठी एकच धोरण असले पाहिजे. देशातील सर्व नागरिकांना स्वच्छ, शुद्ध हवेचा समान अधिकार आहे आणि प्रदूषणमुक्त हवा केवळ राजधानी क्षेत्रापुरती मर्यादित राहण्याचा विशेष अधिकार मानला जाऊ शकते नाही. शुद्ध हवा हा सर्वांचा अधिकार आहे; तर देशभरात सरसकट फटाक्यांवर बंदी घातली जायला हवी, अशी बंदी घालणे आवश्यक आहे.

**रोहिणी रोहनकर**

## पाकचा पराभव

भारताने आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तान विरुद्ध असलेला सामना जिंकलेला आहे. काश्मीरमधील पहलगाम येथील निष्पाप हिंदूंच्या सामूहिक हत्याकांडामुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये या आधीच तणावपूर्ण वातावरण आहे. नेमके अशावेळी आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत पाकिस्तानचा सामना भारतासोबतचा होता. भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानमधील विविध दहशतवादी तळ उद्ध्वस्त करून हत्याकांडचा बदला घेतला होता. तरीपण पाकिस्तान विषयीचा संताप कायम राहणारच. राज्यात शिवसेना उबाठा यांच्याकडून या क्रिकेट मॅचला तीव्र विरोध करून माझं कुंकू माझा देश आंदोलन करत कुंकुवाची पेटी पंतप्रधानांकडे पाठवण्यात आली. आशिया चषक स्पर्धेत भारत खेळला नसता तर भारत स्पर्धेतून बाद झाला असता आणि पाकिस्तानला आशिया चषक पटकवण्याचा मार्ग मोकळा झाला असता. थोडक्यात भारताने पाकिस्तानला क्रिकेटमध्ये देखील लोळवले आहे, असे वाटते.

**जयंत तायडे**

# यवतमाळच्या राजकारणात हालचालींना वेग

## स्थानिक स्वराज्य निवडणुकांपूर्वी पक्ष फूट आणि महायुतीच्या विस्ताराची शक्यता

• पॉलिटिकल गॉसिप

**जनमाध्यम प्रतिनिधी**
**(विवेक वानखडे)**

यवतमाळ - आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. डिसेंबर महिन्यात पार पडणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि इतर स्थानिक निवडणुकांसाठी सर्वच पक्ष जोरदार तयारी करत असून, पक्ष निष्ठेपेक्षा सोयीसुविधा आणि राजकीय गणिते महत्त्वाची ठरत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. सध्या महाराष्ट्रात महायुतीचे सरकार असून भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि त्यांचे सहयोगी पक्ष स्थानिक पातळीवर आपली पकड मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. दुसरीकडे, विरोधी पक्षांतील अनेक नेते व पदाधिकारी आपल्या राजकीय भवितव्यासाठी महायुतीकडे झुकत असल्याच्या चर्चा जिल्ह्यात रंगू लागल्या आहेत.

यवतमाळ जिल्ह्यात काँग्रेस हा एकेकाळचा प्रभावी पक्ष असला तरी आताची परिस्थिती चिंताजनक आहे. काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे वरिष्ठ नेते देवानंद पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन पक्षाचा राजीनामा जाहीर करत काँग्रेस नेतृत्वावर तीव्र टीका केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, "काँग्रेस हा पक्ष नसून काही ठराविक लोकांचे राजकारण चालते. कार्यकर्त्यांना संघर्ष करूनही तिकीट मिळत नाही, तर नेत्यांचे घराणेशाहीवर आधारित वर्चस्व सुरू आहे." पवार यांच्या भूमिकेमुळे काँग्रेसच्या गटांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, त्यांच्या समर्थनार्थ अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. येत्या २५ सप्टेंबरला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा यवतमाळ दौरा असून त्या दिवशी काँग्रेसमधील असंतुष्ट नेते मोठ्या संख्येने भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगली आहे. तसेच, २८ सप्टेंबरला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दौरा असून त्या दरम्यानही काही नेते त्यांच्या गटात जाण्याच्या तयारीत आहेत. काँग्रेसमधील असंतोषाची साखळी आता प्रवीण देशमुख यांच्यापर्यंत पोहोचल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. काँग्रेसमध्ये पुत्रप्रेम, वंशवाद आणि अंतर्गत गटबाजी यामुळे असंख्य निष्ठावंत नेते बाजूला पडत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

### महायुतीला संधी – स्थानिक निवडणुकांमध्ये लाभ होणार?

काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांतून महायुतीत होणारे प्रवेश स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुतीच्या बळवत्तेस हातभार लावू शकतात. यवतमाळ जिल्ह्यात "मिनी मंत्रालय" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत महायुती अधिक उमेदवार रिंगणात उतरवून सत्तेवर दावा करण्याच्या तयारीत आहे. भाजप, शिंदे गट, अजित पवार गट, मनसे, रिपाई, वंचित बहुजन आघाडी आणि इतर लहान पक्षांमध्ये जागावाटप आणि युती याबाबत चर्चा सुरू असून अनेक गटांमध्ये स्थानिक पातळीवरील नेते आपल्या राजकीय भवितव्यासाठी रणनीती आखत आहेत.

### काँग्रेसचे अस्तित्व धोक्यात?

जिल्ह्यात काँग्रेस हा ऐतिहासिकदृष्ट्या प्रभावशाली पक्ष मानला जात असला तरी आताची परिस्थिती पक्षासाठी आव्हानात्मक ठरते आहे. गटबाजी, नेतृत्वावरील अविश्वास आणि कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास यामुळे पक्षाचे स्थान कमकुवत होत असल्याचे जाणवते. आगामी निवडणुकीत जर मोठ्या प्रमाणावर नेते महायुतीत गेले, तर काँग्रेसचे संघटन मोडून पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, "पक्षात अंतर्गत समन्वय राखण्यात अपयश, कार्यकर्त्यांचे दुर्लक्ष आणि वंशवाद राजकारण यामुळे काँग्रेसचा आधारस्तंभ कमकुवत होत चालला आहे. ही संधी महायुती सारख्या संघटनांसाठी लाभदायक ठरू शकते."

### निवडणुकीपूर्वी वेगळे वळण

यवतमाळच्या राजकीय वर्तुळात सध्या पक्षफुटीचा फार्मूला वापरून नवीन समीकरणे तयार करण्याचा प्रयत्न सुरू आहे. देवानंद पवार यांच्या राजीनाम्यापासून सुरू झालेली अस्वस्थता आता प्रवीण देशमुख यांच्या पर्यंत पोहोचल्याने पुढील काही आठवडे जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात निर्णायक ठरू शकतात. स्थानिक स्वराज्य निवडणुकांच्या रणांगणात कोण पक्ष किती बळकट राहतो आणि कोण कोणत्या गटात समाविष्ट होतो यावर जिल्ह्याच्या राजकीय भवितव्याचा ताळमेळ ठरणार आहे.

# शेतकऱ्यांचा आक्रोश – कर्जमाफी न मिळाल्याने आत्महत्यांत वाढ : रजनीकांत बोरेले




**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - आर्णी–केळापूर मतदारसंघात शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. विकासाची आश्वासने कागदावरच राहिल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. शिक्षित तरुण बेरोजगारीमुळे त्रस्त असून शेतीवर अवलंबून असलेले शेतकरी पर्यायी उपजीविकेअभावी निराशेत बुडाले आहेत. व्हिसल ब्लोअर व जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत बोरेले यांनी शासनाच्या उदासीनतेवर टीका करत सांगितले की, "शेतकऱ्यांसाठी तातडीने आर्थिक मदत व हमीभाव मिळाल्यास आत्महत्यांचे प्रमाण थांबू शकते."

स्थानिक नेते जातीधर्माच्या राजकारणावर भर देत असले तरी जनतेच्या मूलभूत गरजा – अन्न, वस्त्र आणि निवारा – पूर्ण करण्यात अपयशी ठरले आहेत. तसेच अवैध धंद्यांना खतपाणी मिळत असून वाळू तस्करी, दारू आणि अमली पदार्थांचे व्यवहार वाढत असल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या नेत्यांची पक्षात भरती होत असल्याने सामान्य जनतेचे हित बाधित होत आहे.

यवतमाळ जिल्ह्याचा इतिहास शेतकरी आत्महत्यांसोबत जोडला गेला आहे. देशातील पहिली सामूहिक शेतकरी आत्महत्या १९८६ मध्ये चिलगव्हान येथे झाली. त्यानंतर हजारो शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणा, नापिकी आणि निराशेमुळे जीवन संपवले. स्वामी नाथन आयोग अहवालास मान्यता न मिळाल्याने शेतकऱ्यांसाठी ठोस योजना दिसून येत नाहीत.

रजनीकांत बोरेले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री यवतमाळ दौऱ्याच्या माध्यमातून सहानुभूती व्यक्त करत असले तरी प्रभावी उपाययोजना करण्यात अपयश असल्याचा आरोप केला. "शेतकरी होणे अभिमान नव्हे, अभिशाप झाला आहे. शासनाची मदत वेळेवर मिळत नाही आणि गरीबी हा गुन्हा ठरतो," असे ते म्हणाले. अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान झाले असूनही ना कृषिमंत्री, ना आमदार, ना खासदार शेतकऱ्यांच्या बांधावर गेले. घाटंजी तालुक्यातील किन्ही गावातील राजु मंग्यातुरी या शेतकऱ्याने कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केली. मुख्यमंत्री दौऱ्याच्या दिवशीच ही घटना घडल्याने प्रशासनाच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रजनीकांत बोरेले यांनी शासनाने तातडीने आर्थिक मदत, हमीभाव आणि पर्यायी उपजीविकेच्या योजना राबवण्याची मागणी केली असून अन्यथा आत्महत्यांचे प्रमाण आणखी वाढेल, अशी तीव्र भावना व्यक्त केली. संवेदनशील व दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वाची आज अत्यंत गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# विनापरवानगी गौणखनिज वापर प्रकरणी

## डॉ. सतीश चिद्दरवार व आशिष शिरमवार यांना २,६२,४४० रुपयांचा दंड

**जनमाध्यम प्रतिनिधी**





पुसद - मौजा पुसद खंड-२ येथील शेत सर्वे नंबर १५/२ क्षेत्र १.६० हे.आर. या जमिनीवर निवासी लेआउट तयार करताना विनापरवानगी गौणखनिज वापरणाऱ्या डॉ. सतीश वसंतराव चिद्दरवार (रा. मेडिकेअर हॉस्पिटल परिसर, पुसद) आणि करारनामाधारक आशिष अशोकराव शिरमवार (रा. पुसद) यांना प्रशासनाने २ लाख ६२ हजार ४४० रुपयांचा दंड ठोठावला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७)(८) नुसार ही कारवाई करण्यात आली असून, दंड न भरल्यास ही रक्कम थकबाकी म्हणून वसूल केली जाईल.

स्थानिक नागरिक नामे लक्ष्मण कांबळे, दिनेश खांडेकर आणि रवी खरात यांनी २१ सप्टेंबर २०२३ रोजी तक्रार नोंदवून लेआउटमध्ये परवानगीच्या अटींचे उल्लंघन होत असल्याचा आरोप केला होता. तहसीलदार यांच्या आदेशावरून मंडळ अधिकारी व तलाठी यांनी १७ ऑक्टोबर २०२३ रोजी स्थळ पाहणी केली. अहवालानुसार रस्ते, नाले व लाईन खांबांसाठी मोठ्या प्रमाणावर गौणखनिज वापरण्यात आले असल्याचे दिसून आले. डॉ. चिद्दरवार यांनी दोन टप्प्यांत एकूण १९९ रॉयल्टी पावत्या सादर केल्या. मात्र प्रत्यक्ष पाहणीत २५६.१८ ब्रास खनिज वापर झाल्याचे स्पष्ट झाले. दाखल पावत्यांनुसार फक्त २२९ ब्रास मान्य झाले. त्यामुळे २७ ब्रास खनिज विनापरवानगी वापरल्याचा ठपका ठेवण्यात आला. प्रति ब्रास १६२० या दराने स्वामित्वधन आणि त्यावर पाचपट दंड लावून एकूण २,६२,४४० असा दंड निश्चित करण्यात आला. ही कारवाई प्रशासनाच्या कडक भूमिकेचा पुरावा ठरली आहे. नागरिकांनी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, गौणखनिज चोऱ्याला आळा घालण्याचा हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. विनापरवानगी खनिज वापरणाऱ्यांवर पुढेही कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. २०२३ पासून स्थानिक नागरिकांनी संबंधित प्रकरणाबाबत प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. नामे – लक्ष्मण कांबळे, दिनेश खांडेकर, रवी खरात यांनी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार पुसद यांच्याकडे दिनांक २१/०९/२०२३ रोजी लेखी तक्रार नोंदवली. लेआउट परवानगी मंजूर असली तरी त्यातील अटींचे उल्लंघन करून लोकसुविधा न देता प्लॉट विक्री केली जात होती, तसेच रस्ते व नाल्यांसाठी विनापरवानगी गौणखनिज वापरले जात असल्याचा आरोप करण्यात आला होता.

# उमरखेड आगाराला प्रवाशी राजा दिनाला फज्जा

## विभाग नियंत्रक अमृत कछवे जानुन बुजुन फिरवली पाठ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - आगारात महामंडळाने प्रचलित पद्धतीने आयोजन केले आहे रोजी प्रवाशी राजा दिन ठेवण्यात आले त्या प्रवाशी राजादिनामध्ये मा. जिल्हा नियंत्रक अमृत कछवे यांनी ठराविक कार्यालयीन ताफ्यासह दिलेल्या तारखीला वेळेत हजर राहून येणाऱ्या प्रवाशांच्या आडणी समस्या, तक्रारी , ऐकून त्यावर चर्चा करुन स्थानिक पातळीवरील आगाराच्या प्रशासकीय दृष्टिकोनातून व प्रवाशांच्या हिताच्या एसटीच्या फायद्याच्या दृष्टीने तक्रारी निवारण कराव्या लागतात. परंतु उमरखेड आगारामध्ये मागील झालेल्या प्रवासी राजा दिनामध्ये दिलेल्या तक्रारीची.

कोणत्याही प्रकारे दखल व कारवाई केलेली नाही असे निदर्शनास आले. बऱ्याच जणांनी प्रवाशी तोंडी लेखी की तक्रारी सांगितले त्याचप्रमाणे प्रवासी मंडळाने लेखी मागणी दिली असताना त्यांना दुर्लक्ष केले व त्यांनी वटाण्याच्या अक्षदा दाखवल्या या विभागातील जागृत प्रवासी मंडळ असल्याने या विभागाचा सखोल अभ्यास करून त्यांना माहूर येथील तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ. हे जागृत असल्याबाबत तसेच भावीक भक्तांचा प्रसिद्ध भाग असलेला यांना येणाऱ्या नवरात्रात विशेष म्हणजे गरीबाचा रथ म्हणून ओळखणाऱ्या एसटीकडे कल असतो त्याप्रमाणे ढाणकी येथुन माहुर करीता सटल सेवा कायमस्वरूपी चालू कराव्यात ढाणकी, फुलसांगी, महागाव, धनोडा, माहूर, कारण भक्तांची माय दयाळी हमेशा वाहत असते परंतु या मागणीकडे विभाग नियंत्रण यांनी याकडे दुर्लक्ष केले येत्या काही दिवसात माहुर यात्रा सुरू होणार आहे याचा फायदा राज्य परिवहन मंडळ मिळेल तसेच प्रवाशाची गैरसोय होत आहेत निवेदन देऊन बरेच महिने झाले असून तरी उमरखेड आगाराने ढाणकी,माहुर सटल सेवा सुरु केली नाही ढाणकी हे शहर नगरपंचायत आहेत व तसेच ढाणकी हे मध्यवर्ती ठिकाण आहे कारण अंदाजे 70 ते 80 खेड्याचा संपर्क येत असते त्यामुळे भाविक भक्त ढाणकी ला येत असतात माहुर जाण्यासाठी सर्व जाती धर्माचे लोक ये -जा करत असतात दि.10/9/2025/ माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळ ढाणकी यांनी प्रवाशी राजा दिन दुसरें निवेदन आवगत केले ढणकी माहुर बस सेवा सुरु झाली नाहीतर लोकशाही मार्गाने आंदोलन करु ? अध्यक्ष , शेख इरफान, सचिव हिरासिंग चव्हाण , कार्याध्यक्ष नाथा पाटील, ढाणकी येथील प्रवाशी आजीखा पठाण उपस्थित होते सर्वांनी मिळून निवेदन दिले.

## • वेचक

### दिग्रस पोलीस स्टेशन येथे दुर्गोत्सव व आगामी सणानिमित्त शांतता समिती सभेचे आयोजन



दिग्रस - पोलीस स्टेशन येथे दुर्गोत्सव व येणाऱ्या आगामी सणानिमित्त कोणतीही अप्रिय घटना न घडता नागरिकांनी शांतता व सामाजिक सलोखा ठेवून कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी व सन उत्सव आनंदाने साजरे व्हावे यासाठी दिग्रस पोलीस स्टेशन येथे दि.16/09/2025 रोजी सकाळी 10/30 वाजता पोलीस स्टेशन दिग्रसच्या वतीने शांतता सभेचे आयोजन करण्यात आले होते. या शांतता सभेला ठाणेदार वैजनाथ मुंडे यांनी संबोधित करताना दुर्गोस्तव मंडळांनी तसेच जनतेने डी.जे .मुक्त व दारू मुक्त अभियान राबून सामाजिक शांतता तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करावे आणि सन उत्सव आनंदाने साजरे करावे असे आवाहन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून दिग्रस तहसीलचे नायब तहसीलदार सुधाकर राठोड, मुख्याधिकारी अतुल पंत, एपीआय अमोल गुंडेसह आदी मान्यवर उपस्थित होते.

### अवैध रेती चोरी करणाऱ्या वाहनावर महसूल विभागाची कारवाई



महागाव - काल दि. १५ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी उमरखेड सखाराम मुळे साहेब यांचे मार्गदर्शन व नेतृत्वामध्ये अभय मस्के साहेब तहसीलदार महागाव, मंडळ अधिकारी महागाव राम पंडित, मंडळ अधिकारी सचीन फटाले, मंडळ अधिकारी प्रकाश माने, ग्राम महसुल अधिकारी सुनील बोईनवाड, पांडुरंग निवल, महसुल सहाय्यक दिपक चव्हाण, अक्षय बोनगुलवार, मंडळ अधिकारी गजानन सुरोशे, महसुल सेवक सुरज लोणकर, देवानंद फोफसे, दिपक वैरागडे, सदानंद जराड व पोलीस कर्मचारी पो उप नि देवानंद कायंदे, हवालदार गणेश चव्हाण, पो शि सुरेश महल्ले, वसीम शेख, गणेश थिटे, राजू दिघाडे, चालक विशाल पिंगाणे यांचे सहकार्याने मौजा धारमोहा मोरथ येथुन अवैधरीत्या रेती चोरून नेणारे चार वाहन पकडुन पुढील दंडात्मक कार्यवाही करीता तहसील कार्यालय महागाव व उमरखेड येथे लावण्यात आले.

### बोरगाव (कडू) आरोग्य उपकेंद्रातील समस्या सोडवाव्यात



पांढरकवडा - बोरगाव (कडू) येथील आरोग्य उपकेंद्रात अनेक मूलभूत सुविधा अभावी रुग्णांना व कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका उपाध्यक्ष अश्विन ठाकरे यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांना निवेदन सादर केले.या निवेदनात आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीतील पाणी गळती,खिडक्यांना जाळी व काचा नसणे,संरक्षण भिंतीचा अभाव,परिसरात साचलेली घाण तसेच इमारतीच्या आजूबाजूला वाढलेली झाडे व झुडपे अशा विविध समस्या नमूद करण्यात आल्या आहेत.यामुळे आरोग्य उपकेंद्रात येणाऱ्या रुग्णांची व कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असून, स्वच्छतेचा व सुरक्षिततेचा अभाव जाणवत आहे. या समस्या तात्काळ सोडवण्यात याव्यात अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी या निवेदनाची दखल घेऊन लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था वणीची आमसभा संपन्न

वणी - श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्था वणी ची 36 वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक 15 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 12 वाजता वसंत जिनिंग हॉलमध्ये आयोजित करण्यात आली. प्रास्ताविकात पतसंस्थेचे संचालक श्री सुरेश बरडे यांनी संस्थेची प्रगती व सामाजिक सहभाग याबद्दल सांगितले. मनोगत उपाध्यक्ष मा.विवेकानंद मांडवकर यांनी व्यक्त केले.आम सभेचे विषय वाचन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय दोरखंडे यांनी केले.आर्थिक वर्ष 2024-25 चा आर्थिक अहवाल सभेत सादर करण्यात आला. उत्स्फूर्त सहभागाने सभा संपन्न झाली. संस्थेची स्थापना 1989 मध्ये स्व. भय्याजी पामपट्टीवार यांनी केली.2002 पासून संस्थेचे अध्यक्ष ॲड.देविदास काळे यांचे नेतृत्वाखाली संचालक मंडळा चे विकासात्मक धोरण व सभासदांचा विश्वास यामुळे संस्था प्रगती करत आहे. स्थापनेपासून सतत ऑडिट वर्ग ' अ ' मिळालेल्या या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य आहे.21 शाखा आहेत. सभासद 91355 आहेत.

# घाटंजीत सकल हिंदू समाजाचा विराट मोर्चा

## अकोला प्रकरणातील गुन्हेगारांना फाशीची शिक्षा देण्याची मोर्चेकरांची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



घाटंजी : अकोला येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हदरला आहे. या घटनेच्या निषेधार्थ घाटंजीत सकल हिंदू समाजाच्या वतीने दिनांक १६/९/२५ रोजी दूपारी १२ वाजता शेकडोच्या संख्येने पुरुष, महीला जयस्तंभ चौकात एकत्रित येऊन पिडितेला न्याय मिळावा या मागणीसाठी घाटंजी शहरात सकल हिंदू समाजाच्या वतीने विराट मोर्च काढण्यात आला.

मोर्चात उपस्थितांनी अल्पवयीन मूलीवरिल अत्याचाराला आळा बसावा, नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी शासनाने कठोर कायदे करावे,या घटनेचा फास्टटॅग न्यायालयीन पध्दतीने प्रकरण चालवून आरोपीला मरेपर्यंत फाशीची शिक्षा देऊन पिडीतेला न्याय द्यावा ही मागनी संभाषणातून केली. मोर्चाची सुरुवात शहरातील जयस्तंभ चौंकातून झाली. "बलात्कार्याला तात्काळ फाशी द्या", "नराधमांचा सर्वनाश व्हावा" हिंदू जागा हो, अल्पवयिन मूलीवर अत्याचार करणा-यास फाशीची शिक्षा झालीच पाहीजे, झालीच पाहीजे अशा घोषणानी भर पावसात परिसर दणाणुन गेला. हजारो नागरिक, समाजबांधव, महिला, तरुण वर्ग, विविध पक्ष संघटना पदाधीकारी, या मोर्चात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. मोर्चेक-यांनी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना निवेदन पाठवून या निवेदनात अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला जलदगती न्यायालयातून शिक्षा सुनावून तातडीने फाशीची शिक्षा द्यावी, अशा ठाम मागण्या करण्यात आल्या.सदर मोर्च्यात महिलांची उपस्थिती लक्षनीय होती.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकरी, नागरिकांना तत्काळ नुकसान भरपाई द्या

## मनसेची उपविभागीय अधिकाऱ्यांकडे मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - ढगफुटी सदृश्य अतिवृष्टीमुळे शेती आणि घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी व नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. या गंभीर परिस्थितीची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) उपविभागीय अधिकारी यांच्याकडे नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकावर येलो मोझॅक, खोडकिडा आणि मूळकुज यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. यामुळे हजारो एकरवरील सोयाबीनचे पीक पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणे गरजेचे आहे. मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या या निवेदनात प्रशासनाकडे खालील मागण्या करण्यात आल्या आहेत: तात्काळ पंचनामे: शेतीत झालेल्या नुकसानीचे आणि घरांच्या पडझडीचे तात्काळ व अचूक पंचनामे करण्यात यावेत. आर्थिक मदत: बाधित शेतकरी व नागरिकांना नुकसान भरपाईसाठी तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी. कृषी विभागाचे सहकार्य: नुकसानीचे मूल्यांकन करण्यासाठी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी करावी. या प्रकरणात उपविभागीय अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून बाधित शेतकरी आणि नागरिकांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा मनसेने व्यक्त केली आहे. या निवेदनाची गंभीर दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंतीही करण्यात आली आहे. यावेळी अमर आत्राम, तुषार वाघमारे, ओम माड़वी, सुहास उमाटे, संदिप गुरूनुले, रोहन वाघ, प्रवीण ओंकार, रोशन गुरूनुले, गजानन बुटे, गणेश भोयर, शरदराव इंगोले, आणी तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

# श्रीसंत गजानन महाराज उटी ते शेगाव पालखीचे पुसद येथे गावंडे परिवाराकडून स्वागत

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - दि.गुरुवार ११ सप्टेंबर २०२५ रोजी उटी येथील निळकंठराव गावंडे प्रशांत गावंडे, श्रीकांत गावंडे यांच्या शंकर नगर पुसद येथील "उषानिल" निवासस्थानी श्री संत गजानन महाराज संस्थान उटी ते श्री संत गजानन महाराज संस्थान शेगाव येथे "श्री" ची पालखी प्रस्थान झाले असता मोठ्या उत्साहाने पालखीची स्वागत भक्ती भावाने करण्यात आले.

ह.भ.प. तानाजी बापू यांच्या नेतृत्वात जाणारी पालखी टाळ मृदुंगाचा आवाज सगळीकडे दरवळत होता, सतत मुसळधार पाऊस आणि पालखी येताच पाऊस थांबला आणि हजारो गजानन भक्त व वारकऱ्यांच्या स्नेहभोजनाचां चांगल्या प्रकारे व्यवस्था गावंडे परिवाराकडून करण्यात आली. थोड्यावेळाची विश्रांती घेऊन पालखी पुसद येथील गजानन महाराजांचे दर्शन घेऊन शनी मंदिर मार्गव्दारे भोजला येथे प्रस्थान झाली. दिनांक १० सप्टेंबर २०२५ उटी येथून निघालेली पालखी हर्षी, पुसद, वनवारला, लाखी पारडी आसरा, सावरगाव (बर्डे) मेडशी, बाभूळगाव, बाळापुर, २० सप्टेंबर रोजी शेगाव जाणार आहे. वारकऱ्यांच्या आरोग्यांची काळजी घेता त्यांना लागणारी औषधीची व्यवस्था स्व.जयवंतराव गावंडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्था उटी चे अध्यक्ष तथा श्री गजानन महाराज भक्त प्रशांत गावंडे यांनी केली. पुसद येथे श्री ची पालखी आली असता पुसद अर्बन बँकेचे अध्यक्ष शरद मेंद, ज्येष्ठ वकील विवेक देशमुख,पत्रकार संघाचे रवी देशपांडे, उटी येथील गजानन महाराज संस्थानचे अध्यक्ष मारोतराव ठाकरे, हिवरा गावचे उपसरपंच राजू धोतरकर त्याचबरोबर पुसद परिसरातील व्यापारी, अधिकारी, कर्मचारी हजर होते.

# यवतमाळ सरसकट 'ओला दुष्काळग्रस्त' घोषित करा

## काँग्रेसकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - जिल्ह्यातील शेतकरी अतिवृष्टी,बाजार भावातील अस्थिरता,कापूस–सोयाबीन खरेदीतील गोंधळ व कर्जमाफीतील विलंब यामुळे गंभीर संकटात सापडले आहेत.या पार्श्वभूमीवर शहर व तालुका काँग्रेस कमिटी, यवतमाळ यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. काँग्रेसतर्फे सादर केलेल्या निवेदनात कापूस व सोयाबीनला हमीभाव द्यावा, कापसाला किमान १०,००० तर सोयाबीनला किमान ८,००० प्रती क्विंटल दर मिळावा,अशी मागणी करण्यात आली.तसेच इतर देशातून होणाऱ्या कापूस आयातीवर बंदी घालावी,किसान ॲपमधील तांत्रिक त्रुटी तातडीने दूर कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली.

अतिवृष्टीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर तातडीने पंचनामे करून प्रत्येक हेक्टरमागे किमान ५०,००० आर्थिक मदत शेतकऱ्यांना द्यावी. यवतमाळ जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना सरसकट "ओला दुष्काळग्रस्त" घोषित करावे, अशी ठाम मागणी काँग्रेसने केली. यासोबतच सरकारने दिलेला कर्जमाफीचा शब्द तातडीने पूर्ण करावा, सीसीआय व नाफेड खरेदी व्यवस्थेत सुधारणा करून केंद्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवावी, असेही निवेदनात नमूद आहे. हे निवेदन आज मंगळवार, १६ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. यावेळी यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगूळकर,शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.बबलू उर्फ अनिल देशमुख,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवी ढोक,सोशल मीडिया काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके तसेच शेतकरी चळवळीतील प्रखर आंदोलक प्रा.पंढरी पाठे, रमेश जाधव उपस्थित होते.

# गुंज येथील बिट जमादाराची तालुक्याच्या बाहेर बदली करा, ठाणेदारांकडे निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - गुंज बिट मध्ये जोमात सुरू असलेले अवैध धंदे यांमुळे वारंवार होणाऱ्या हाणामारी ,चिडीमारीच्या घटनांमध्ये वाढ होवुन कायदा व सुव्यवस्था बिघडली असुन या अवैध धंद्यांना खत पाणी घालणाऱ्या बिट जमादाराची महागाव तालुक्याच्या बाहेर बदली करण्यात यावी अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे सागर डोंगरे यांनी ठाणेदार महागाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महागाव पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गुंज बिट मध्ये एकेकाळी अवैध धंद्याचा लवलेश ही नव्हता परंतु कालांतराने याठिकाणी मटका,अवैध दारू विक्री,रेती,मुरुम,माती यांसारखी अवैध गौण खनिज तस्करी,जुगार यांसारख्या अवैध धंद्यांनी चांगलेच थैमान घातले असुन या अवैध धंद्यांच्या मिळकतीमधून अनेकांकडे माया जमा झाली त्याच जोरावर तलवार,देशी कट्टे यांचा धाक दाखवून दहशत माजविणे यांसारखे गंभीर प्रकार घडत आहे. या अवैध धंद्यांमुळे चोऱ्या, हाणामाऱ्यांच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.यावर अंकुश लावण्याची जबाबदारी असलेले बिट जमादार विनोद जाधव मात्र या अवैध धंदे चालकांकडून महिन्या काठी मिळणाऱ्या लक्ष्मी दर्शनामुळे याकडे साफ दुर्लक्ष करून हे अवैध धंदे अजुन कसे वाढतील व आपला खिसा कसा गरम होईल याकडे विशेष लक्ष केंद्रित करीत आहेत. जाधव यांनी जेव्हा पासुन गुंज बिटचा प्रभार आपल्या हाती घेतला तेव्हा पासुन या बिट मध्ये किरकोळ कारणांवरून भांडणे होवुन तक्रारींमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.त्यांच्या अशा वागण्यामुळे शांततामय असलेल्या गुंज बिटच्या कायदा व सुव्यवस्थेचे तिन तेरा वाजुन ती वेशीला टांगल्या गेली आहे.दोन दिवसांपूर्वीच बिट जमादारांच्या या मनमानी कारभाराविरुद्ध ग्राम पंचायत सदस्य प्रमोद जाधव यांनी सुद्धा ठाणेदारांकडे तक्रारीद्वारे बदलीची मागणी केली होती. त्यात आता प्रहार जनशक्ती पक्षाने सुध्दा उडी घेऊन अवैध धंद्यांना खतपाणी घालुन कायदा व सुव्यवस्था बिघडविण्यास मदत करणाऱ्या बिट जमादार विनोद जाधव यांची तालुक्याच्या बाहेर बदली करण्याची मागणी प्रहारचे सागर डोंगरे यांनी ठाणेदार महागाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# पृथक विदर्भ राज्यासाठी कुठलेही बलिदान देऊ

## मेळघाट विदर्भ निर्माण जनसंकल्प मेळाव्यात केल्या गेला निर्धार!






**अमरावती/का.प्र.**

विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने नगर परिषद संभागृह, चिखलदरा येथे चला विदर्भ जाणून घेऊ या.... संकल्पनेवर आधारित मेळघाट विदर्भ निर्माण जनसंकल्प मेळाव्यात विदर्भवाद्यांनी निर्धार केला डलाठी खाऊ गोळी खाऊ मात्र २०२७ पर्यंत विदर्भ राज्य मिळवून राहू!या मेळाव्याला, विदर्भाच्या सर्व ११ जिल्ह्यातून जनता विशेषत्वाने युवाशक्ती व मातृशक्ती सहभागी झाली होती.

विदर्भ मुक्ती एक संघर्ष यात्रा डॉक्युमेंटरी मेळाव्याच्या प्रारंभी दिवंगत विदर्भ योद्धे संभाजी सिरसाट गुरुजी व महादेवराव काटकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर, मागील १२० वर्षांच्या विदर्भ मुक्ती संघर्ष यात्रेवर, प्रसिद्ध कादंबरीकार डॉ. एकनाथ तट्टे व सिनेमॅटोग्राफर अजय तायडे यांच्या संकल्पनेतून साकार झालेली तसेच प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत आणि रंजना मामर्डे निर्मित डॉक्युमेंटरी सादर करण्यात आली.उदघाटन समारंभ मेळाव्याचे उद्घाटन समारंभ प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली, नागपूर खंडपिठाचे प्रसिद्ध विधितज्ज्ञ ॲड. नीरज खांदेवाले यांच्या हस्ते तसेच माजी मंत्री डॉ. रमेश गजबे व जनसुराज्य पार्टीचे अध्यक्ष राजेश काकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी ॲड नीरज खांदेवाले यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणातून विदर्भातील जनतेने सर्व प्रकारचे पक्ष भेद विसरून या लढ्यात तन, मन, धनाने शामिल व्हावे असे आवाहन केले. प्रमुख अतिथी माजी मंत्री डॉ रमेश गजबे यांनी आगामी काळात मी स्वतः विदर्भ जनजागरण यात्रा करणार असल्याचा संकल्प सोडला विशेष अतिथी जन सुराज्य पार्टीचे अध्यक्ष राजेश काकडे यांनी, विदर्भ राज्य मिळविल्याशिवाय आता थांबणे नाही असा निर्धार व्यक्त केला.अध्यक्षीय संबोधनात डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत यांनी विदर्भ मुक्ती संघर्ष ही लोकचळवळ व्हावी, यासाठी तमाम जनतेला विदर्भाचे विदारक वास्तव समजावून सांगणे गरजेचे आहे.

करिता प्रसिद्धीचा हव्यास न करता चळवळीतील प्रत्येकाने, जनजागृतीचे कार्य एक व्रत म्हणून स्वीकारावे असे आवाहन केले. या प्रसंगी समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा सत्कार करण्यात आला.या मांदियाळीत सुप्रसिद्ध समाजसेविका माऊली डॉ.कमलताई गवई, विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष ॲड. वामनराव चटप, विदर्भ विरांगना श्रीमती रंजना मामर्डे, आधार फाउंडेशनचे संचालक राजाभाऊ बसवनाथे, प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर अजय तायडे, निखळ मानवी दृष्टिकोनातून सामाजिक सौहार्द्य जपणारे शेख अब्दुल भाई, प्रखर विदर्भावादी कविवर्य वसंत गवळी, पृथक विदर्भ राज्य होईपर्यंत अनवानी पायाने फिरण्याची भीष्म प्रतिज्ञा केलेले विठ्ठल मानेकर, युवा नेतृत्व विजय नवखरे यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

उदघाट्न प्रसंगी विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष ॲड. वामन चटप, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष रंजना मामर्डे, युवा आघाडी अध्यक्ष मुकेश मासुरकर, पूर्व विदर्भ अध्यक्ष अरुण केदार, उपाध्यक्ष सुनील चोखारे, पश्चिम विदर्भ उपाध्यक्ष ॲड. सुरेश वानखडे यांची विचारपीठावर विशेष उपस्थिती लाभली.प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय शैक्षणिक क्षेत्रातील उदयोंमुख नेतृत्व प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी अतिशय प्रभाविपणे केले. स्वागतपर भाषण चिखलदरा नगरपरिषदेचे उपाध्यक्ष शेख अब्दुल भाई तर आभार अमरावती प्रास्ताविक युवा नेते नितीन पवित्रकार यांनी आपल्या धाराप्रवाह शैलीतून प्रस्तुत केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुप्रसिद्ध निवेदिका तसेच भारताचे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व केलेली प्रा. मेघा कोटक यांनी केले.

मेळाव्याला संध्या केदार, निलकंठ यावलकर,ल्युबा यावलकर, भाऊराव वानखडे, राजेंद्र सतई, डॉ. पंकज काटोले, भाऊराव नसरे, वैद्य गुरुजी,नेहा बाजपेयी इत्यादी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.मेळघाट विदर्भ निर्माण जनसंकल्प मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी ॲड. वामन चटप,रंजना मामर्डे, मुकेश मासुरकर, अरुण केदार, प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, ॲड. सुरेश वानखडे, सुनील चोखारे, प्रा. डॉ. प्रशांत विघे, प्रा. डॉ. एकनाथ तट्टे, शेख अब्दुल भाई, डॉ. पदमाताई राजपूत, बंटी केजडीवाल, तात्यासाहेब मत्ते, गणेश कुसराम, प्राचार्य मनीष चोपडे, गजानन ढोले, प्रा. शोभनाथ दुबे, महेश दुबे,दामोधर शर्मा,नीलिमा शेलुकर,डॉ.झेलम,डॉ. रमेश परिहार, शंकर पारे, नाना देवळे, अभय बाजपेयी मुकेश चौधरी, विदर्भ राज्य आंदोलन समितिचे पदाधिकारी राजेंद्र आगरकर, सुषमा मुळे, कृष्णराव भोंगाडे,प्रदीप सिरस्कार,संजय चौधरी,विलास रापातीवार , मधुसूदन कोवे गुरुजी, तेजराव मुंडे, माधव गावंडे, सुनील साबळे, प्रा. शरद पुसदकर, राजाभाऊ पुसदेकर, राजू अवताडे, राम बारोटे, रियाझ खान, नरेश निमजे, प्रशांत नखाते, ज्योतीताई खांडेकर, तारा बारस्कर, अशोक हांडे, विजय नवखरे, चुनेश्वर मानकर, अरुण बन्नाटे, ओमप्रकाश तापडिया, प्रकाश लढढा, सतीश प्रेमलवार, रमेश बिजवे, अनिल वानखडे, जीवन पचगाडे, डॉ. विजय कुबडे, शिवा काळे, राकेश महल्ले, नारायण येवले, छगन मेश्राम, सतीश माहोरे, जमील भाई, अशोक काळे यांनी अथक परिश्रम घेतले.

## डवरगाव येथे रोग निदान शिबीर



**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल व्दारा संचालित पी. आर. पोटे पाटील इन्स्टिट्यूट अँण्ड हॉस्पिटल ऑफ मेडिकल सायन्सेस आयुर्वेद यांच्या विद्यमाने श्री गुरुदेव सेवा मंदिर, डवरगाव येथे सर्वसामान्य रोग निदान व आयुर्वेद उपचार शिबीर झाले. या शिबिरात विविध व्याधींवर तज्ञ चिकित्सांमार्फत तपासणी करून उपचार करण्यात आले. या शिबिरामध्ये परिसरातील १२० च्या वर रुग्णांनी लाभ घेतला. अधिष्ठाता डॉ. श्याम भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला, या शिबिरात डॉ. दिलीप चऱ्हाटे, डॉ. स्नेहल अतकरी, पराग डफ्फर ,रोशनी पेटे, वैष्णवी भोगसे,रोशन बघणे तसेच मनोज भुजाडे यांच्या सहकाऱ्याने शिबीर झाले.

## आज श्रीमती नरसम्मा संस्थेत वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**

श्रीमती नरसम्मा हिरय्या शैक्षणिक ट्रस्ट, किरण नगर, अमरावती येथील संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून संस्थेद्वारे विविध शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.यावर्षी १७ सप्टेंबर रोजी संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त - गोंड राजघराण्याच्या महाराणी ज्यांनी विदेशी धार्मिक आक्रमणाविरुद्ध सशस्त्र लढा दिला त्या राणी दुर्गावती व कर्नाटकतील कोडंगल राज्याच्या - राणी अबक्का ज्यांनी विदेशी पोर्तुगीज आक्रमकांना पराभूत करून स्वातंत्र्य राखले, अशा पराक्रमी वीरांगनांच्या ५०० व्या जयंतीनिमित्त, उद्या बुधवारी दुपारी ४.०० वाजता श्रीमती नरसम्मा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती येथे आयोजन केलेले आहे. या दोन्ही स्वातंत्र्य संग्रामामधील अकथित वीरांगणांचे प्रेरक चारित्र्यवर प्रकाश टाकण्यासाठी - इंदोर (मध्यप्रदेश) येथील प्रा. डॉ. रेखा नागर प्रमुख वक्त्या म्हणून येणार आहेत. या वर्धापन दिनाच्या समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून अमरावती मधील सुप्रसिद्ध हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके भूषविणार आहेत. तसेच याप्रसंगी सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या नारी शक्तींचा सन्मान संस्थेद्वारे करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्रबुद्ध नागरिकांनी उपस्थिती दर्शवावी अशी विनंती संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर भोंदू व समस्त कार्यकारिणीद्वारे करण्यात येत आहे.संस्थेच्या वर्धापन दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये १७ आणि १८ सप्टेंबरला भारतीय ज्ञान प्रणाली (इंडियन नॉलेज सिस्टीम) च्या विषयावर राष्ट्रीय संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे. 'भारतीय ज्ञान प्रणालीचे वैज्ञानिक, सांस्कृतिक एवं दार्शनिक आयाम' या विषयावर प्रकाश टाकण्याकरिता मुंबई, इंदोर व नागपूर येथून तज्ञ मार्गदर्शक या राष्ट्रीय संमेलनात उपस्थिती लावणार आहेत. तसेच या दोन्ही दिवशी फिलाटेलीक सोसायटी, यांच्या सहकार्याने महाविद्यालयात ऐतिहासिक डाक तिकिटांचे प्रदर्शन लावण्यात येणार आहे. कार्यक्रमांमध्ये संशोधक, विद्यार्थी, प्राध्यापक वृंद व समाजातील विविध घटकांनी उपस्थिती दर्शवावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आलेले आहे.

## गुंतवणूकदारांनी फसव्या आमिषाला बळी पडू नये

### करोडो रुपयांचे गुंतवणूक प्रकरण

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

तालुक्यातील करोडो रुपयांची फसवे आमिष दाखवून त्रिमूर्ती ठकेबाजानी करोडो रुपयांची माया जमवली असल्याच्या बातम्या प्रकाशित झाल्याने अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरज बोंडे यांनी गुंतवणूकदारांना फसव्या आमिषाला बळी पडू नये असे आवाहन केले आहे.

तालुक्यातील संत्रा व्यापारी व संन्यास घेतलेल्या वडीलांनी औरंगाबाद येथील जवाई या त्रिमूर्ती ठकेबाजानी कोटी रुपयांची मालमत्ता विकत घेतल्याने करोडो रुपये गुंतवणूक प्रकरण उघडकीस आले आहे. त्रिमूर्ती ठकेबाजानी गुंतवणूकदारांना १ लाख रुपयांवर वार्षिक साठ हजार रुपये व्याज चे फसवे आमिष दाखवून कंपनीचा बिझनेस दाखवून करोडो रुपयांची माया जमवल्याची तालुक्यात चर्चा आहे.ठाणेदार सुरज बोंडे यांनी गुंतवणूकदारांना असा परतावा कोणतीही कंपनी,बॅक, पतसंस्था देत नसून ही फसवणूक असल्याने अशा फसव्या आमिषाला गुंतवणूकदारांनी बळी पडू नये कोणतीही गुंतवणूक कंपनी किंवा पतसंस्था रिझर्व्ह बँकेच्या आधिन राहुल काम करत असतात हा व्याज दर अतिप्रमाणात असल्याने अशा प्रकारच्या गुंतवणूक कंपन्या गुंतवणूकदारांची फसवणूक करु शकतात अशा फसव्या आमिषाला बळी पडू नये असे आवाहन अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरज बोंडे यांनी गुंतवणूकदारांना केले आहे. दामदुप्पट देण्याच्या आमिषाने राज्यातील भोळ्याभाबड्या गुंतवणूकदारांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कडक पावले उचलण्याचे विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले होते. गुंतवणूकदारांच्या (वित्तीय संस्था) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम १९९९ हा कायदा अधिक सक्षम कठोर करण्यात येईल कायद्यात करावयाच्या सुधारणांसाठी तीन महिन्याच्या कालावधीतसाठी अभ्यास गट नियुक्त करण्यात येईल असे मुख्यमंत्र्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले होते मात्र या कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याचा फायदा बोगस गुंतवणूक कंपन्या घेत असल्याने गुंतवणूकदारांची फसवणूकीची संख्या वाढतच आहे. कंपनीच्या नावावर गुंतवणूकदारांची फसवे आमिष दाखवून गुंतवणूकदारांच्या फसवणूकीच्या अनेक घटना होत असताना अशा फसव्या गुंतवणूक कंपन्या बाबत शासना तर्फे व्यापक जनजागृतीची गरज आहे. अनेकदा ज्या कंपन्यांना परवानगी नसते त्या कंपन्या थेट बोर्ड लावुन गुंतवणूकदारांकडून पैसे घेतात आणि पहिले तीन चार वर्षे त्यांना व्याज देतात त्यानंतर आपला गाशा गुंडाळून गायब होतात.त्यामुळे व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे.

## शिवणी प्रकल्प पाझरल्याने शेतात साचले पाणी

### सोयाबिन, तूर, कपाशीचे नुकसान; जलसंपदा विभागाला निवेदन



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील मौजा सोनगांव, कळमगांव, शिवणी येथील शेतकऱ्यांच्या शेतात शिवणी प्रकल्पाचे पाणी पाझरुन शेतात साचल्यामुळे सोयाबिन, तूर, कपाशी या पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतक-यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असुन सदर नुकसान भरपाई द्यावी व शेतीचे भूसंपादन करण्यात यावे अशा मागणीचे निवेदन स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे जलसंपदा विभाग, अमरावतीचे मुख्य अभियंता यांना देण्यात आले. मौजा सोनगांव - शिवणी प्रकल्पाला लागुन अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी आहे. यावर्षी पावसामुळे सदर प्रकल्प हे १०० टक्के भरलेला असून सदर प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात पाझरत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिक सोयाबिन, तूर, कपाशी या पिकाचे पुर्णपणे नुकसान झाले आहे व दरवर्षी त्यांच्या पिकाचे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष भेटून तातडीने उपाययोजना व पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी तसेच शेतीचे भुसंपादन करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनाची ७ दिवसाच्या आत दखल न घेतल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटना, अमरावती जिल्ह्याच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही देण्यात आला. निवेदन देतेवेळी स्वाभिमानी शेतकरी संघटना अमरावतीचे जिल्हाध्यक्ष अमित अढाऊ, तालुकाध्यक्ष प्रशांत शिरभाते, शहर प्रमुख दिनेश आमले, जिल्हा प्रमुख (युवा) मंगेश फाटे, युवा नेते स्वप्निल कोठे यांसह उपस्थिती होती.

## पंचायतराज अभियानर्गत कार्यशाळा

**तिवसा/वार्ताहर**

ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचा शुभारंभ १७ सप्टेंबर रोजी आहे. त्या अनुषंगाने तालुकास्तरीय कार्यशाळा तिवसा येथील मध्यवर्ती प्रशासकीय भवन (तहसील कार्यालय) येथील सभागृहात झाला. या प्रसंगी तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे यांनी आभासी दृकश्राव्य माध्यमातून उपस्थितांना संबोधित केले तर प्रदीप गौरखेडे, छाया दंडाळे हे प्रमुख अतिथी उपस्थित होते.या कार्यशाळेस तहसीलदार मयुर कळसे, गट विकास अधिकारी अभिषेक कासोदे, सहा. गट विकास अधिकारी नारायण अमझरे, गट शिक्षणाधिकारी नितीन उंडे, विस्तार अधिकारी पांडुरंग उलेमाले व राहुल कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.कार्यशाळेस तालुक्यातील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय लोकअदालतीत ५५ लाखांचा निकाल

### रक्तदान शिबिरानेही ठरवली विशेष ओळख



**धारणी/वार्ताहर**

धारणी दिवाणी व फौजदारी न्यायालय धारणी येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन उत्साहात पार पडले. या लोकअदालतीत तब्बल २७५२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४०० प्रकरणे सामोपचाराने निकाली काढत एकूण ५५ लाख रुपयांचा तडजोडीने निपटारा करण्यात आला.

लोकअदालतीसाठी दोन पॅनल कार्यरत होती. पॅनल क्र. १ वर दिवाणी न्यायाधीश धर्मेंद्र पंडित तसेच सेवानिवृत्त प्राध्यापक प्रदीप भिसेसर व्ही.एन. कॉलेज, धारणी होते. तर पॅनल क्र. २ वर सह. दिवाणी न्यायाधीश ए.ए. चव्हाण आणि गाडगे महाराज कॉलेज ढाकरमलचे प्राध्यापक पंकज राण होते.लोकअदालतीत दोन वैवाहिक प्रकरणांचा सामोपचाराने निकाल लावण्यात आला. संबंधित दांपत्यांना नव्याने संसाराची सुरुवात करण्यासाठी न्यायालयातून थेट घरी पाठविण्यात आले.न्यायालयीन कर्मचारी, पक्षकार तसेच इतर नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी एकूण २८ रक्तदात्यांनी या शिबिरात रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. संपूर्ण लोकअदालतीचे कामकाज दिवाणी न्यायाधीश धर्मेंद्र पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यशस्वी आयोजनासाठी पंचायत समिती, ग्रामपंचायत, पोलीस विभाग तसेच स्टेट बँक, महाराष्ट्र बँक आणि सेंट्रल बँक कर्मचारी वृंद यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य दिले.अधीक्षक एस. जे. शर्मा, वरिष्ठ लिपिक जितेंद्र काशीकर यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी वर्गाने एकात्मतेचे दर्शन घडवत मोलाचे योगदान दिले.

## ७ जलतरणपटूंचे वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधित्व



**अमरावती/का.प्र.**

अहमदाबाद येथे नुकताच पार पडलेल्या वरिष्ठ राष्ट्रीय वॉटर पोलो स्पर्धेत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सात जलतरणपटूंची महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली होती. मुलांच्या संघातून – यश दुर्गे, पार्थ अंबुलकर आणि वेदांत सराफ यांनी सहभाग घेतला, तर मुलींच्या संघातून – वैभवी थेटे, रुशदा पाटील, पायोषणी देशमुख आणि श्रावणी राऊत यांचा समावेश होता.जलतरणपटूंनी आपल्या यशाचे श्रेय श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, अमरावती जलतरण संघटनेचे अध्यक्ष वसंतराव हरणे, प्रा. डॉ. टॉमी जोश, प्रा. डॉ. लक्ष्मीकांत खंडागळे, प्रशिक्षक प्रा.डॉ. योगेश निर्मळ, मयूर कुमार यांना देतात. मंडळाचे कार्यध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, सचिव डॉ. विकास कोळेश्वर, कोषाध्यक्ष डॉ. श्रीनिवास देशपांडे यांचेसह मंडळी पदाधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी व सर्व खेळाडूंतर्फे अभिनंदन करण्यात येत आहे.

## जिल्ह्यात सेवा पंधरवडा प्रभावीपणे राबविणार-जिल्हाधिकारी



**अमरावती/का.प्र.**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान सेवा पंधरवडा उपक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात तीन टप्प्यात हा उपक्रम राबविण्यात येणार असून यात हाती घेण्यात आलेले उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, सेवा पंधरवडा मोहिमेमध्ये पंधरा दिवसांच्या कालावधीत विविध लोककल्याणकारी योजना राबविण्यात येणार आहेत. यात नागरिकांना प्रशासकीय सेवा या जलद आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी आलेल्या काही महत्त्वाच्या सूचनाही या अभियानात समाविष्ट करण्यात येणार आहे.शासनाच्या निर्देशानुसार या पंधरवड्यामध्ये पहिल्या टप्प्यात १७ ते २२ सप्टेंबर दरम्यान पाणंद रस्ते आणि शेतीला जोडणारे मार्ग, तसेच पाणंद, शिवरस्त्यांना क्रमांक देण्याच्या महसूल विभागाच्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करून ते गाव नकाशावर चिन्हांकित केले जातील.शेतकऱ्यांसाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्र घेतले जातील. रस्ता अदालत आयोजित करून शेतरस्त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढली जातील. शिवार फेरी घेऊन शेतरस्त्यांची मोजणी आणि सीमांकन करण्यात येणार आहे. जिल्ह्यात राबविण्यात आलेला पाणंद रस्त्याचा पॅटर्न राज्य शासनाने स्वीकारला आहे. रस्ते मोकळे करून त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात येणार आहे. तसेच हे रस्ते वहिवाटीसाठी मोकळे करून देण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात २३ ते २७ सप्टेंबरमध्ये 'सर्वांसाठी घरे' योजनेची अंमलबजावणी केली जाईल. यात घरे बांधण्यासाठी शासकीय जमिनी कब्जे हक्काने दिल्या जातील. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित केली जातील. पात्र लाभार्थ्यांना जमिनींचे पट्टे वाटप केले जातील. यामध्ये शासकीय जमिनी वाटप केलेल्या, अतिक्रमण नियमित केलेल्या तसेच २०११ पूर्वीच्या गावठाणातील अतिक्रमणे नियमित केलेल्या लाभार्थ्यांचा समावेश असेल. महापालिका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायतीमध्ये सुमारे दिड हजारावर पट्टेवाटप करण्यात येतील. जिल्ह्यातील ९६ मंडळात महाराजस्व शिबीर घेण्यात येईल. यात एकाच ठिकाणी दाखले देण्याची सुविधा असेल. तसेच जिल्ह्यात एक वैशिष्ट्य उपक्रम म्हणून ३०० गावात स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.तिसऱ्या टप्प्यात २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे. यात जनसंवाद, १५५ अंतर्गत आदेशांची तपासणी, जिवंत सातबारा मोहीम आणि 'गाव तिथे स्मशानभूमी' या उपक्रमांची अंमलबजावणी केली जाईल. जिवंत सातबारा मोहिमेत आतापर्यंत सात हजार नोंदणी नव्याने घेण्यात आल्या आहे. तसेच शहरी बेघरांना जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समिती, उपअधीक्षक भूमी अभिलेख आणि विविध विभाग सहभागी असणार आहेत. नागरिकांनी या 'सेवा पंधरवडा' मध्ये सक्रिय सहभाग घ्यावा आणि विविध उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले.

# ‘ट्रेण्डस’ विचारपूर्वक स्वीकारले पाहिजेत!

**निर्मितीक्षम बदल म्हणजेच आजच्या भाषेत ‘ट्रेण्डस’ स्वीकारणे प्रगतीसाठी आवश्यक असते. काळानुरूप, परिस्थितीनुसार होत असलेल्या परिवर्तनाशी स्वतःला आवश्यक तिथे आणि तेवढे जुळवून घेणे गरजेचे आहे. पण आपण काही बाबतीत असेही बदलत आहोत की, त्या सवयी, ते बदल आपली देव, देश, धर्माबद्दलची अस्मिताच बदलू पाहत आहेत. वारसा रूपाने चालत आलेल्या काही प्रथा, परंपरा बदलणे, दूषित करणे, मलिन करणे योग्य नाही. म्हणून ट्रेण्डस् विचारपूर्वकच स्वीकारले पाहिजेत.**



**द**रवाजावर जरीचे स्टिकर लावले गेले असले तरी बहुतेक जण सवयीप्रमाणे ‘Pull’ ला ‘Push’ करणार वा ‘Push’ ला ‘Pull’ करणार. जाणीवपूर्वक जरी हे केले जात नसले तरी सवय ही कधी कधी एवढी अंगवळणी पडते की, मग कृती अंध होते. समाजात पडणारे टेण्डस् हे काहीसे असेच जन्माला येतात. यात कधी कधी आवश्यकतेचा लवलेशही नसतो. एकाने केले की, त्याचे अनुकरण दुसरा करतो आणि मग तिसरा आणि हे काहीतरी ‘डिफरंट’ म्हणून बहुतेक याला ‘ट्राय’ करू पाहतात आणि यातूनच ‘टेण्ड’ पडतो, सवय जडते. आज नवनवीन ‘टेण्ड’ फॉलो करणे हे असेच सवयीचे झाले असून ते आवडो वा न आवडो, पण त्यास उक्रांतीची प्रक्रिया समजून बहुधा अंगीकारले जाते. आता यातील अनेक गोष्टी या ‘विनाकारण – निरर्थक – निरुपयोगी’ या कॅटेगरीत येतात, परंतु तरीही जर सर्वच ते स्वीकारत असतील तर आपण त्याबाबतीत मागे राहून आपला मागासलेपणा का प्रदर्शित करायचा? अशा मानसिकतेत समाजमन आज संमोहित झालेले दिसते. याचा प्रभाव हा विचारशैली – जीवनशैलीत फरक पाडत असतो.

सुसंस्कारांचे अनुकरण हे संस्कृतीला शाश्वत करतात, पण वाईट टेण्डस् हे पुढच्या पिढ्या दूषित करतात. तसेच यामुळे अस्थिरता, असंयम, धरसोड वृत्ती मात्र स्थिरावत असल्याचे दिसून येते, जे धर्म, संस्कृती, संस्कार आणि एकंदरच जीवनाच्या दृष्टीने मारक ठरू शकते. याचे कारण म्हणजे टेण्ड हे जसे साध्यासोप्या गोष्टींना आपल्या कवेत घेत असतात तसेच ते अस्मिता, स्वाभिमान, विचारधारेला धक्का देत त्यांनादेखील कमकुवत करण्याची क्षमता बाळगतात. याच कारणास्तव कोणता टेण्ड समाजात रुजतो आहे वा पेरला जात आहे आणि तो आपल्या एखाद्या सांस्कृतिक वारशाचे वैभव वाढवणार की घटवणार, याबाबत दक्ष असणे गरजेचे आहे.

व्हिडीओ / फोटो काढून ते सोशल मीडियावर पोस्ट करण्याचा टेण्ड टिकटॉकने पाडला आणि आजची पिढी त्याच्या पूर्णपणे आहारी गेलेली दिसते. संवाद – संपर्क करण्याकरिता प्रत्यक्ष भेटणे वा कॉल करण्यापेक्षा मेसेज, चॅट करण्याची सवय रुजली आहे. ऑफिसला न जाता ‘वर्क फ्रॉम होम’ला अधिक पसंती मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. घरबसल्या शॉपिंग करण्याची सोयही ‘ऑनलाइन पर्चेस’ पद्धतीचा जबरदस्त प्रसार करत आहे. यूटयूबमुळे टीव्हीवर ‘लाईव्ह’ बघणे सोडून आता आपल्या सोयीनुसार रेकॉर्डेड बघणे होत आहे. ‘ऑनलाइन व्यवहार’ पर्याय सर्वमान्य झाला आहे, इतका की, सुट्टे पैसे नाहीत म्हणून कढीपत्ता खरेदीचे पैसेदेखील ‘ट्रान्स्फर’ केले जात असल्याचे बघायला मिळत आहे. स्मार्ट फोन – स्मार्ट वॉच – स्मार्ट कार्ड म्हणजेच गॅजेट्सने तरुणांना भुरळ घातली आहे. ‘रेडिमेड’साठी गुगल करण्याची सवय विद्यार्थी वर्गात वाढत असतानाच चॅट-जीपीटीने त्यात भर घातलेली दिसते.

आयडॉलाईझ केल्या जाणा-या सिने कलाकाराला पूर्वी सिनेमा पडद्यावर स्टाईलमध्ये सिगारेट ओढताना पाहून त्या वेळच्या अनेक पिढ्या त्या स्टाईल स्टेटमेंटच्या अनुकरणात व्यसनाधीन झाल्या. ‘डार्क / निगेटिव्ह पर्सनॅलिटी’ची ‘लार्जर दॅन लाईफ’ प्रतिमा उभी करून एक प्रकारे गौरविण्यात येत असल्यामुळे विद्यार्थीदशेतील मुलांना ते एक साहसी ध्येय वाटू लागले आहे. रेडी टू इट, इन्स्टंट नूडल्स वगैरेंच्या वाढलेल्या क्रेझमुळे पारंपरिक पौष्टिक आहार पद्धती विस्कळीत झालेल्या दिसतात. शिक्षण – नोकरीनिमित्त परदेशात जायचे आणि पुढे तिथेच स्थायिक होण्याचा कल नवतरुणांमध्ये वाढलेला दिसतो. ‘रिपीट’ न करण्याच्या बडेजाव मानसिकतेमुळे अव्यवहार्य मागणी, खर्च, अपव्यय वाढत आहे. बाजारात नवीन मॉडेल आले रे आले की, आपल्याकडील जुने मॉडेल त्या बदल्यात एक्स्चेंज करण्याची घाई दिसते. बॅचलर जीवनाचा सर्वतोपरी पूर्ण आनंद घेऊनच मग उशिरा लग्न करण्याची रीत प्रस्थापित होत आहे. ‘टॅटू’ काढण्याचा टेण्ड अधिकाधिक ठळक होत आहे. सतत सेल्फी काढण्याची सवय ही एखाद्या रोगाप्रमाणे बळावत चालली आहे. चांगले दिसण्यासाठी, तारुण्य टिकविण्यासाठी आरोग्याबाबत जागरुकता आणि त्यातूनच सेंद्रिय पदार्थांची मागणी वाढत आहे. विंडो शॉपिंगची भटकंती हा ताणतणाव मुक्त करणारा उपाय ठरत आहे. बाजारात येणा-या नवनवीन सुपरफूडच्या शृंखलेत आता एव्होकॅडोची अचानक एन्ट्री झाल्याने ‘डाएट सजग’ जनता अगोदरचे सोडून आता याच्या मागे लागली आहे. बाहेरचे नको म्हणून घरातच घरगुती जंक फूड तयार करण्याचा घाट घातला जात आहे. आपल्या ठिकाणाचा पत्ता हा जीपीएस लोकेशनद्वारे पाठवणे सोयीचे झाले आहे. स्वस्त व सुलभ असूनदेखील सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करणे कमीपणाचे वाटण्याचा संकुचितपणा तयार होत आहे आणि त्यामुळे काहीच नाही तर निदान दुचाकी घेणे प्रत्येकाला अनिवार्य वाटू लागले आहे. मित्रांशी बोलताना प्रत्येक वाक्यात निदान एक तरी शिवी असणे ‘कूल’ समजले जाऊ लागले आहे. एअरपॉड्समुळे मोबाईल शरीराचा एक अविभाज्य भाग बनला आहे.

आपल्या सांस्कृतिक उत्सवांमध्ये डीजेच्या तालावर असभ्यपणा, अश्लीलपणा नाचताना – गाताना दिसतो. देवाधर्माच्या कार्यात भक्ती कमी आणि देखावा – दिखावा अधिक होत आहे. ब्रॅण्ड – बॅण्डेडशिवाय इतर काही मनापासून आवडेनासे झाले आहे. घरातील देव्हा-यात दिवा लागो न लागो, पण लाँग ड्राईव्हच्या निमित्ताने देवदर्शनाला जाण्याचे टुरिझम वाढत आहे.

पक्ष फुटणे हे राजकारणाला नवीन नाही, पण दुस-याचे पक्ष फोडूनच आपला पक्ष घडवायचा व सत्तेवर यायचे, राहायचे हा टेण्ड संवैधानिक लोकशाहीसाठी अतिशय धोक्याचा बनत चालला आहे. जनतेला काहीतरी दाखवत राहायचे म्हणून कुठेतरी कसले तरी चार आण्याचं काम करून त्याचा बारा आण्याचा प्रचार करण्याचा टेण्डदेखील जोर धरत आहे. गल्लीच्या पलीकडे पोहोचताना ज्यांचे कार्य व महती धापा टाकते, ते दिल्ली काबीज केल्याप्रमाणे स्वतःचे बॅनर लावून शहरांच्या विद्रूपीकरणास कारणीभूत ठरत आहेत. रेटून खोटे बोलले की, खोट्याला खरे भासवणे कधी कधी शक्य होते आणि तोच पायंडा आता राजकारणात पडला आहे. राजकारणात – समाजकारणात विचारधारा राहिलेली नाही. उरला आहे तो फक्त स्वार्थवाद. मते ही जनसेवेतून नव्हे, तर नरेटिव्ह सेट करून फसवून चोरण्याची प्रथा पडत आहे.

प्रगतीसाठी आधुनिकता अपरिहार्य आहे. त्यामुळे निर्मितीक्षम बदल म्हणजेच आजच्या भाषेत ‘ट्रेण्डस’ स्वीकारणे आवश्यक असते. काळानुरूप, परिस्थितीनुसार होत असलेल्या परिवर्तनाशी स्वतःला जुळवून घेण्याकरिता आपल्याला आवश्यक तिथे आणि तेवढे बदलणे गरजेचे आहे. आज झालेले वा होत असलेले बदल क्रमप्राप्त आहेत आणि त्यातील बहुतांश हे योग्यच होय! पण आपण काही बाबतीत असेही बदलत चाललो आहोत की, त्या सवयी, ते बदल आपली देव – देश – धर्माबद्दलची अस्मिताच बदलू पाहत आहेत. शतकानुशतके वारसा रूपाने चालत आलेल्या काही प्रथा, परंपरा बदलणे, दूषित करणे, मलनि करणे योग्य नाही. तिथे शिस्त, संयम, संस्कार बाळगणे अनिवार्यच आहे. तेव्हा सवय लावून बदल घडविणारे टेण्ड स्वीकारताना हा बदल आपला सामाजिक विकास, सांस्कृतिक सभ्यता तर कमजोर करत नाही ना? असा विचार सर्वांनी करणे गरजेचे आहे.

● **अजित कवटकर**

# थायरॉईड आणि आहार



**व**जन वाढायला लागले की, डॉक्टर थायरॉईडची तपासणी करण्याचा सल्ला देतात. कारण अचानक वाढणाऱ्या वजनाच्या मुळाशी थायरॉईड असू शकते. बिघडलेल्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये याचे प्रमाण जास्त आढळते. पण योग्य आहार तुमचे या आजारापासून रक्षण करु शकतो. बरे हे थायरॉईड प्रकरण नेमके काय आहे. थायरॉईड ही एक लहान ग्रंथी असून तिचा आकार एका फुलपाखरासारखा असतो आणि ती गळ्याच्या खालच्या भागात स्थित असते. तिचे मुख्य कार्य म्हणजे शरीराच्या चयापचय क्रियेचे नियंत्रण ठेवणे असते.

थायरॉईड आहे हे कसे ओळखावे. साधारणपणे थायरॉईडची लक्षणे पुढील प्रमाणे दिसतात. बद्धकोष्ठता , शरीराचे वजन अचानक कमी जास्त होत राहते, हात पाय थंड पडतात, त्वचा कोरडी पांढरी पडते, ताण तणाव वाटतो, आळशीपणा येतो, शारीरिक आणि मानसिक विकासात अडथळे, केस गळणे. थायरॉइडचे विकार होण्याची कारणे गुंतागुंतीची असू शकतात. परंतु, काही पथ्य पाळल्यास होऊ घातलेले थायरॉइड विकार टाळता येतात. त्यासाठी आहार, व्यायाम आणि वैद्यकीय सल्ला महत्त्वाचा आहे.

चौरस आहार हा थायरॉईडला दूर ठेवण्यास महत्त्वाचा ठरतो. आयोडिन, लोह, अ-जीवनसत्त्व यांचा समावेश असलेल्या पदार्थांचे सेवन हॉर्मोन्सच्या उत्पादनाला चालना देते. साखर आणि पिष्टमय पदार्थांचे मर्यादित सेवन करावे. या दोन्ही पदार्थांमुळे वजन वाढते, ज्यामुळे थायरॉइडच्या उत्पादनावर आणि अभिसरणावर परिणाम होतो. तेल तूप चरबी वाढविणाऱ्या पदार्थापासून दूर राहिल्याने हृदयविकार, डायबेटिससह हॉर्मोन्सच्या विकारांवर नियंत्रण मिळवता येतो. दररोज ३० मिनिटे व्यायाम केल्याने रक्ताभिसरण वाढते. ज्यामुळे रक्तातील थायरॉइड शरीराच्या सर्व पेशी पर्यंत पोहोचते.

**हा आजार टाळण्यासाठी काय खावे**

-सफरचंद खाणे हायपोथायरॉयडिज्म समस्येत फायदेशीर मानले जाते. कारण सफरचंदात फायबर आणि क जीवनसत्वाचे प्रमाण जास्त असतं.

- बेरी गटातील फळे खावीत. स्ट्रॉबेरी खाण्याचा सल्ला दिला जातो. बेरी आणि स्ट्रॉबेरी फळांमध्ये ॲण्टि-ऑक्सिडण्टसचे प्रमाण भरपूर असते, त्याचा फायदा थायरॉइड ग्रंथीला होतो.

-संत्री खाव्यात. संत्र्यामध्ये क-जीवनसत्व असते. हायपोथायरॉयडिज्म समस्येत वजन कमी करण्यासाठी संत्री उपयुक्त ठरतात.

-अननसात क-जीवनसत्व असते, त्यामुळे अननस अवश्य खावे.

आहाराची पथ्ये पाळल्यास थायरॉईड मध्ये वजन नियंत्रित ठेवणे शक्य होते. थायरॉईड ची समस्या असेल तर सोयाबीन, कोबी, ब्रोकोली, पनीर, बटर, जंक फूड, कॉफी यांचे आहारातील प्रमाण कमी करा. नियमित तपासणी करून डॉक्टरांच्या सल्ल्याने आहार, औषधे घ्यावीत. जर आहार व्यवस्थित केला तर थायरॉईड पासून नक्की सुटका होऊ शकते.

# दिखाव्यापेक्षा ‘कर्मयोग’ आचरणात

**क**र्मे मग ती धार्मिक असो, कौटुंबिक असो किंवा अगदी सामाजिक असो, ती दिखाव्यासाठी करू नयेत. त्यामागे श्रद्धा, भक्ती, प्रामाणिकपणा आणि सगळ्यात महत्त्वाचे ती मनापासून असावीत व करावीत. अर्थात अगदी कोणतेही कर्म मनापासून, श्रद्धेने केले की त्याचे फळ हे मिळतच असते. परंतु माझ्या मते सर्वप्रथम माणुसकी हृदयात बाळगणे हे फार मोठे कर्म आहे. कारण वर उल्लेखलेली सगळी कर्मे करताना त्यामध्ये माणुसकीचा अभाव असेल तर काय उपयोग?

कधीही गरजवंताला मदत केली नाही, भुकेल्या पोटाला कधी अन्न दिले नाही, आयुष्यभर दुसऱ्याला नाडून माया जमवली, घरातल्या ज्येष्ठांना कधीही सुख न देता त्यांना वाऱ्यावर सोडले आणि त्यांचा मृत्यू झाल्यावर श्राद्धविधी मात्र धुमधडाक्यात केले, पूजाअर्चा व होमहवन यामध्ये दुधा-तुपाचा यथेच्छ हविर्भाग दिला, पण मनात प्रामाणिक भक्तिभाव न ठेवता फक्त त्याचे नाटक केले तर या कर्मकांडाला काय अर्थ राहिला?

माणूस जन्म घेतो, जगतो आणि एक दिवस देह त्यागून मृत्यू पावतो. मरत नाही तो अविनाशी आत्मा. मग त्या विनाशी शरीराविषयी आपण एवढी ओढ का बाळगतो? आज कित्येक प्रशस्त घरात मोठमोठ्या इंपोर्टेड वस्तूंना, महागड्या फर्निचरला जागा असते, परंतु स्वतःच्या जन्मदात्यांना त्याच घराच्या एखाद्या कोपऱ्यातही जागा मिळू शकत नाही. त्यांच्या गरजांना, त्यांच्या झालेल्या वयाला समजूनच घेतले जात नाही. त्यांची रवानगी स्वतंत्र खोली, टीव्ही, एसी अशा सुखसुविधा असलेल्या वृद्धाश्रमात केली जाते. कुणी विचारले तर सांगता येते, आपण किती चांगल्या ठिकाणी आणि समवयस्क लोकांसोबत आई-वडिलांची सोय केली आहे. त्यांच्या पंचाहत्तरीपूर्ती समारंभाचे निमित्त करून आपल्या हाय सोसायटीतल्या मित्र-मैत्रिणींना, आपल्या ऑफिसमधील अधिकाऱ्यांना, सहकाऱ्यांना आमंत्रित करून जन्मदात्यांवरील खोट्या प्रेमाची जाहिरात केली जाते तीही आपला वैयक्तिक स्वार्थ साधण्यासाठीच. आई-वडिलांचे तो एक दिवस फारच कौतुक केले जाते.



त्यांच्यासाठी पूजा, हवन याचा घाट घातला जातो. म्हणजेच मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे मनात भक्तिभाव न बाळगता हे सगळे केले जाते. काय उपयोग त्याचा? हे सगळे आटोपल्यावर पुन्हा त्यांची रवानगी वृद्धाश्रमात केली जाते. तिथेच त्यांचा मृत्यू होतो तेव्हाही त्यांच्या पोटी जन्म घेतलेल्या त्यांच्या मुलांना तिकडे फिरकावेसेही वाटत नाही आणि ही जराही अतिशयोक्ती नाही, तर सत्य परिस्थिती आहे. वृद्धाश्रमातच त्यांचा स्वर्गवास झाल्यावर आपल्या प्रेमाचा उमाळा जगाला दाखवण्यासाठी किंवा हे केले नाही तर कदाचित आपल्याला काही त्रास व्हायचा या भीतीपोटी श्राद्धपक्ष केली जातात, जेवणावळी घातल्या जातात. अस्थी विसर्जनासाठी हरिद्वारला जाण्याचे निमित्त करून छान पर्यटन करून येतात. थोडक्यात एकप्रकारे ही कर्मकांडे करून आपल्याभोवती आणि आपण केलेल्या वाईट कर्मांभोवती सुरक्षा कवच उभारण्याचा प्रयत्न करतात. अर्थात, त्याने होत काहीच नाही म्हणा. हे सगळे करण्यापेक्षा ते हयात असताना त्यांना थोडंसे प्रेम दिले असते तर?

जे करतोय, जे करायचंय आणि जे करावंसे वाटतंय ते आपली सद्सदविवेक बुद्धी जागृत ठेवून तपासून पहा. अखेर आपल्या आयुष्यात घडणारे सत्य अटळ आहे, जे प्रत्यक्ष परमेश्वरालाही चुकलेले नाही याचे दाखले आहेत. आपणही या दिखाव्याच्या आहारी न जाता श्रीकृष्णाने भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे आधी आपलं कर्म शुद्ध भावनेने आणि हृदयात माणुसकी जगवून करत राहू या. हा आनंद कितीतरी पटींनी मोठा असेल. जन्मदात्यांच्या श्राद्धतिथीला पिंडदानाचा सोपस्कार करतानाच एखाद्या गरीब कुटुंबाला पोटभर जेवू घाला, पितृ पंधरवड्यात यथाशक्ती गरजूंना, वृद्धाश्रमातील वयस्कर व्यक्तींना मदत करा, गोरगरीबांच्या पोटाला अन्न द्या आणि मग बघा हा आनंद किती समाधान देऊन जातो ते. स्वर्गवासी झालेल्या आपल्या पितरांचे ते जिथे असतील तिथून भरभर आशीर्वाद मिळतील.

● **प्रसाद कुळकर्णी**

# शिवाजी सावंत : ‘मृत्युंजय’कार व ‘युगंधर’ साहित्यिक

**भा**रतीय साहित्यविश्वात आपल्या लेखनकर्तृत्वाची ठसठसीत नाममुद्रा उमटवून श्रेष्ठ कादंबरीकार असा नावलौकिक प्राप्त केलेले ‘मृत्युंजय’कार शिवाजी सावंत हे मराठी सारस्वताचे भुषण आहे. ‘मृत्यंजय’कार हा शब्द उच्चारताच डोळ्यासमोर उभे राहतात ते पाच फुट नऊ उंचीचे, धिप्पाड शरीरयष्ठीचे, कधी जाकीट, कधी कोट घालणारे, कपाळावर अष्टगंध लावणारे, डोक्यावर मिलिटरी बॅरेट कॅप घालणारे, नाकावर किंचित खाली आलेला चष्मा आणि डोळे यांच्या फटीतून स्वत:च्या कडक भेदक नजरेने समोरच्याचा वेध घेणारे आदरणीय शिवाजीराव सावंत, रसिकजन आणि साहित्यिक वर्तुळात सर्वजण त्यांचा ‘राजे’ असा उल्लेख करायचे.

ख्यातनाम मराठी कादंबरीकार शिवाजीराव सावंत यांचा आज स्मृतिदिन (१८ सप्टेंबर). हिरण्यकेशी आणि चित्रा नद्यांच्या संगमावर वसलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या निसर्ग संपन्न गावात एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण आजऱ्यातच झाले. प्रथम वर्ष बी.ए. पर्यंत शिक्षण घेवुन पुढे वाणिज्य शाखेतून पदविका घेतली. त्यांनतर कोल्हापुरच्या ‘राजाराम प्रशाले’ त त्यांनी अध्यापन केले (१९६२-७४). १९७४ मधे ते पुण्यास स्थायिक झाले, तेथे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याच्या ‘लोकशिक्षण’ या मासिकाचे संपादक म्हणुन त्यांनी काम केले, १९८३ मध्ये या मासिकाच्या संपादक पदावरुन त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली.



पुणे विद्यापीठाची बी.ए. प्रथम वर्षाची परीक्षा देत असतांना हिंदीतील प्रसिध्द कवी केदारनाथ मिश्र यांचे ‘कर्ण’ हे खंडकाव्य त्यांच्या वाचनात आले आणि त्याने ते प्रभावित झाले. परंतु तत्पुर्वी इयत्ता नववीत असतांना शिवाजीरावांनी आणि त्यांच्या मित्रांनी शि.म. परांजपे लिखित ‘अंगराज कर्ण’ ही एकांकिका स्नेहसंमेलनासाठी बसवली होती. राजबिंडे रुप आणि स्पष्ट शब्दोच्चार यामुळे श्रीकृष्णाची भुमिका त्यांना मिळाली. रथचक्र उद्धरणाच्या वेळी कर्णाने उच्चारलेले प्रत्येक वाक्य त्यांच्या अंत:करणात बाणाप्रमाणे रुतले आणि ’कर्ण’ हा त्यांच्या चिंतनाचा विषय होऊन ‘मृत्युंजय’ या अजरामर कादंबरीचे बीज त्यांच्या मनात रुतले. त्यांच्या वाचनात, मनात आणि चिंतनात फक्त कर्ण आणि कर्णच होता.

शिवाजी सावंत यांनी मृत्यंजय (१९६७) ही आपली पहिली कांदंबरी लिहीली. या कादंबरीत कर्णाच्या अंतरंगात शिरून त्याच्या मनोविश्वाचा शोध घेण्याचा प्रगल्भ प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांच्या हया पहिल्याच कादंबरीने प्रभावी कादंबरीकार म्हणुन त्यांची प्रतिमा प्रस्थापित झाली. ‘छावा’ (१९७९) आणि ‘युंगंधर’ (२०००) या त्यांच्या नंतरच्या कादंबऱ्या. छावा ही संभाजी महाराजांच्या जीवनावरची, तर युगंधर ही भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावरची कादंबरी आहे. जीवनमुल्य नष्ट होत असतांना आणि त्यामुळे सामाजीक विघटनाचा अनुभव येत असतांना भारतीय मिथकांचा आणि इतिहासाचा आधार घेवुन मानवी जीवनातील आत्मिक शक्तींचा त्यांनी आपल्या कादंब-यातून पुरस्कार केला. ‘मृत्युंजय’ ही महाकादंबरी त्यांनी वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी लिहिली व प्रकाशित झाली तेव्हा ते सत्तावीस वर्षाचे होते. इतक्या लहान वयात एवढी मोठी झेप घेणा-या या लेखकाने आपल्या शिवाजी या नावाला साजेसे कर्तृत्व करून दाखविले.

शिवाजी सावंत यांनी जे लेखन केले, त्यात ‘लढत’ (दोन भाग - १९८६) आणि ‘संघर्ष’ (१९९५) हया दोन जीवनकहाण्यांचा अंतर्भाव होतो. लढत ही सहकारमहर्षी विठलराव विखे पाटील हयांची, तर संघर्ष ही प्रसिदध कामगार नेते मनोहर कोतवाल हयांची जीवनकहाणी, आपल्या जीवनात हाती घेतलेल्या कामासाठी ध्यास घेऊन काम करणारी ही माणसे त्यांना चरित्रकथणासाठी योग्य वाटली. ‘अशी मने असे नमुने’ (१९७५) मध्ये त्यांच्या जीवनाशी एकरूप झालेली, त्यांच्यावर प्रेम करणारी, निर्मळ मनाची माणसे त्यांनी रंगविलेली आहेत. तर ‘मोरावळा’ मध्ये त्यांना भेटलेली शिक्षण, समाजकारण, राजकारण, प्रकाशन, साहित्य अशा क्षेत्रातील कर्तृत्ववान माणसे त्यांनी शब्दचित्रित केली आहेत. सावंत यांनी ही दोन पुस्तके लिहुन मराठीतील व्यक्तिचित्रणात्मक साहित्य अधिक संपन्न केले. ‘शेलजा साज’ (१९९४) मध्ये त्यांचे ललित लेख अंतर्भुत आहेत.

सावंत यांना अनेक साहित्य पुरस्कार आणि सन्मान मिळाले. मृत्युंजय ला मिळालेले काही निवडक पुरस्कार असे: महाराष्ट्र राज्य पुरस्कार (१९६७), न. चि. केळकर पुरस्कार (१९७२), भारतीय ज्ञानपीठाचा ‘मुर्तिदेवी पुरस्कार’ (१९९५), फाय फाउंडेशन पुरस्कार (१९९६), आचार्य अत्रे विनोद विद्यापिठ पुरस्कार (१९९८), छावालाही महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला (१९८०). बडोदे येथे १९८३ मध्ये भरलेल्या ‘बडोदे मराठी साहित्य संमेलनाचे’ व कोल्हापूर येथे १९९८ मध्ये भरलेल्या सातव्या कामगार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अशा या महान साहित्यिकाचे १८ सप्टेंबर २००२ रोजी निधन झाले.

**डॉ. विजय बाबर, वर्धा**
**मो. नं. ९४२३११८८०६**

## दिवाळी विशेषांक- २०२५

**दरवर्षी प्रमाणे यंदाही आम्ही ‘जनमाध्यम’दिवाळी विशेष अंक प्रकाशित करणार आहोत. या अंकाच्या माध्यमातून आम्ही नवसाहित्यीकांना व्यासपीठ मिळवून देणार आहोत. साहित्यीकांचे राजकीय, सामजिक, वैचारिक लेख, कविता, व्यंगचित्र, चारोळ्या, संवाद, प्रतिक्रिया आदी साहित्य प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा अंक आमच्या ऑनलाईन पोर्टलवर सुद्धा उपलब्ध राहणार आहे. सदर दिवाळी अंक हा फक्त दिवाळीच्या पाच दिवसात वाचून संपावावा असा नसून एक संग्राह्य असा आहे. तरी या दिवाळी अंकाकरिता आपल्या बोलीभाषेतून दर्जेदार साहित्याचा समावेश करावा अशी दैनिक ‘जनमाध्यम’ तर्फ विनंती...आपले साहित्य atimadham@gmail.Com या ई-मेल वर किंवा ९८२२६६४०६७ या व्हाट्सॲप नंबर वर पाठवावे. तसेच कागदावर लिहिलेले साहित्य हे जनमाध्यम कार्यालय, तिसरा माळा अनगळ कॉम्प्लेक्स, राजकमल चौक येथे पाठवू शकता. येणारे साहित्य अंकामध्ये वापरण्याचा अधिकार ‘जनमाध्यम’कडे राखीव राहील.इच्छुक लेखकांनी आपले साहित्य दि.१० ऑक्टो.२०२५ पर्यत जनमाध्यम कार्यालयात पोहचतील या बेताने पाठवावे.**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सच



# नीळकंठ सहकारी सूतगिरणी पुन्हा सुरू होणार

## मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी : शेतकऱ्यांच्या विश्वासाला 'नवा धागा'

■ प्रतिनिधी | अकोला ■

**पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायी निर्णय घेत राज्य शासनाने मंगळवारी (दि. १६ सप्टेंबर २०२५) झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत दि. नीळकंठ सहकारी सूतगिरणी लिमिटेड, अकोला पुनःस्थापित करण्यास ५०:४५:५ या तत्वावर विशेष बाब म्हणून मंजुरी दिली. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या विश्वासाला नवा धागा मिळाला असल्याची आनंददायी प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत.**





शेतकऱ्यांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणाऱ्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाखालील महायुती सरकारचा हा निर्णय पश्चिम विदर्भाच्या औद्योगिक व कृषी विकासाला गती देणारा ठरणार आहे.

सन १९७० मध्ये स्व. नीळकंठ श्रीधर उपाख्य नानासाहेब सपकाळ (माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या दूरदृष्टीतून स्थापन झालेल्या या सूतगिरणीने तब्बल ३८ वर्षे दर्जेदार सूत निर्मिती करून शेतकऱ्यांच्या कापसाला बाजारभावापेक्षा जास्त दर देत आर्थिक लाभ मिळवून दिला होता. मात्र तांत्रिक अडचणींमुळे काही वर्षांपूर्वी गिरणीचे उत्पादन थांबले होते.

**सावरकर यांचा पाठपुरावा :** गिरणी पुन्हा सुरू व्हावी यासाठी २०१४ मध्ये आमदार म्हणून निवडून आलेल्या रणधीर सावरकर यांनी सतत प्रयत्न सुरू ठेवले. माजी केंद्रीय राज्यमंत्री संजय धोत्रे, युवा खासदार अनुप धोत्रे, डॉ. रणजित सपकाळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष शिरीष धोत्रे यांचा या मागणीसाठी ठाम पाठिंबा होता. आमदार सावरकर यांनी विधानसभा अधिवेशनात प्रश्न, लक्षवेधी सूचना, पत्रव्यवहार आदी सर्व मार्गांनी पाठपुरावा केला.

या निर्णयासाठी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा. अजित पवार, उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे, वस्त्रोद्योग मंत्री मा. संजय सावकारे, माजी मंत्री चंद्रकांत पाटील, माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले असल्याचे आमदार रणधीर सावरकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. गिरणी पुनरुज्जीवनामुळे पश्चिम विदर्भातील कापूस उत्पादकांना मूल्यवर्धनाचा लाभ मिळणार असून स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठीही हा निर्णय मोलाचा ठरणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या विश्वासाला नवा धागा मिळाला असून लवकरच पुन्हा एकदा नव्या विश्वासासह निळकंठ सहकारी सूतगिरणी पुन्हा एकदा सुरू होणार आहे.


# पातुर तालुका ओला दुष्काळ जाहीर करा !

## शेतकऱ्यांचे पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यात झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे शेतातील विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे पातुर तालुका 'ओला दुष्काळग्रस्त' घोषित करण्याची मागणी शेतकरी राजा ग्रुपच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी दिनांक १६ सप्टेंबर रोजी पालकमंत्री तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे पंचनामे आधीच करण्यात आले असून, त्यांच्या खात्यात तातडीने नुकसान भरपाई जमा करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यंदा शेतकऱ्यांनी बँक तसेच खासगी सावकारांकडून व्याजाने पैसे घेऊन पेरण्या केल्या होत्या. परंतु अतिवृष्टीमुळे पिके पाण्याखाली गेल्याने मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या कर्जफेडीचा प्रश्न गंभीर झाला असून, त्यांना तातडीने मदतीची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर पातुर तालुका ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर रवि सोनोने, ज्ञानेश्वर गाडगे, सदाशिव घोरे, राहुल ताले, विनोद कडाळे, देवेंद्र उपर्वट, शिवाजी वसतकार, सुपेश उपर्वट आदींच्या सही असून त्यांनी शेतकरी बांधवांच्या हक्कासाठी आवाज उठवला आहे.




'पातुर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे प्रचंड नुकसान झाले आहे. नदीकाठ, नाल्याकाठ तसेच शेतात साचलेल्या पाण्यामुळे सर्व पिके उद्ध्वस्त झाली आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी आणि तालुका ओला दुष्काळग्रस्त घोषित व्हावा, यासाठीच हे निवेदन दिले आहे.'

**रवि सोनोने,**
शेतकरी राजा ग्रुप, पातुर तालुका

# सावरगाव बंजारा समाजाचा इशारा

## ग्राम पंचायतचा कारभार सभागृहातून काढा अन्यथा अन्नत्याग उपोषण!



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर तालुक्यातील सावरगाव ग्राम पंचायतचा कारभार गेल्या १४ महिन्यांपासून बंजारा समाजाच्या सभागृहातून सुरू आहे. ग्राम पंचायतची इमारत नादुरुस्त झाल्याने तात्पुरता कारभार येथे हलविण्यात आला होता. मात्र, दीर्घ काळ उलटूनही सभागृह ग्राम पंचायतने खाली केलेले नसल्याने बंजारा समाज संतप्त झाला आहे.

ग्राम पंचायतचा कारभार तातडीने सभागृहातून काढून ते पुन्हा बंजारा समाजाच्या ताब्यात द्यावे, अन्यथा सभागृहासमोर अन्नत्याग उपोषणाला बसण्याचा इशारा समाजाकडून गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

सभागृह बंजारा समाजाच्या विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी शासनाने लाखो रुपयांचा खर्च करून उभारले आहे. मात्र, ग्राम पंचायतच्या हेकेखोरपणामुळे हे सभागृह अद्यापही खाली करण्यात आलेले नाही. त्यामुळे समाजातील अनेक कार्यक्रम रखडले आहेत, असा आरोप करण्यात आला आहे.

**दहा दिवसांचा अल्टिमेटम :** बंजारा समाजातील ग्राम पंचायत सदस्य जानू बाबूसिंग राठोड, सामाजिक कार्यकर्ते अनिकेत राठोड, पंकज जाधव आदींनी दिलेल्या निवेदनात, 'ग्राम पंचायतची दुरुस्ती होऊनही सभागृह परत देण्यात आलेले नाही. दहा दिवसांच्या आत सभागृह ग्राम पंचायतने खाली करावे, अन्यथा अन्नत्याग उपोषणाला बसू' असा इशारा दिला आहे.

# खेट्री सरपंचाचा दिल्ली येथे सन्मान

## संमेलनामध्ये देशभरातील ७५ सरपंचांचा सहभाग



■ प्रतिनिधी | खेट्री ■

भारतीय गुणवत्ता परिषद व पेयजल एवं स्वच्छता विभाग, जल शक्ती मंत्रालय यांच्या सहकार्याने दिल्ली येथे दिनांक १५ सप्टेंबर रोजी सरपंच संवाद राष्ट्रीय गुणवत्ता संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या संमेलनात देशभरातील विविध राज्यांतील ७५ सरपंचांनी सहभाग नोंदविला. यामध्ये पातुर तालुक्यातील खेट्री ग्रामपंचायतीचे सरपंच जहूर खान यांना जल शक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. गावात करण्यात आलेल्या विकासकामांची काँक्रिट रस्ते, वृक्ष लागवड, बचत गट प्रोत्साहन, टीबी मुक्त गाव उपक्रम, स्मशानभूमी व कब्रस्तान येथे लाईट बसविणे अशा विविध उपक्रमांची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. यापूर्वीदेखील दिल्ली, पुणे, अकोला, पातुर आदी ठिकाणी सरपंच संवाद संमेलनामध्ये जहूर खान यांचा गौरव करण्यात आलेला आहे. त्यामुळे खेट्री गावाच्या विकासकामांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याने ग्रामस्थांत आनंदाचे वातावरण आहे.

### पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत आज विविध उपक्रमांचा शुभारंभ

**अकोला :** राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत आज जिल्ह्यात विविध उपक्रमांचा शुभारंभ होणार आहे.

त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : सकाळी ८.३० वा. खामगावहून कापशीकडे (ता. अकोला) प्रयाण होईल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज होणार आहे. त्याचे प्रक्षेपण व कार्यक्रम सकाळी ९.३० वा. कापशी येथे होईल. त्या कार्यक्रमास उपस्थिती, सकाळी १०.३० वा. नियोजनभवन येथे सेवा पंधरवड्याचा शुभारंभ होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थिती. सकाळी ११.३० वा. जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयातील सीसीटीव्ही कंट्रोल रूम येथे भेट. दु. १२ वा. सशक्त नारी- सशक्त परिवार अभियानाचा राष्ट्रीय उद्घाटन सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होईल.

# सौ. सीमा खुमकर यांना कृतिशील शिक्षक पुरस्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

**माजी राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांच्या हस्ते झाला गौरव**

बार्शीटाकळी तालुक्यातील शिंदखेड मोरेश्वर येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेत कार्यरत सहाय्यक अध्यापक सौ. सीमा खुमकर यांना त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल कृतिशील शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रविवारी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व माजी राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांच्या हस्ते सौ. खुमकर यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी माजी आमदार वसंतराव खोटरे, शिक्षक संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष प्रकाश चतरकर, जिल्हाध्यक्ष सचिन काठोळे, कार्यवाह विजय वाकोडे, संजय चौधरी, शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार आदी मान्यवर उपस्थित होते. सौ. खुमकर या शिंदखेड मोरेश्वर शाळेत कार्यरत असताना अध्यापनाबरोबरच मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहेत. त्यांच्या या कृतिशील कार्याची दखल घेऊन संघटनेतर्फे त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६१४/२०२५ — प्रोसेस नं.१४३९८/२०२५
चौ.ता. २६/०९/२०२५ — दिनांक : २८/०८/२०२५

**अर्जदार :** १. रवि पुरुषोत्तम कमळाकर रा. व्ही.एच.बी कॉलनी तारफल, घर क. ११८/ २. अकोला. ता. जि. अकोला. २. रानी दिनेश शिंदे रा. व्दारा दिनेश शिंदे, विठ्ठल रुख्मिणी मंदिरा समोर, फेझरपुरा, रूख्मिणी नगर, अमरावती. ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अरुणाबाई पुरुषोत्तम कमळाकर
**पत्ता :-** रा. व्ही. एच. बी कॉलनी तारफैल घर क. ११८/२, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरुणाबाई पुरूषोत्तम कमळाकर यांचे दि.२९/०५/२०११ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही, सवय वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाचा कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २६/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६७८/२०२५ — प्रोसेस नं.१४७६९/२०२५
चौ.ता. २८/१०/२०२५ — दिनांक : ०८/०९/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती उषा जानराव चिमनकर २. दिपीका जानराव चिमनकर ३. अक्षय जानराव चिमनकर सर्व रा. रणपिसे नगर, प्रोफेसर कॉलनीच्या समोर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जानराव मारोती चिमनकर
**पत्ता :-** रा. रणपिसे नगर, प्रोफेसर कॉलनीच्या समोर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जानराव मारोती चिमनकर यांचे दि. २७/०६/२०२५ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०९/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक २९०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is - (H4215867) From
**MOHAMMAD JAFAR SHAMSUDDIN**
--TO--
**MOHAMMAD JAFAR SAMSUDDIN**
My Residential Address is - Vidyut Nagar Paras At Post. Paras Tq. Balapur Dist. Akola 444109.

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is (J9742401) From
**SAYYED IRFAN SAYYED TALEB**
--TO--
**SYED IRFAN SYED TALIB**
My Residential Address is - Patti Amrai Patur, Patur Akola 444501

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५४७/२०२५ — प्रोसेस नं.१४२००/२०२५
चौ.ता. ३०/०९/२०२५ — दिनांक : २१/०८/२०२५

**अर्जदार :** १. हसिना बी शेख रसुल २. नसीहा बी मोहम्मद स्माईल ३. अमिना परविन मोहम्मद सलिम ४. फतेमा बी अब्दुल खालिक ५. शेख रउफ शेख रसुल ६. नझिमा परविन अब्दुल माजिद ७. झाकिया परविन सयद इकबाल ८. शेख आरिफ शेख रसुल ९. आयेशा बानो माजिद अख्तर १०. अरिफा बानो अजहर परवेज ११. फौजिया परविन शेख रसुल १२. मोहम्मद जावेद शेख रसुल रा. अर्जदार क. १,३ ते ५ आणि ७ ते १२, सर्व रा. लोकहिंत बँक जवळ, खंगार पुरा, जि. अकोला. व अर्जदार क. २ फिरदोस कॉलनी, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शेख रसुल शेख भोलू उर्फ शेख रसुल शेख भोलू
**पत्ता :-** रा. लोकहित बँक जवळ, खंगार पुरा, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शेख रसुल शेख भोलू उर्फ शेख रसुल शेख भोलू यांचे दि. ३१/१२/२००४ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ३०/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५४३/२०२५ — प्रोसेस नं.१३७७०/२०२५
चौ.ता. २९/०९/२०२५ — दिनांक : १३/०८/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती निर्मला श्रीक्रिष्णा ठाकरे २. श्री. प्रशांत श्रीक्रिष्णा ठाकरे ३. श्री प्रविण श्रीक्रिष्णा ठाकरे तिघेही रा. बारा ज्योर्तिलिंग मंदिराजवळ, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. श्री प्रफुल श्रीक्रिष्णा ठाकरे रा. श्रेयस हाईटस फ्लॅट नं. ५०९, भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे. ४१२३०८

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीक्रिष्णा दामोदर ठाकरे
**पत्ता :-** रा. बारा ज्योर्तिलिंग मंदिराजवळ, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीक्रिष्णा दामोदर ठाकरे यांचे दि. ०९/०८/२०२० रोजी राहते घरी पळसो खुर्द येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २९/०९/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# शहरातील ऑटोचालकांना वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या वतीने ऑटो रिक्षा युनियन अध्यक्ष व ऑटोचालकांना प्रवासी वाहतूक करताना घ्यावयाची काळजी तसेच वाहतूक नियमांबाबत समुपदेशन करण्यात आले.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज बहुरे यांनी शहर वाहतूक शाखेत झालेल्या या समुपदेशनात ५५ पेक्षा अधिक ऑटोचालक व ऑटो युनियन पदाधिकारी सहभागी झाले.

समुपदेशनात ऑटोचालकांनी गणवेश घालून वाहन चालविणे, विना परमिट ऑटो न चालविणे, बॅच सोबत ठेवणे, रस्त्यावर बेशिस्तरीत्या ऑटो न उभे करणे, फक्त निर्धारित ठिकाणीच ऑटो पार्क करणे, रस्त्यावर प्रवाशांना चढ-उतार न करणे तसेच ग्रामीण परमिट धारक ऑटो शहरात न आणणे याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच मूळ ऑटो मालकांनी आपले वाहन भाड्याने देताना नशा करणारे किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोकांना ऑटो देऊ नये, रात्रीच्या वेळी ऑटोमधून कोणत्याही प्रकारच्या गुन्हेगारीस वाव मिळणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचनाही देण्यात आल्या.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ऑटोचालकांविरुद्ध प्रादेशिक परिवहन विभाग व शहर वाहतूक नियंत्रण शाखेच्या संयुक्त विद्यमाने दि. १८ सप्टेंबर २०२५ पासून विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

वाहतूक शाखेकडून सर्व ऑटोचालकांना आवाहन करण्यात आले आहे की, वाहनांचे सर्व कागदपत्रे सोबत ठेवावेत, परवान्यापेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करू नये, प्रलंबित दंड असल्यास तो त्वरीत भरावा व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून नागरिकांना सुरक्षित प्रवास द्यावा.

# पोलिसांशी वाद घालणाऱ्या आरोपीची निर्दोष मुक्तता

■ प्रतिनिधी | अकोला ■

कोविड काळात नियमांचे उल्लंघन करून आपले ऑमलेट सेंटर चालविणाऱ्या तसेच पोलिसांना धमकावल्याचा आरोप असलेल्या आरोपीला चौथे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी आर. एस. सारूक यांच्या न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे.

सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याअंतर्गत नेहरू पार्क परिसरात आरोपी ए. ओ. खुकेकर हा रात्री उशिरापर्यंत आपली अंड्याची गाडी चालवित होता. त्यावेळी पोलिसांनी त्याला गाडी बंद करण्यास सांगितले असता त्याने पोलिसांशी वाद घालत अंगावर गरम तेल फेकून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप होता. कोविड काळातील सर्व नियमांचे उल्लंघन, अस्वच्छतेतून ऑमलेट विक्री, तसेच पोलिसांच्या कामात अडथळा निर्माण केल्याच्या गुन्ह्यांतर्गत त्याच्यावर भादंवीच्या विविध कलमान्वये कारवाई करण्यात आली होती. या खटल्यात आरोपीच्या वतीने विधीज्ञ संजय कमल अशोक देशमुख, विधीज्ञ अभिषेक आराधना रमेशचंद्र गौतम, विधीज्ञ ओम गीता गजानन मते व विधीज्ञ प्रणव आशा गंगाधर मारके पाटील यांनी जोरदार बाजू मांडली. बचाव पक्षाच्या प्रभावी युक्तिवादाचा व तर्कसंगत बचावाचा स्वीकार करत न्यायालयाने आरोपीस भविष्यातील अटी-शर्ती लिहून घेऊन खटल्यातून मुक्त केले.

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६३३/२०२५ — प्रोसेस नं.१४५४४/२०२५
चौ.ता. ०८/१०/२०२५ — दिनांक : २९/०८/२०२५

**अर्जदार :** १. किरण रामचंद्र पांडे रा. शारदा शाळे जवळ, बसेरा कॉलनी, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. २. नरेश रामचंद्र पांडे रा. आर्णी रोड, वडगांव, महाबली नगर, यवतमाळ

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : आशा रामचंद्र पांडे
**पत्ता :-** रा. बसेरा कॉलनी, मलकापूर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत आशा रामचंद्र पांडे यांचे दि. ११/०१/२०१७ रोजी राहत्या घरी बसेरा कॉलनी, मलकापूर, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. ०८/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६३१/२०२५ — प्रोसेस नं.१४५३८/२०२५
चौ.ता. १३/१०/२०२५ — दिनांक : २९/०८/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती निर्मलाबाई तुळशिराम जांभुळकर, २. मीरा सुनिल घटे सर्व रा. पोस्ट गांधीनगर, खडकी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तुळशिराम शिवराम जांभुळकर
**पत्ता :-** रा. पोस्ट गांधीनगर, खडकी, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तुळशीराम शिवराम जांभुळकर यांचे दि. २६/०४/२०२५ रोजी राहत्या घरी पोस्ट गांधीनगर, खडकी, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १३/१०/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०८/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## संक्षिप्त



### शिवसेनेतर्फे सामाजिक उपक्रमात विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**हिंगणघाट-** उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या कार्यप्रणालीसोबतच ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या बाळासाहेब ठाकरे व आनंद दिघे यांच्या विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी हिंगणघाटात सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. डॉ. निलम गोऱ्हे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्र. ११ मधील लोकमान्य टिळक प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना चित्रकला वही, स्केचपेन, पाण्याच्या बाटल्या व बिस्किटांचे वाटप करण्यात आले. या शाळेची पीएमश्री योजनेत निवड झालेली असून ती जिल्ह्यातील एकमेव शाळा आहे.या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा संपर्कप्रमुख राज दिक्षित, जिल्हाप्रमुख राजेश सराफ व शुभांगी ठमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तर विधानसभा प्रमुख राजू हिंगमिरे यांच्या पुढाकाराने व तालुका प्रमुख अमित गावंडे यांच्या नेतृत्वाखाली झाले. शाळेचे मुख्याध्यापक गिरीधर कोठेकर यांनी पीएमश्री योजनेचे महत्व अधोरेखित करताना शाळेतील काही कमतरता मांडल्या. या प्रसंगी तालुका प्रमुख अमित गावंडे व सोनाली गावंडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप झाले. कार्यक्रमाला शिवसेना महिला शहरप्रमुख सुनिता तांबोळी, शहर समन्वयक अमित काळे, उपशहरप्रमुख कुलभूषण वासनिक, विभागप्रमुख सतीश तांबोळी, युवासेना उपजिल्हाप्रमुख दिनेश काटकर, शहरप्रमुख अक्षय निकम, विक्रांत राऊत, चव्हाण,आडकिणे ,कोठेकर, शाळा समितीच्या सदस्य तसेच पालक उपस्थित होते.

### तलवार,चाकूसह दुचाकी जप्त

**वर्धा-** दहेगाव पोलिसांनी धपकी रोडवर कारवाई करत २६ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. मयुर गुलाबराव गलांडे, रा. धपकी असे आरोपीचे नाव असून त्याच्याकडून तलवार, चाकू व दुचाकी जप्त करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली.

### किरकोळ वादातून काठीने हल्ला

**हिंगणघाट-** तालुक्यातील सातेफळ येथे किरकोळ वादातून एका व्यक्तीवर जीवघेणा हल्ला झाला. राजू विठ्ठल पावडे (४२) असे जखमीचे नाव असून त्याच्या डोक्यावर काठीने वार करण्यात आला. आरोपी सचिन हरिभाऊ मुजबैले व दिलीप बांगडे (दोन्ही रा. सातेफळ) अशी असून, राजूने सचिनला 'माझ्या काकाला दारू पिण्यास घेऊन जाऊ नको' असे सांगितल्याच्या रागातून हल्ला केल्याचे समजते.

### विष प्राशन केलेल्या युवकाचा मृत्यू

**देवळी-** तालुक्यातील चिखली येथील युवकाने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. आशिष काशिनाथ थूल (३२) असे मृत युवकाचे नाव असून त्याने विष प्राशन केले होते. नातेवाईकांनी त्याला तत्काळ सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. देवळी पोलिस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे.

# आजपासून 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'

## पालकमंत्र्यांच्याहस्ते अभियानाचा शुभारंभ

**वर्धा/जनमाध्यम**

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू करण्यात आलेले मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात येणार आहे. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत राबविण्यात येत असलेल्या या अभियानाचा शुभारंभ पालकमंत्री डॉ. भोयर यांच्याहस्ते आज सालोड येथे होणार आहे. अभियानात ग्रामपंचायती व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत गावांना समृद्ध बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अभियान विविध विभागांना एकत्र आणून गावांच्या समस्यांचे निराकरण करेल आणि गावातील लोकांना लोकसहभागातून विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करेल. अभियानाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व ५२१ ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.पालकमंत्री यांच्या हस्ते ग्रामपंचायत, सालोड हिरापुर येथे अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ होणार आहे. तसेच तालुकास्तरावर आमदारांच्याहस्ते त्यांच्या कार्यक्षेत्रात येत असलेल्या एका ग्रामपंचायतीमध्ये तालुकास्तरीय शुभारंभ होणार आहे.या अभियानाचे प्रमुख घटक सुशासन युक्त पंचायत तयार करणे, स्वनिधी व सामाजिक दायित्व निधीतून ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गांव, मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण, गावातील संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास, सामाजिक न्याय, लोकसहभाग व श्रमदान यांच्या माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे हे आहेत. अभियानाच्या प्रमुख वैशिष्ट्यांमध्ये विविध विभाग जसे कृषी, शिक्षण, आरोग्य, रस्ते, स्वच्छता, जलव्यवस्थापन आणि इतर अनेक विभागांचे कार्य या अभियानात समन्वित केले जाईल. योजनेत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार दिले जाणार आहे. योजनेंतर्गत ग्रामपंचायतीने १०० गुणांचे मूल्यांकन होईल. मुल्यांकनामध्ये गावातील स्वच्छतेपासून ते पाणी व्यवस्थापनापर्यंत, आरोग्य सुविधांपासून ते शिक्षणापर्यंत अनेक बाबींचा समावेश असेल. अभियानासाठी ग्रामपंचायतींना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक गावासाठी एक विशेष कार्य अधिकारी मदत करेल. अभियानांतर्गत गावांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यात गावांमधील पाणीटंचाई, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती अशा बाबींचा समावेश आहे. जिल्ह्यातील सर्व अधिकारी, ग्रामस्थांनी या अभियानाला यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केले आहे.

# पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने झाड लावणे गरजेचे-तडस

**देवळी/जनमाध्यम**

वसुंधरा पायी दिंडीचे देवळी शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. या वेळी माजी खा. रामदास तडस यांनी पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्यांचे संगोपन करणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.



कार्यक्रमाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तडस यांनी नागरिकांना आवाहन केले की पाणी, वीज आणि इंधन यांचा काटकसरीने वापर करावा, प्लास्टिकचा वापर टाळावा व सामुदायिक उपक्रमांमधून पर्यावरण रक्षणात सहभागी व्हावे.

नाणीजधामला दिंडीची सांगता रामानंद संप्रदायाच्या वतीने नागपूर येथून १२ सप्टेंबरला सुरू झालेली वसुंधरा पायी दिंडी रत्नागिरीतील श्री क्षेत्र नाणीजधाम येथे २१ ऑक्टोबर रोजी दाखल

होणार आहे. त्या दिवशी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या वाढदिवसाचा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. दिंडीचे स्वागत व उपस्थित मान्यवर दिंडी देवळी येथे दाखल झाल्यावर माजी खासदार तडस व त्यांच्या पत्नी शोभा तडस यांनी स्वागत केले.

यावेळी समाजसेवक मोहन अग्रवाल, पोलिस निरीक्षक अमोल मडाळकर, माजी उपनगराध्यक्ष डॉ. नरेद्र मदनकर, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

**ऑक्सिजनसाठी झाडे महत्त्वाची –** पोलीस निरीक्षक अमोल मडाळकर यांनी झाडे ही कार्बन डायऑक्साईड शोषून माणसांना शुद्ध ऑक्सिजन देतात, त्यामुळे प्रत्येक शाळा व समाजाने झाडे लावण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले.

**मानवजातीच्या अस्तित्वासाठी झाडे गरजेची** –समाजसेवक मोहन अग्रवाल यांनी झाडे वाचवणे म्हणजे जग वाचवणे असल्याचे सांगितले. आजच्या प्रदूषित परिस्थितीत वृक्षारोपण हाच मानवजातीच्या अस्तित्वाचा मार्ग असल्याचे त्यांनी नमूद केले.

# नागपुरात उद्या ओबीसी मेळावा; छगन भुजबळ करणार मार्गदर्शन

**हिंगणघाट/जनमाध्यम**

महात्मा फुले समता परिषद व विविध ओबीसी संघटनांच्या वतीने ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी व अन्यायकारक शासन निर्णयाला विरोध करण्यासाठी १८ सप्टेंबर रोजी नागपुरात मोठा ओबीसी मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात ओबीसी नेते तथा माजी मंत्री छगन भुजबळ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

राज्य शासनाने २ सप्टेंबर रोजी घेतलेल्या निर्णयानुसार मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गात आरक्षणाचा लाभ देण्याची घोषणा करण्यात आली. या निर्णयाविरोधात ओबीसी, विजेएनटी, एसबीसीसह विविध बहुजन संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, हा निर्णय संविधान व उच्च न्यायालयाच्या निकालांच्या विरोधात असल्याचा आरोप केला आहे.या पार्श्वभूमीवर महात्मा फुले सभागृह, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले मार्ग, रेशीमबाग, नागपूर येथे दुपारी ३ वाजता हा मेळावा होणार आहे. ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी लढा उभारण्याचे आणि आरक्षणाचे रक्षण करण्याचे आवाहन यावेळी करण्यात येणार आहे.या मेळाव्यासाठी राज्य उपाध्यक्ष प्रा. दिवाकर गमे, विशाल हजारे, विनय डहाके, प्रा. जगदीश जूनगरी, प्रा. विजय लोणबले, राजू साखरकर, मनोज गणोरकर, सचिन मोहोड, योगेश ठाकरे, किरण कडू, निलीमा घाटे, अरुण भेदे, विष्णू नागरिक आदी पदाधिकाऱ्यांसह महात्मा फुले समता परिषदेने ओबीसी बहुजनांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा-**शहरातील गोंडप्लॉट भागात एक तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रवी सुधाकर लांजेवार (२६) असे मृतकाचे नाव असून, त्याला दारू पिण्याची सवय होती.मिळालेल्या माहितीनुसार, रात्री रवी दारू पिण्यासाठी घरातून बाहेर पडला होता. मात्र तो परत न आल्याने घरच्यांना काळजी वाटू लागली. दरम्यान, घराच्या मागे उभ्या असलेल्या मालवाहू वाहनाच्या अँगलला त्याने नायलॉन दोरी बांधून गळफास घेतला.परिसरातील नागरिकांच्या लक्षात ही बाब आल्यावर त्यांनी तातडीने त्याच्या पत्नीला माहिती दिली. घटनास्थळी धाव घेण्यात आली असता रवी गळफास घेतल्याच्या अवस्थेत मृत आढळून आला. नागरिकांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली.या घटनेमुळे गोंडप्लॉट परिसरात शोककळा पसरली आहे.

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत महिलांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढविणे आणि त्यांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्वस्थ नारी, सशक्त परिवार हे विशेष अभियान १७ सप्टेंबर ते २ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी व मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केले आहे.




या शिबिरांमध्ये ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठी मोफत तपासणी, उपचार आणि समुपदेशन सेवा पुरविण्यात येणार आहे. यामध्ये महिलांच्या मुखाचा, स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी तपासणी, रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन तपासणी केली जाणार आहे. गर्भवती महिलांची प्रसूती संबंधी तपासणी, गर्भधारणाविषयी मार्गदर्शन तसेच मातांसाठी व बाल संगोपनासाठी उपयुक्त साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता, पोषण, लसीकरण, याबाबत जनजागृती करून त्यांना आरोग्याविषयी योग्य समुपदेशन दिले जाणार आहे.याशिवाय महिलांची एनसीडी तपासणी, मानसिक आरोग्य तपासणी तसेच इतर सर्वसामान्य आजारांवरील तपासणी, उपचार व मार्गदर्शन मोफत केले जाणार आहे. विशेष म्हणजे आदिवासी भागातील महिलांना सिकलसेल स्क्रिनिंग, हिमोग्लोबिन इलेक्ट्रोफोरेसीस तपासणी आणि आवश्यक औषधोपचार पुरविण्यात येणार आहेत. अभियानादरम्यान जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १८३ उपकेंद्रे, आयुर्वेदिक व एलोपॅथिक दवाखाने तसेच शहरी आरोग्य केंद्रांमध्ये मोफत शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांत तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली महिलांचे आरोग्य तपासले जाईल.अभियानात जिल्ह्यातील सर्व सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि आरोग्यवर्धिनी केंद्रे सहभागी होणार आहेत. मोहिमेमुळे महिलांना गंभीर आजारांचे लवकर निदान होऊन वेळेवर उपचार सुरू करण्यास मदत होईल. तसेच महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होऊन कुटुंबाच्या सुदृढतेस हातभार लागेल, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वपनिल बेले यांनी कळविले आहे.

# हिंगणघाट हेरॉनरीत तब्बल १०७३ घरटी

## विदर्भातील सर्वात मोठी वसाहत

**हिंगणघाट/जनमाध्यम**

हिंगणघाट तालुक्यातील सारंगागार (हेरॉनरी) मध्ये यंदाच्या हंगामात तब्बल १०७३ घरटी मोजण्यात आली आहेत. दोन टप्प्यांत झालेल्या या घरटी गणनेत प्रथम ९१५ तर दुसऱ्या टप्प्यात १५८ घरटी नोंदली गेली. त्यामुळे ही हेरॉनरी विदर्भातील सर्वाधिक प्रजनन करणारी वसाहत ठरली आहे.हिंगणघाटातील ही हेरॉनरी पक्षी संवर्धनासाठी महत्वाची मानली जात असून विदर्भातील निसर्ग पर्यटनासाठीही आकर्षण ठरत आहे.

**प्रजननाचा दुर्मीळ नजारा-** प्रजनन हंगाम तीन-तीन महिन्यांच्या दोन टप्प्यांत पार पडतो. पहिल्या टप्प्यात पानपक्षी



आणि पाणपक्षी घरटी करून पिल्लांना जन्म देतात व निघून जातात. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात नवे पक्षी त्याच झाडांवर घरटी करतात. या घरट्यांमुळे हिंगणघाटातील हेरॉनरीत नैसर्गिक समतोलचं विलक्षण चित्र अनुभवायला मिळत आहे.

**वसाहतीचा विस्तार**-मागील वर्षी ३४ वृक्षांवर असलेली ही मिश्र वसाहत यावर्षी वाढून ३९ वृक्षांवर पोहोचली आहे. पाणपक्षी प्रजननासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने येथे येत असल्याने संवर्धनासाठी नवीन झाडांची लागवड करण्याची आवश्यकता असल्याचो निरीक्षण निसर्गप्रेमींकडून व्यक्त करण्यात आले आहे.

**पक्षीप्रेमींचा सहभाग**-या घरटी गणना उपक्रमात निसर्गसाथी फाउंडेशन, महाराष्ट्र पक्षीमित्र वर्धा जिल्हा तसेच नागपूर, वर्धा आणि हिंगणघाट येथील पक्षी अभ्यासकांनी सहभाग घेतला.

प्रवीण कडू, नागपूर विभागाचे विदर्भ समन्वयक राहुल वकारे, माजी वनपाल अशोक भानसे, ज्ञानचंद गडवाणी, नितीन भोगल, पंचशील थूल, एम. एस. आर. शाद, यशवंत शिवणकर, समीर बक्ष, संतोष धनरेल, वासुदेव पडवे व अंजोर कडू आदी निसर्गप्रेमी उपस्थित होते.हिंगणघाटातील ही हेरॉनरी पक्षी संवर्धनासाठी महत्वाची मानली जात असून विदर्भातील निसर्ग पर्यटनासाठीही आकर्षण ठरत आहे.

# आर्वीतील निरंजन टकले यांचे व्याख्यान रद्द

**आर्वी/जनमाध्यम**

सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे कार्यरत सुप्रसिद्ध विधीज्ञ ॲड. सिद्धार्थ अशोकराव शिंदे यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या जाण्याने आर्वी परिसरात शोककळा पसरली आहे.या घटनेमुळे स्व. आ. डॉ. शरदराव काळे स्मृती सेवा प्रतिष्ठान, आर्वीतर्फे १७ सप्टेंबर २०२५ रोजी, बुधवार आयोजित करण्यात आलेले निरंजन टकले यांचे जाहीर व्याख्यान रद्द करण्यात आले आहे.स्व. आ. डॉ. शरदराव काळे स्मृती सेवा प्रतिष्ठानतर्फे तसेच आर्वीकरांतर्फे शिंदे व काळे कुटुंबीयांप्रती गहिरा शोक व्यक्त करण्यात आला आहे.

# सावंगी मेघे रुग्णालयात विनोबा भावे जयंती



**वर्धा/जनमाध्यम**

सावंगी मेघे येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात भूदान चळवळीचे प्रणेते, गांधीविचारक तथा स्वातंत्र्य संग्राम सेनानी आचार्य विनोबा भावे यांची १३० वी जयंती साजरी करण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे आद्य अनुयायी असलेल्या विनोबा भावे यांनी समग्र विकासासोबतच पारंपरिक व आधुनिक ज्ञानाची सांगड घालत मांडलेला आरोग्यसेवेचा आणि मूलभूत शिक्षणाचा विचार आजही भारतीयांसाठी उपयुक्त व दिशादर्शक असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. यावेळी रुग्णालय समूहाचे संचालक डॉ. चंद्रशेखर महाकाळकर, विशेष कार्य अधिकारी संजय इंगळे तिगावकर, सनदी लेखापाल हिमांशू जैन, रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी राजेश सव्वालाखे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी डॉ. रुपाली नाईक, संदीप कुतरमारे, रितेश गुजरकर, अमित जैन, रौनक मिश्रा, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते राकेश अगडे, नितेश बुरबुरे, गुंजन मेंढुले, निलेश ठाकरे, मदन भुरकुंडे आदींनी विनोबांना आदरांजली अर्पण केली.

# वर्ध्यात 'IKS ज्ञान महोत्सव' मधून जागतिक विक्रम!

## विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला दिला नवा आयाम; तब्बल ६३५ मॉडेल्सना एशिया बुक ऑफ रेकॉर्ड

**वर्धा/जनमाध्यम**

भारतीय ज्ञानपरंपरेच्या पुनरुज्जीवनाचा दीप प्रज्वलित करत जिल्ह्याने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सेवाग्राम येथील चरखागृह येथे आयोजित 'IKS ज्ञान महोत्सव- वर्ल्ड रेकॉर्ड उपक्रम' अंतर्गत तब्बल ६३५ मॉडेल्सना एशिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये स्थान मिळाले आहे.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था डाएट, शिक्षण विभाग, सनशाईन सेल फाऊंडेशन, सेल



अकॅडमी आणि विद्याभारतीच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव पार पडला. या दोन दिवसीय कार्यक्रमात जिल्ह्यातील १ हजार ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेत भारतीय ज्ञान प्रणालीवर आधारित ७०७ मॉडेल्स सादर केली. त्यापैकी ६३५ प्रकल्पांना अधिकृत वर्ल्ड रेकॉर्डची मान्यता मिळाली आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी प्राचीन भारताच्या ज्ञान विज्ञानक्षेत्रातील अमूल्य ठेवा आपल्या प्रकल्पांमधून सादर केला.वैदिक, गणित, आयुर्वेद, खगोलशास्त्र, जलसंवर्धन, धातुकर्म, वास्तुशास्त्र, संगीत आणि नृत्य, प्राचीन कृषी प्रणाली, आयुर्वेद व रसशास्त्र, खगोलशास्त्र व कालमापन यांसारख्या विविध विषयांवरील मॉडेल्सनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. दैनंदिन जीवनातील नवकल्पना व प्राचीन साधनांचे आधुनिक उपयोग दाखवणाऱ्या प्रकल्पांनी विशेष आकर्षण निर्माण केले.या महोत्सवाला ८ हजाराहून अधिक नागरिकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलाकृती, संशोधन वृत्ती आणि सादरीकरण कौशल्याचे कौतुक केले. इंडिया व एशिया बुक ऑफ रेकॉर्डचे ॲडज्युकेटर शमनोज तत्वादी यांनी स्वतः या प्रकल्पांची तपासणी करून अधिकृत घोषणा केली. विद्यार्थ्यांचा सन्मानसर्व सहभागी विद्यार्थ्यांना वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र व मेडल्स प्रदान करण्यात आले. विशेष म्हणजे, सर्व विद्यार्थ्यांची नावे इंडिया आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये कायमस्वरूपी नोंदवण्यात आली आहेत, ही त्यांच्यासाठी एक अविस्मरणीय बाब ठरली आहे.या यशस्वी उपक्रमासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर,जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, शिक्षणाधिकारी माध्यमिक जयश्री घारफळकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक महेंद्र गजभिये आणि डाएटचे मार्गदर्शन व सहकार्याचा मोलाचा वाटा राहिला. तसेच या उपक्रमासाठी सनशाईन सेल फाऊंडेशनच्या संचालिका पल्लवी पाटोदकर बोदिले व सुरज बोदिले यांनी विशेष मेहनत घेतली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक २९०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# प्रारूप प्रभाग रचनेवर १३० आक्षेप

## -अंतिम दिवशी सर्वाधिक ७० अर्ज

### -सुनावणी नंतर घोषित होणार अंतिम प्रभाग रचना

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रक्रिया सुरू झाली आहे. महानगरपालिका प्रशासनच्यावतीने ३ सप्टेंबर रोजी प्रारूप प्रभाग रचना घोषित केली होती. त्यावर आक्षेप दाखल करण्यासाठी सोमवार १५ सप्टेंबर अंतिम दिवस होता. अंतिम दिवसा पर्यंत आज १३० आक्षेप दाखल करण्यात आले आहे. सर्वाधिक ७० आक्षेप सोमवारी दाखल झाले. शनिवार पर्यंत ६० आक्षेप होते. अंतिम दिवशी सर्वाधिक ७० आक्षेप दाखल झाले आहे.



अशात प्रारूप प्रभाग रचनेवर मनपा निवडणूक विभागाकडे १३० आक्षेप दाखल झाले आहे. यावर जिल्हाधिकारी आणि सक्षम अधिकायासमोर सुनावणी केली जाईल. एकेक करून आक्षेपांचा निपटारा करण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव शिफारस सोबत पुन्हा नगररचना विभागाच्या माध्यमातून राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवला जाणार आहे. निवडणूक आयोग अंतिम अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यासह निवडणुकीची अधिसूचना घोषित करणार आहे. यामुळे आता जिल्हाधिकारी यांच्या सुनावणीवर सर्वांच्या नजरा लागलेल्या आहे. आक्षेपचा निवाडा करून प्रभाग रचनेमध्ये कोणते परिवर्तन केले जाते हे पाहणे गरजेचे आहे. येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीसाठी २०१७ प्रभाग रचनेची नक्कल करण्यात आली होती. आता यामध्ये काही परिवर्तन केले जाते की, त्याच प्रभाग रचनेला जसे चे तसे ठेवले जाते याकडे सर्वांचे लक्ष आहे.

# विद्यापीठातील व्यवस्थापन विभागात राष्ट्रीय कार्यशाळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील व्यवसाय अध्ययन व प्रशासन विभागाच्यावतीने व यूजीसी – मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र आणि महाराष्ट्र राज्य फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'इन्स्टिट्युशनल गव्हर्नमेंट अँड मॅनेजमेंट' या विषयावर १६ ते १९ सप्टेंबर दरम्यान राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेची थीम इन्स्टिट्युशनल गव्हर्नन्स अँड लिडरशील : बिल्डिंग फ्युचर रेडी मॅनेजर्स अशी असून, शैक्षणिक संस्था व व्यवस्थापन क्षेत्रातील भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम असे भविष्योन्मुख व्यवस्थापक घडविणे हा या कार्यशाळेचा प्रमुख हेतू आहे.

कार्यशाळेत देशभरातील ख्यातनाम प्राध्यापक, संशोधक व तज्ज्ञ मार्गदर्शन करणार असून, सहभागींसाठी ही एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक संधी ठरणार आहे. त्यामुळे या कार्यशाळेला उपस्थित राहून प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एम.बी.ए. विभागप्रमुख तथा कार्यशाळेचे समन्वयक डॉ. दिपक चाचरकर यांनी केले आहे.

# सार्वजनिक बांधकाम अभियंत्याला घेराव

## -राजकमल उड्डाणपूल पूलासंदर्भात युवक काँग्रेसचे 'जवाब दो आंदोलन'

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजकमल-रेल्वे स्टेशन उड्डाणपूल पूल निर्माण कार्यासंबंधीत अद्यापही सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिका जनतेसमोर आली नाही. ही भूमिका जाहीर करण्याच्या मागणीसाठी युवक काँग्रेसने आज सोमवारीं १५ सप्टेंबर रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंताला घेराव घातला आणि प्रशासनाची भूमिका सार्वजनिक करण्याची मागणी केली.तसेच विस्तृत निवेदन सादर केले.

राजकमल उडानपूल काही दिवसांपूर्वी शिकस्त व जर्जर असल्याचे सांगून सार्वजनिक बांधकाम विभागाने अवजड वाहनांना पुलावरून बंद केली होती. त्यानंतर दोन महिन्याचा अवधी जाताच त्याच पुलावरून दोन चाकी, तीन चाकी आणि पदचारणाऱ्यांना ही बंदी करण्यात आली. एवढेच नव्हे तर राजकमल चौकातून प्रवेशित आणि हमालपुरा कडून प्रवेशित मध्य मार्गावर पाच पाच फुटाच्या दोन भिंती उभारल्या. विशेष म्हणजे राजकमल-रेल्वे स्टेशन उड्डाणपूल



वाहतुकीसाठी बंद करण्यात आला, परंतु खाली सर्व बोगद्यांमधून निर्विघ्न वाहतूक सुरूच आहे. त्यामुळे हा पूल वरून शिकस्त आहे का असा प्रश्न सर्वांना पडला आहे. युवक काँग्रेसने या संदर्भात आंदोलनही केले आणि पालकमंत्र्यांना घेराव घालून निवेदन सोपवले होते. परंतु प्रशासनाकडून कुठलेही उत्तर मिळाले नसल्याने आज युवक काँग्रेसने कार्यकारी अभियंताला घेराव घालून निवेदन सोपविले. जर उड्डाणपूल पूल संदर्भात विभागाने भूमिका स्पष्ट केली नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. यावेळी माजी नगरसेवक मुन्ना राठोड, समीर जवंजाळ, वैभव देशमुख, आशिष यादव, अक्षय साबळे, सादर कलाने, निखिल बिजवे, चैतन्य गायकवाड ,शुभम बांबल, आकाश धुराटकर ,निशांत देशमुख, साहिल वानरे, अभिषेक भोसले, कुणाल गावंडे, निलेश देशमुख, धनंजय बोबडे, सम्यक वाकोडे, निलेश देशमुख, धनंजय बोबडे, शिवम हिवसे, कौस्तुभ देशमुख, मोहित भेंडे, संकेत भेंडे, केदार भेंडे आदि उपस्थित होते.

# सेवा पंधरवड्यात नागरिकांनी सहभागी व्हावे

## - उपविभागीय अधिकारी अनिल भटकर

**अमरावती/प्रतिनिधीः-** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे, अशी माहिती अमरावतीचे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी दिली आहे.

या पंधरवड्यात तीन टप्प्यांमध्ये विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात पाणंद रस्त्यांची मोहीम हाती घेण्यात येईल, ज्यात गावातील सर्व रस्त्यांची यादी तयार करून १७ सप्टेंबर रोजी ग्रामसभेत ती अंतिम केली जाईल. अतिक्रमण झालेल्या रस्त्यांचे सीमांकन भूमी अभिलेख विभागाकडून करण्यात येईल आणि त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. या रस्त्यांना क्रमांक देऊन त्यांच्या नोंदी गावदप्तरात घेण्यात येतील. १७ सप्टेंबरपासून पाणंद रस्त्यांवर वृक्षारोपणही केले जाईल.

दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमांतर्गत घरे बांधण्यासाठी उपलब्ध असलेली शासकीय जमीन कब्जे हक्काने दिली जाईल. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमांनुसार नियमित केली जातील आणि धारकांना पट्टे वाटप केले जातील.

तिसऱ्या टप्प्यात 'आदिसेतू' अभियानांतर्गत मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे आणि विविध योजनांचा लाभ दिला जाईल. तसेच, 'गाव तिथे स्मशानभूमी' या मोहिमेअंतर्गत प्रत्येक गावामध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून दिली जाईल. 'जिवंत सात बारा' मोहिमेअंतर्गत मयत व्यक्तीचे नाव कमी करून वारसाचे नाव लावणे आणि सातबारावरील अनावश्यक नोंदी कमी करण्याची कामेही केली जातील.

**सृजन हॉस्पिटल मध्ये स्टॉफ पाहिजे**

- ANM, GNA- Sister

पत्ता- रघुवीर सोसायटी, साईनगर, मेन रोड, अमरावती
फोन नं.- ९१११२०५४१५०
भेटण्याची वेळ
सकाळी - ११ ते १२
संध्याकाळी - ७ ते ८

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०७५/२०२५
**श्रीमती शेख आशिक अधिक सहा -वि- निरंक**
पुढील ता.१६.१०.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Shekh Aashique S/o Shekh Hasan, Age 63 Yrs. Occu.: Business
2. Shaikh Aqueel S/o Shaikh Hasan, Age 59 Yrs. Occu.: Business
3. Shekh Shakeel S/o Shekh Hasan, Age 52 Yrs. Occu.: Business
4. Shaikh Naseer S/o Shaikh Hasan, Age 50 Yrs. Occu.: All R/o Near Dargah, Nalsaheb Pura, Amrvati. Tq. Dist. Amravati
5. Saira Bano W/o Anwar Husain Khan, Age 59 Yrs. Occu.: Household R/o Jameel Colony, Amravati. Tq. Dist. Amravati.
6. Nazera Parveen S/o Ameen Ahmed Khan, Age 48 Yrs. Occu.: Household R/o Muzaffar Pura, Amravati, Tq. Dist. Amravati.
7. Shaheda Parveen W/o Mohammad Aabid, Age 40 Yrs. Occu.: Household R/o Chaman Nagar, Old Town Badnera, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शेख हसन शेख याकुब** हे दिनांक 22.10.1997 रोजी Amravati येथे मयत झाले. व मयत **ताहेरा बी शेख हसन** ही दिनांक 25.12.2020 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **शेख आशिक अधिक सहा विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शेख आशिक अधिक सहा विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**
**वारसाचे प्रमाणपत्राबाबत जाहीरनामा**

किरकोळ आर.एम.जे.सी.क्र.२४४/२०२५ ने.ता.०१.१०.२०२५

अर्जदार :
१. रुपाली मंगेशराव वावगे,
२. कृषिका मंगेशराव वावगे,
३. संकेत मंगेशराव वावगे,
४. इंदिरा बाबाराव वावगे,
सर्व रा.घारफळ, पो.सार्सी कोठोडा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

-- विरध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी **मयत मंगेश बाबाराव वावगे** यांचा मृत्यू दिनांक २५.०२.२०२४ रोजी घारफळ, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे दि.२८.०६.२०११ रोजी मृत्यू झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी आहे व अर्जदार नं.२ व ३ ही मुले आहेत. तसेच अर्जदार नं.४ ही आई आहे. मयत यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०७७/२०२५
**अनिस -वि- निरंक**
पुढील ता.१७.१०.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
१. अनिस खान युनूस खान, वय ३६ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.गफ्फार रारानी हाऊस, हैदरपुरा, अमरावती
२. राफत अफरोज अफसर खान, वय ३८ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.मदरासी बाबा मस्जिद जवळ, हैदरपुरा, अमरावती
३. अगवान इशरत इब्राहीमभाई, वय ३३ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.शाहिगरा कॉलनी पाटण वेरावळ, जि.जुनागढ गुजरात
४. नुसरत अफरोज सयद नजीम, वय ३२ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.मदरासी बाबा मस्जिद जवळ, हैदरपुरा, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **युनूस खान शहेबाज खान** हे दिनांक 18.06.2020 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अनिस खान युनूस खान व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनिस खान युनूस खान व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज -२०७०/२०२५**
**श्रीमती शुभांगी अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख १६.१०.२०२५**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. **शुभांगी नितिनराव चरडे,** वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम,
२. **केदार नितिनराव चरडे,** वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण
दोघेही रा.१०१, अथर्व अपार्टमेंट, अतुल मंगल कार्यालयाच्या मागे, रुक्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. **विमल गुणवंत चरडे,** वय ७७ वर्षे, धंदा - गृहिणी रा.वार्ड नं.४, मु.पो.तळेगाव ठाकुर, ता.तिवसा, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार - निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत नितिन गुणवंतराव चरडे हे दि.२१.०६.२०२४** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार शुभांगी अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती शुभांगी अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १२.०९.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

---

**सायटेशन/जाहीरनामा**
**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.५५८/२०२५ ने.ता.२६.०९.२०२५

अर्जदार -
१. **भाऊराव कसदनराव उर्फ कचदन गाडे,** वय ५५ वर्षे, धंदा - शेती
२. **अजाब कसदनराव उर्फ कचदन गाडे,** वय ५० वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.लाडकी बुद्रुक, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. **निर्मला जनार्दन वानखडे,** वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम रा.अमरावती, ता.जि.अमरावती
४. **माणिकराव कसदनराव उर्फ कचदन गाडे (मयत) तर्फे वारस-**
४अ) **सुनिल माणिकराव गाडे,** वय ४५ वर्षे, धंदा - शेती
४ब) **अनिल माणिकराव गाडे,** वय ४२ वर्षे, धंदा - शेती
५. **देवराव कसदनराव उर्फ कचदन गाडे (मयत) तर्फे वारस-**
५अ) **दिनेश देवराव गाडे,** वय ३५ वर्षे, धंदा - शेती
क्र.४ अ ते ५ अ रा.लाडकी बुद्रुक, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
निल

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१,२ व ३ यांची आई, तर अर्जदार क्र.४अ,४ब व ५ अ यांची आजी नामे **अंजनाबाई कसदन उर्फ कचदन गाडे** हिचा **दि.१७/०९/२०१०** रोजी लाडकी बु.ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. तसेच मयतांचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- २५/०८/२०२५**

शिक्का
आदेशानुसार,
**(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय,क.स्तर मोर्शी

---

**( C.J.J.D.) मा.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२२४/२०२५** **ने.ता.१७.१०.२०२५**

**अन्नपूर्णा // वि // निरंक**

१. **अन्नपूर्णा रामजी मेश्राम,** रा.आसरा, ता.भातकुली, जि.अमरावती
२. **बाबुलाल रामजी मेश्राम,** रा.महालक्ष्मी नगर, अंबरनाथ पुर्व,ठाणे, ता.जि.ठाणे
३. **ममता सुदाम हिरेखन,** रा.हिंगलाज भवानी वार्ड, चंद्रपुर, ता.जि.चंद्रपुर
४. **सुनिता केशवराव गजभिये,** रा.गांधी नगर, दर्यापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती
५. **संगीता अरविंद घरडे,** रा.वार्ड नं.३,पुलगांव, जि.वर्धा

// वि //
निरंक

ज्याअर्थी **रामजी नारायण मेश्राम यांचा मृत्यू दि.०६.०५.२०२०** रोजी वेणी गणेशपुर, ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला असून ते तेथीलच **मुळ रहिवासी** आहेत. अ.क्र.१ मयत यांच्या पत्नी अ.क्र.२ मुलगा असून अ.क्र.३ ते ५ हया मयत यांच्या मुली आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०८ ऑगष्ट २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

**(Jt. C.J.J.D.) मा.सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर)**
**नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**कि.आर.एम.जे.सी.अर्ज क्र.२१३/२०२५** **ने.ता.०४.१०.२०२५**

**रमेश // वि // निरंक**

१. **रमेश भिमरावजी खंडागडे**
२. **गजानन भिमराव खंडागडे,**
अ.क्र.१ व २ रा.दाभा, ता.नांदगाव खंडे.जि.अमरावती

// वि //

निरंक

ज्याअर्थी **भिमराव श्यामराव खंडागडे यांचा मृत्यू दि.२६.०४.२०१२ रोजी दाभा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला** असून ते तेथीलच मुळ रहिवासी आहेत. अ.क्र.१ व अ.क्र.०२ मयत याची मुले आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०४ ऑगष्ट २०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

**जाहीर नोटीस**

प्रो.क्र.१६५३१/२०२५
दिनांक १५ सप्टें.२०२५

Appendix E, No.7
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shri R.M.Choutre
2nd Jt.CJSD, Amravati, AMRAVATI

**NOTICE TO SHOW CAUSE WHY EXECUTION SHOULD NOT ISSUE (0.21, R.16)**

Arbitration R.D.1380/2019
**Aditya Anagha Multistate Credit Co-operative Society Ltd. -Vs- Navin Chandrabhan Ghundiyal & Other**
NEXT DATE 27.10.2025

To,
1. Navin Chandrabhan Ghundiyal & Other
House No.53, 2nd Line, Dastur Nagar, Amravati.
Tq.Dist.Amravati (Maharashtra)
2. Shashikant Hemchandra Bonde,
Near Adv.Bhelande House, Rukhmini Nagar, Amravati.
Tq.Dist.Amravati (Maharashtra)

Whereas **Aditya Anagha Multistate Credit Cooperative Society Ltd.** has made application to this Court for execution of decree in Suit No., on the allegation that the said decree has been transferred to him by assignment or without assignment, this is to give you notice that you are to appear before this Court **2nd Jt.CJSD, Amravati** on the 27.10.2025, to show cause why execution should not be granted.

Given under my hand and the seal of the Court, this 12.09.2025.

शिक्का
**2nd Jt.CJSD, Amravati**

---

**जाहीर नोटीस**
**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५७८/२०२५ ने.ता.०१.१०.२०२५

अर्जदार -
१. श्रीमती संगीता श्रावण बोबडे, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम रा.कांडली, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
२. सौ.अनिता विजय भुजाडे, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम रा.गणेश लेआऊट, बहादुरा नागपूर, ता.जि.नागपूर

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदारचे वडील **नारायण भाऊराव निंभेकर** हे दि.**२८.०७.२०१८** रोजी धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदाराची आई **मैनाबाई नारायणराव निंभेकर,** ही दिनांक **२०.०२.१९८६** रोजी धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झाली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०८.०९.२०२५

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**जाहीर नोटीस**
**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.५७७/२०२५ ने.ता.०६.१०.२०२५

अर्जदार -
१. श्रीमती कावेरी नानाजी गोमकाळे, वय ८० वर्षे, धंदा - घरकाम
२. श्री.मोहन नानाजी गोमकाळे, वय ५७ वर्षे, धंदा - शेती
३. श्री.किशोर नानाजी गोमकाळे, वय ४७ वर्षे, धंदा - शेती
४. लता नानाजी गोमकाळे, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
सर्व रा.बोडणा, पो.खोपडा, ता.मोर्शी, जि.अमरावती
५. सौ.रेखा विजयराव सोनारे, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम रा.वऱ्हा, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ चे वडील **नामे नाना शामराव गोमकाळे** हे दि.**२३.११.२०१७** रोजी **बोडणा**, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ०८.०९.२०२५

शिक्का
आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१९५६/२०२५
**श्री.मनिष -वि- निरंक**
पुढील ता.२९.०९.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Manish S/o Babulal Sahu
Age 46 Yrs. Occu.: Business
R/o C/o Sajal Foot Wear, Mochi Galli, Chitra Chowk, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **बाबुलाल धरमु साहु** हे दिनांक 12.01.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **विमला बाबुलाल साहू** ही दिनांक 31.10.2023 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **मनिष विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मनिष विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०७४/२०२५
**श्री.सतीश अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.१६.१०.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Satish Ramkrushna Rajurkar, Age 55 Yrs. Occu.: Labour R/o Koltek Tq. Bhatkuli, Dist. Amravati.
2. Devendra Ramkrushna Rajurkar, Age 54 Yrs. Occu.: Labour
3. Gajanan Ramkrushna Rajurkar, Age 47 Yrs. Occu.: Labour
Both R/o Nimbhora Nagar, Sipna College Road, Near Nemani Godown, Amdapur, Amravati, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रामकृष्ण** S/O **मारोतराव राजुरकर** हे दिनांक 12.01.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **चंद्रकला** W/O **रामकृष्ण राजुरकर** ही दिनांक 02.08.2020 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **सतीश अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सतीश अधिक दोनविरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १२.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगरदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२०१८/२०२५
**श्री.प्रविण अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.०६.१०.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Pravin Shankarrao Marodkar, Age 50 Yrs. Occu.: Labour R/o Devikar Plot, Santoshi Nagar, VMV Amravati, Tq. Dist. Amravati.
2. Sarla Devidas Zimte (Before Marriage) Sarla Shankarrao Marodkar (After Marriage), Age 54 Yrs. Occu.: Household R/o Ward No.1, Mundnishankrao, Tq.Nandgaon Kh. Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शंकरराव बाजीराव मरोटकर** हे दिनांक 27.12.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **द्वारका @ दारका शंकर मारोटकर** ही दिनांक 02.08.2020 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाली. अर्जदार **प्रविण अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रविण अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १०.०९.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ग्रामिण जीवनमान उंचावण्यासाठी अभियान ठरणार प्रभावी- आ.तायडे

**अचलपूर/वार्ताहर**

राज्य शासनाच्या निर्णयानुसार अमरावती जिल्हयात तीन टप्प्यात १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या दरम्यान मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान राबविल्या जाणार असून या अभियानाची अंमलबजावणी यशस्वीपणे व्हावी याकरीता अचलपूर पंचायत समितीच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन स्थानिय अंबिका लॉन्स येथे संपन्न करण्यात आला.

यावेळी या कार्यशाळेत पंचायत समिती स्तरावरील सरपंच ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक, तांत्रीक संगणक सेवक, प्रामुख्याने सहभागी झाले होते.कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी मेळघाटचे आमदार केवलराम काळे, अचलपूर चे आमदार प्रविण तायडे, उपविभागीय राजस्व अधिकारी बळवंत अरखराव, तहसीलदार डॉ संजय गरकल, गटविकास अधिकारी सुधिर अरबट, कार्यशाळेचे मार्गदर्शक विस्तार अधिकारी भोजराज पवार प्रामुख्याने उपस्थित होते.याप्रसंगी विस्तार अधिकारी ईश्वरदास सातंगे, महादेव कासदेकर उपस्थित होते.मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून ग्रामिण भागातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरणार आहे. लोकसहभागातून नागरिकांना सेवा देणे, उपजिवीकेचे साधन निर्माण करणे हा शासनाचा प्रामुख्याने उद्देश्य आहे. त्यामुळे या योजनेची



अंमलबजावनी प्रभावीपणे करत कुठलेच राजकारण येऊ न देता गाव विकासाचा दुवा साधा असे आवाहन आ. प्रविण तायडे यांनी केले.पांदण रस्त्याबाबत कुठलाच दुजाभाव केल्या जाणार नाही. आतापर्यंत मतदार संघात जो पक्षपात झाला तो निश्चीतच केल्या जाणार नाही, शेतकऱ्यांना सुविधा कशा दिल्या जातील यावर आमचा भर असेल. याप्रसंगी उपविभागीय राजस्व अधिकारी बळवंत अरखराव यांनी सेवा पंधरवाडा उपक्रमा अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनेची माहिती उपस्थितांना दिली.

अचलपूर चे तहसीलदार डॉ. संजय गरकल यांनी पांदण रस्ते, घरकुल व स्मशानभूमी संदर्भातील माहिती देत लाभ घेण्याचे आवाहन केले. गटविकास अधिकारी सुधिर अरबट यांनी उपस्थित सरपंच व ग्रामसेवकांना आवाहन करतांना म्हटले की, अभियानाच्या सात मुख्य घटकांचा वापर करत गावाला विकासाकडे नेण्यासाठी शासनाने राबविलेल्या अभियानातून विविध पुरस्कारही प्राप्त करा याकरीता मोठ्या प्रमाणात निधी शासनाने घोषित केल्याचे म्हटले.

तर विस्तार अधिकारी भोजराज पवार यांनी योजने बद्दल माहिती कार्यशाळेतून दिली. याप्रसंगी पंचायत समिती स्तरावर करणाऱ्या सरपंच ग्रामसेवक कार्य शिक्षीका, शिक्षक, ग्रामरोजगार सेवक आदिंचा सत्कार उपस्थितांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन लिना पवार यांनी केले.

**सौभाग्यवती सरपंचांचा आमदारांच्या हस्ते गौरव**

अचलपूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी कोल्हा ग्रामपंचायतीने जिल्हा स्तरावर पुरस्कार पटकावल्याने सरपंच अश्विनी प्रविण तायडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे अश्विनी तायडे या अचलपूरचे आमदार प्रविण तायडे याच्या सौभाग्यवती असून, सरपंच म्हणून त्यांच्या कार्यकाळात मिळालेल्या या यशामुळे त्यांचा सन्मान आमदारांच्या उपस्थितीत होण्याचा अनोखा योग जुळून आला..


## ड्रोन ड्रीम्सना उंच भरारी देण्यासाठी ड्रोन कार्यशाळा

### पोटे अभियांत्रिकीचा महाविद्यालयाचा उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे आयईईई पीआरपीसीइएम एसबी च्या पुढाकाराने आणि भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय यांच्या साहाय्याने २२ ते २६ सप्टेंबर दरम्यान प्रथमच ५ दिवसीय ड्रोन कार्यशाळा महाविद्यालयात आयोजित करण्यात येत आहे, ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाच्या नव्या क्षितिजांचे दरवाजे उघडणारी आहे.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञानावरील आधुनिक मार्गदर्शन, थेट प्रात्यक्षिके आणि हँड्स-ऑन ट्रेनिंग दिले जाणार असून यामुळे सहभागी विद्यार्थ्यांना ड्रोन डिझाइन, ऑपरेशन आणि इनोव्हेशनविषयी प्रत्यक्ष अनुभव




मिळेल. या ज्ञानामुळे त्यांच्या करिअरला नवे वळण मिळून संशोधन व स्टार्टअप्सच्या संधी निर्माण होतील. तसेच कार्यशाळा पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना सरकारी मान्यता असलेले प्रमाणपत्रही दिले जाणार आहे.या ऐतिहासिक उपक्रमाचे श्रेय पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे संचालक डॉ. पी. एम. खोडके, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ.मो. जुहैर , कौन्सेलर डॉ. ए. एस. तेलंग ,प्रा. एस. वी . काळमेघ , चेअरमन स्वराज धनाडे, व्हाइस चेअरमन अभय पुरी, पृथ्वीराज औटे आणि संपूर्ण टीम यांच्या अथक परिश्रमांना जाते.

## सततच्या पावसामुळे शेतीत साचले पाणी; सोयाबीन पडले पिवळे

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील सततच्या मुसळधार पावसामुळे शेतीची आरोग्य ढसाळलल्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे.सततच्या पावसामुळे शेतात सर्वत्र पावसाचे पाणी साचल्यामुळे सोयाबीन पिवळे पडले आहे. पिकांचे मूळ सडण्याच्या स्थितीत आहे शिवाय साचलेल्या पावसामुळे मुळांना पाहिजे तशी खेळती हवा मिळत नसल्यामुळे मुळांची वाढ खुंटली आहे. परिणामी भरघोस उत्पन्न देणारे सोयाबीन आता शेतकऱ्यांच्या उघड्या डोळ्यापुढे जळून खाक होत आहे.

तुरीच्या पिकासाठी सुद्धा हे वातावरण योग्य नसल्याचे शेतकरी वर्ग सांगत आहे. साधारणतः ह्या महिन्या मध्ये कापसाचा पहिला वेचा येण्याची सुरुवात असते. ज्याला 'सीतादयी' म्हटल्या जाते. पण सततच्या मुसळधार पावसामुळे कपाशीला लागणारे उष्ण वातावरण मिळत नसल्यामुळे कपाशींनी बोंड



पकडले नाहीत आणि काही कपाशींनी बोंड पकडले तर ते बोंड सडण्याच्या स्थितीत आहे. एकंदरीतच या पावसामुळे शेतीची परिस्थिती अंधारमय झाली आहे. बागायतदार शेतीचा विचार केला तर विदर्भात संत्रा पिक हे प्रमुख म्हणून घेतल्या जाते. पण सततच्या मुसळधार पावसामुळे मृग बहारात येणारा संत्रा सुद्धा धोक्यात आला आहे. शेतात पाणी साचल्यामुळे संत्रा तोड होऊ शकत नाही. संत्रा झाडांना पावसाचा मार लागल्याने मोठया प्रमाणात गळती लागली आहे. संत्र्याला बाजारपेठेत शेतकऱ्यांना जो भाव पाहिजे तो भाव नाही. अशा [illegible] परिस्थितीने शेतकरी जणू [illegible] सापडला आहे. दुसरीकडे मृगात होणाऱ्या संत्रा उत्पाद नातून होणाऱ्या नुकसानाची भर काढण्यासाठी आंबीया बहारात नुकसान भरपाई काढून घेऊ ह्या एकमेव आशेवर बसलेल्या शेतकऱ्यांसाठी आंबिया बहरातही संत्र्याचा बहार येण्यासाठी जे पोषक वातावरण पाहिजे तशा वातावरणाच्या अभावामुळे संत्राच्या भरघोस पिकाची आशा मावळली आहे.

आंबीया बहारा मधुन मिळणारे संत्रा उत्पादन शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणंणारे असते.अशा क्षणाला शेतकरी मुकतील की काय,अशी परिसस्थिती जणू तालुक्यात निर्माण झाली आहे.

अती पावसामुळे सर्वच पिके नुकसानाच्या पातळीवर आलेली आहेत. शेतामध्ये पाऊस पाणी असल्यामुळे संत्रा गळत आहे. व्यापारी तोडण्यास नकार देत आहे.सोयाबीनवर 'येलो मोझेक' हा रोग आलेला आहे.एकंदरीत शेतीच भविष्य यावर्षी अंधारात आहे.

**जयंत भैयासाहेब शेळके** (पाटील)
संत्रा उत्पादक शेतकरी, टेम्भूर्णी, ता. चांदूर रेल्वे.

---

सततच्या पावसामुळे शेतीची अवस्था अत्यंत बिकट आहे.यावर्षी ही शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडणार असे एकंदरीत चिन्ह आहे.शासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

**शेखर पुतळे**,कोरडवाहू शेतकरी
रा.शेंदुर्जना खुर्द ता.चांदुर रेल्वे

## संस्थात्मक सुशासन व नेतृत्व विकासाची आज गरज - कुलगुरू

### विद्यापीठातील एम.बी.ए. विभागाच्या राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन

**अमरावती/का.प्र.**

खऱ्या अर्थाने आज संस्थात्मक सुशासन आणि नेतृत्व विकासाची समाजाला गरज असून, विद्यार्थी हे करू शकतात, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाच्यावतीने व यूजीसी-मालवीय मिशन टिचर ट्रेनिंग सेंटर आणि महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमी, पुणे यांच्या संयुक्तविद्यमाने आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते झाले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

उच्च शिक्षण संस्था ज्ञानकेंद्रच नाहीत, तर नव्या पिढीतील नेतृत्व घडविण्याची प्रयोगशाळा आहेत. कार्यशाळेच्या माध्यमातून भविष्यात विद्यापीठाला व्यवस्थापन कौशल्य विकसित



करण्यासाठी ठोस दिशा मिळेल. कार्यशाळेचे समन्वयक व एम. बी. ए. विभागप्रमुख डॉ. दीपक चाचरकर यांनी स्वागतपर भाषणातून कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी, संशोधकांना संस्थात्मक शिस्त, प्रशासन व नेतृत्व याविषयी नव्या दृष्टीकोनाची जोड मिळेल असे सांगितले.'इन्स्टिटुशनल गव्हर्नन्स अँड लिडरशी बिल्डींग फ्युचर-रेडी मॅनेजर्स' या थिमवर ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली असून, १९ सप्टेंबर पर्यंत ही कार्यशाळा चालणार आहे.सूत्रसंचालन अतिथींचा परिचय प्रणिता गिरी हिने दिला, तर आभार डॉ. मुक्ता मंत्री यांनी मानले. कार्यशाळेत प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी सहभागी झाले आहेत. कार्यशाळेमध्ये इन्स्टिटुशनल गव्हर्नन्स, अ?केडमिक लिडरशीप, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन इन एज्युकेशन, इमर्जिंग चॅलेंजेस इन मॅनेजमेंट, सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स ई फ्युचर-रेडी मॅनेजमेंट स्किल्स अशा विविध विषयांवर नामवंत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेमुळे विद्यापीठ व व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक गुणवत्ता वाढेल आणि विद्यार्थी तसेच संशोधकांना जागतिक पातळीवरच्या व्यवस्थापनातील बदल व प्रवाह समजून घेण्याची संधी मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत अपात्र नावे समाविष्ट होऊ नयेत



### युवक काँग्रेसची मागणी

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र युवक काँग्रेसतर्फे समीर जवंजाळ यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी, अमरावती विभाग यांना निवेदन देण्यात आले. विधान परिषदेच्या २०२६ च्या द्विवार्षिक निवडणुकांसाठी शिक्षक मतदारसंघाची नवी मतदार यादी तयार होत असताना अपात्र व्यक्तींचा समावेश होऊ नये, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली.भारत निर्वाचन आयोगाने १ नोव्हेंबर २०२५ हा अर्हता दिनांक निश्चित करून ११ नोव्हेंबरपासून मतदार यादी तयार करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याचे कळविले आहे. या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसने काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार, केवळ मान्यताप्राप्त शाळा-महाविद्यालयांतील किमान तीन वर्षांची सेवा असलेले शिक्षकच पात्र ठरावेत, अशी अट स्पष्ट करण्यात यावी.समीर जवंजाळ यांनी सांगितले की, 'अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या २०२० च्या निवडणुकीत झालेली फेक नोंदणी ही अत्यंत चिंताजनक बाब होती. कॉन्व्हेंट शाळांतील शिक्षक, प्राथमिक शाळांतील शिक्षक, मान्यता नसलेल्या विनाअनुदानित शाळांतील कर्मचारी तसेच क्लार्क, प्रयोगशाळा परिचर यांसारख्या गैर-अध्यापन कर्मचाऱ्यांची नावेही यादीत समाविष्ट करण्यात आली होती. या सर्व प्रकारामागे काही शैक्षणिक संस्थांचे मालक व उद्योगपतींचा स्वार्थी हस्तक्षेप असल्याचे आरोप झाले. परिणामी खरे शिक्षक दुय्यम ठरले आणि शिक्षक मतदारसंघाच्या स्थापनेमागचा मूळ उद्देश कोलमडून पडला.त्यामुळे २०२६ च्या मतदार यादीत कोणतीही फेक नोंदणी होऊ नये, यासाठी काटेकोर पडताळणी करण्यात यावी, अशी मागणी युवक काँग्रेसने केली आहे. निवेदन देताना समीर जवंजाळ यांच्यासह वैभव देशमुख, अक्षय साबळे, कार्तिक देशमुख, सागर कलाने, आशिष यादव, चैतन्य गायकवाड, शुभम बांबल, संकेत भेंडे, कुणाल गावंडे आणि आकाश धुरटकर उपस्थित होते.

## संक्षिप्त

### हिंदी दिवस साजरा

**अमरावती**-पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल मध्ये हिंदी दिवस साजरा करण्यात आला. हिंदी दिवसाची सुरुवात स्वागत नृत्य सादर करून केली.हिंदी भाषेवर कविता सुद्धा प्रस्तुत केल्या. महानगरामध्ये व्यवहारांसाठी हिंदी भाषेचा वापर केला जातो ही भाषा



भारतापुरतीच मर्यादित नाही तर बाकी अनेक देशांमध्ये तिचा वापर केला जातो भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्या भाषा बोलल्या जातात त्यामध्ये हिंदी ही भाषा प्रामुख्याने असेल असे भाषा तज्ञांचे मत आहे.कार्यक्रमाला उपस्थित शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे, उपप्राचार्या सोनल निस्ताने, हिंदी शिक्षिका रूपाली जोशी, वैशाली अंबरते व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### भातकुली तालुक्यात १७ सप्टेंबरपासून सेवा पंधरवाडा

**टाकरखेडा संभू**-महाराष्ट्र शासन निर्णय २९ ऑगस्ट २०१५ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवाडा' भातकुली तालुक्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन आणि समारोप राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी होणार आहे. सेवा पंधरवाड्यात पहिल्या टप्प्यात तालुक्यातील सर्व पांदण व शिवरस्त्यांचे सर्वेक्षण व सीमांकन करण्यात येईल. १७ सप्टेंबर रोजी ग्रामसभेत या रस्त्यांच्या मंजुरीनंतर प्रत्यक्ष मोजणी व सीमांकनाची प्रक्रिया हाती घेतली जाईल. प्रत्येक रस्त्याला स्वतंत्र क्रमांक देण्यात येणार असून पुढील टप्प्यात हे सर्व रस्ते अतिक्रमणमुक्त केले जाणार आहेत. रस्त्यांशी संबंधित तंटे महसूल मंडळ स्तरावर आयोजित लोकअदालतीच्या माध्यमातून सामंजस्याने सोडविण्यात येणार आहेत.दुसऱ्या टप्प्यात 'सर्वांसाठी घरे' योजनेअंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील पात्र अतिक्रमणे नियमानुसार नियमित केली जातील. याशिवाय, तालुक्यातील ज्या गावांमध्ये स्मशानभूमी उपलब्ध नाही, अशा गावांसाठी जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.सेवा पंधरवड्यात महाराजस्व अभियानाचे मंडळ स्तरावर आयोजन करून नागरिकांना विविध योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. या उपक्रमाद्वारे ग्रामपातळीवरील पायाभूत सोयीसुविधा व महसूल विषयक अडचणी दूर करून जनतेस अधिक चांगल्या सेवांचा लाभ देण्याचा प्रयत्न आहे.भातकुली तालुक्यातील सर्व नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अजित कुमार येळे यांनी केले आहे.

### आणीबाणी मानधन योजनेमध्ये सुधारणा करण्यासाठी मुदत

**अमरावती**-आणीबाणीच्या काळात कारावास भोगला आहे, त्यांच्यासाठी मानधन योजनेमध्ये सुधारणा करण्यात येत आहे. त्यानुसार २४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.नवीन निर्णयानुसार, ज्या आणीबाणी धारकांनी यापूर्वी योजनेचा लाभ घेतलेला नाही, त्यांना नव्याने अर्ज सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. अर्जदारांनी १५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन पूरक पत्रासोबत असलेल्या परिशिष्ट 'ब' मधील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.तसेच आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती २ जानेवारी २०१८ पूर्वी हयात नसेल, तर त्यांच्या पश्चात हयात असलेले पती किंवा पत्नी मानधनासाठी अर्ज दाखल करू शकतात. आणीबाणी मानधन योजनेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २४ नोव्हेंबर २०२५ आहे.

### संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची सभा

**अमरावती**-संत ज्ञानेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अमरावतीची वार्षिक सर्वसाधारण आमसभा राजेंद्र टिंबे यांच्या अध्यक्षलेखानि संपन्न झाली.सभेला संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक विधळे, देशपांडे, वाजपे,दलाल, सौ.दलाल, सौ. पणजकर हे उपस्थित होते. सभेमध्ये विषय सुचीनुसार चर्चा करण्यात येवून प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. सभेचे सुत्र संचालक अंजली गलगलीकर यांनी केले.

### पोहरा पूर्णा येथे विपश्यना शिबीर

**पूर्णानगर**-धम्म विपश्यना केंद्र, लूंबुनी द्वारा तसेच अनाथ पिंडक परिवार महासंघ व राजमाता जिजाऊ बहुउद्धेशिय संस्था, पूर्णानगर यांच्या संयुक्त विद्यमाने प. पु.गोयंका गुरुजी यांच्या पुण्यस्थिती निमित्त एक दिवसीय विपश्यना शिबिराचे आयोजन अनाथ पिंडक बुद्ध विहार पोहरा पूर्णा (आसेगाव पूर्णा ) येथे केले असून हे शिबीर ४ ऑक्टोबरला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. या शिबिरात ज्या साधकांनी याआगोदर दहा दिवसीय विपश्यना शिबीर केले असेल यांना प्रवेश मिळणार असून यात सहभाग घेणाऱ्या साधकांची नोंदणी सुरु झाली आहे.

### जाहीरनामा

**नायब तहसिलदार महसूल अमरावती यांचे न्यायालय, अमरावती**

रा.मा.क्र.आर.टी.एस-६४/कुंड सर्जापूर/ /२०२४-२०२५
**क्रमांकः-म.सहा./प्रस्तु-४/कावि-८४९/२०२५ दि.१५/९/२०२५**

सदर्हु जाहीरनाम्यानुसार सर्व संबंधितांना जाहिरपणे सुचित करण्यात येते की, **अर्जदार श्री. विजयराव रूपरावजी मानकर रा. आकोट ता.जि. अकोला** यांनी मौजा कुंड सर्जापूर येथील भुमापन क्रमांक २८/१ भोगवटदार वर्ग-१ क्षेत्रफळ १ हे.०९ आर मृत्यूपत्रानुसार फेरफार घेण्याबाबत अर्ज या कार्यालयात दाखल केला आहे.

करीता वरील प्रकरणात कुणाची काही हरकत वा आक्षेप असल्यास त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत आपले आक्षेप अर्ज स्वतः वारसामार्फत किंवा वकीलामार्फत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावे. त्यानंतर येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**नायब तहसिलदार महसुल**
अमरावती

### जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार **नामे सुनील रामदास निंघोट** यांचे वतीने सादर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णनः मौजे-कुरुम, शेत सर्वे क्रं. 217 (217/A), प्लॉट क्रं. 9, ता. मुर्तीजापूर जिल्हा. अकोला.**

सदर मिळकत माझे पक्षकार **नामे सुनील रामदास निंघोट.** यांच्या मालकीचे आहे. तदनंतर, त्यांनी **JMFHLL JM Financial Home Loans Limited. BR. AMRAVATI.** येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदीखत दि. २५/०१/२००८ रोजीचे दस्त क्र. ११८ सदर मूळ दस्त गहाळ झालेले आहे.** तसेच सदर दस्त कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था/ राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

आपला
**ॲड.रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती
मो. नं. ९८२३६९८७४५

## टि.ई.टी.संदर्भात शिक्षकांची सेवा सातत्य टिकविण्यात यावी

### महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेची मागणी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदन

**अंजनगाव बारी** -सर्वोच्च न्यायालयाने टी.ई.टी. संदर्भात निकाल दिला की प्राथमिक, माध्यमिक अनुदानित तसेच विनाअनुदानित इयत्ता १ ली ते ८ वी च्या शिक्षकांना येत्या दोन वर्षात टी.ई.टी.परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य केले. त्यामुळे सेवानिवृतीला आलेले तसेच २०१० पूर्वी सेवेत असलेल्या शिक्षकांना सेवा गमवावी तर लागणार नाही ना यामुळे सर्व शिक्षक चिंताग्रस्त आहेत.महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना अध्यक्ष आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी याविषयी सखोल अभ्यास आहे व प्रदीर्घ अनुभव आहे. यासर्व शिक्षकांच्या मनातील सेवा सातत्य बाबत भीती लक्षात घेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते व खासदार अनिल देसाई व लोकसभा व राज्यसभेचे महाराष्ट्रातील सर्व खासदारांना तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शालेय शिक्षण मंत्री नामदार दादाजी भुसे यांना पत्रातून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय व आर.टी.ई. कायदा २००९ त्यातील कलम २३ व महाराष्ट्र शासनाने १ एप्रिल २०१० रोजी केंद्र शासनाचा शिक्षण हक्क कायदा अंमलात आणला.



# बेपत्ता मुलाचा रक्ताने माखलेला मृतदेह शेततलावात आढळला



## हत्येचा संशय; पोलिसांचा तपास सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-**
घरून दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या अकरा वर्षीय ध्रुप विजय राठोड याचा मृतदेह मंगळवारीं १६ सप्टेंबर रोजी दुपारी वीरगव्हाण येथील एका शेततलावात नग्न अवस्थेत व रक्ताने माखलेला आढळून आला. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण गावात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला



आहे. प्राथमिक तपासात ही हत्या असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

ध्रुप राठोड हा वीरगव्हाण येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेतील पाचवीत शिक्षण घेत होता. रविवारी (१४ सप्टेंबर) सुट्टी असल्याने तो सकाळी ११ वाजता खेळण्यासाठी घरातून बाहेर पडला होता. मात्र तो सायंकाळपर्यंत घरी न परतल्याने कुटुंबीयांनी त्याचा सर्वत्र शोध सुरू केला. बस स्थानक, रेल्वे स्टेशन, मंदिर परिसर यासह अनेक ठिकाणी शोध घेऊनही (पान २ वर)

# धामण सापाच्या अंड्यातून सर्पमित्राने काढली पिल्ले!

### - ७० दिवस घेतली विशेष काळजी
### -तिवसा तालुक्यात पहिलाच प्रयोग



**तिवसा/प्रतिनिधीः-**
गेल्या ७० दिवसांपूर्वी रेस्क्यू केलेल्या धामण जातीच्या सापाने दिलेल्या अंड्यातून सर्पमित्राने पिल्लं बाहेर काढण्याचा यशस्वी प्रयोग केला. तिवसा तालुक्यातील अनकवाडी येथील सर्पमित्राने केलेल्या यशस्वी कामगीरीचे कौतुक होत आहे. ही पिल्लं बाहेर काढण्यासाठी सर्पमित्राने जवळपास ७० दिवस



मेहनत घेतली,हे विशेष!

कावली वसाड येथे समीर नेवारे या सर्पमित्राने धामण जातीच्या सापाचे रेस्क्यू केले होते. मात्र तेव्हा सायंकाळ झाल्याने सापाला (पान २ वर)

# लोतवाडा रस्त्यासाठी भिमराव कुऱ्हाडे यांचे आमरण उपोषण

**खल्लार/प्रतिनिधीः-**
दर्यापूर तालुक्यातील लोतवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी भिमराव विठ्ठलराव कुऱ्हाडे यांनी आज (दि.१६) पासून लोतवाडा ते कुटासा मुंडगाव शेतरस्त्यासाठी जलत्याग व आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

या शेत रस्त्यावर काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण केले असल्याने शेत रस्ता अरुंद झाला. त्याचे मोजमाप करुन हद्द कायम करण्यात यावी, तो



मोकळा करण्यात यावा याबाबतचे पत्र भिमराव कुऱ्हाडे यांनी खासदार, आमदार, जिल्हाधिकारी तहसिलदार, विभागीय आयुक्त यांना २५ (पान २ वर)


### चिखलात आंदोलन-

भिमराव कुऱ्हाडे उपोषणास अशा ठिकाणी बसले आहेत की त्या ठिकाणी जाणे सुद्धा कठीण आहे. पावसात शेतरस्त्यावर चिखलात, उपोषण सुरु केले असल्याने आता अधिकारी काय निर्णय घेतात त्याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

# विद्युत अभियंता सोबत अरेरावीची भाषा

### अंगावर जाणे आले अंगलट -एकावर गुन्हा दाखल

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी शहरातील भालदापूर येथील वीज मीटर ग्राहक खान मुस्तका खान मुस्तपरवीन यांनी महावितरण विभागाचे सहायक अभियंता अजय चौधरी यांच्याशी अरेरावी ची भाषा व त्यांच्या शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी भादंवि ३५३ नुसार अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुजीब खान मुस्तका खान राहणार भालदरपुरा यांचा वीज पुरवठा काही दिवसापूर्वी




महावितरण विभागाने तात्पुरता खंडित करण्यात केला होता. त्याकरिता महावितरण कंपनीच्या कर्मचारी माया कुबडे वरिष्ठ तंत्रज्ञ वीज बिल वसुली व तात्पुरत्या खंडित केलेल्या विविध पुरवठा याची तपासणी करिता गेल्या असता वीज ग्राहक मुजीब खान यांनी दमदाटी करून तसेच अरेरावीची भाषा वापरल्याने त्या महिला कर्मचाऱ्यांनी सहाय्यक विद्युत अभियंता अजय विलास चौधरी यांना घटनास्थळी बोलावले. सदर विषयाची माहिती दिल्यावर त्यांनी वीज (पान २ वर)

### वीज चोरीसाठी डिश केबलचा वापर

भालदारपुरा येथील वीज ग्राहक मुजीब खान यांनी भन्नाट शक्कल लढून बाजूच्या घरातून वीज चोरीसाठी डिश केबलचा वापर केल्याने अंजनगाव शहरात चर्चेचा विषय रंगला आहे. अशा भन्नाट कल्पनेने वीज चोरी पकडण्यासाठी महावितरण कंपनीला मोठया आव्हानाला सामोरे जावे लागत आहे.

# टाकरखेडा संभू परिसरात ढगफुटी सदृश पाऊस



### -गावात पाणी शिरले, शेती जलमय,
### आष्टी ते टाकरखेडा संभू मार्गावर वाहतूक ठप्प

**टाकरखेडा संभू/प्रतिनिधीः-**
भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभु येथे मंगळवारी दुपारी अवकाळी पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला. दुपारी एक ते दोन वाजेदरम्यान तब्बल एक तास कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे गावात पाणी शिरून घरं, शेती आणि रस्ते जलमय झाले. या पावसामुळे आष्टी ते टाकरखेडा संभु मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. त्यामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली. जिल्हा परिषद शाळा येथून जाणारा जळका मार्ग देखील कमरेपर्यंत पाण्याखाली गेला होता, (पान २ वर)

### अकोला शहरातील अत्याचार प्रकरण

# भाजपा कार्यकर्त्यांकडून निषेध, महिला सुरक्षेची मागणी

**अचलपूर/प्रतिनिधीः-**
अकोल्यात गणेश विसर्जनाच्या दिवशी एका हिंदू मुलीवर चाकू दाखवून बलात्कार झाल्याच्या प्रकरणानंतर भारतीय जनता पार्टी अचलपूर शहर व ग्रामीण शाखेमार्फत निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी अचलपूर विधानसभेचे आमदार प्रवीण तायडे, शहरध्यक्ष कुंदन यादव यांच्या नेतृत्वात उपविभागीय राजस्व अधिकारी



बळवंत अरखराव यांना निवेदन देण्यात आले.

२८ वर्षीय आरोपीने घरात एकटी असलेल्या मुलीवर अत्याचार केला.अकोला पोलिसांनी चार दिवसात आरोपीला ताब्यात घेतले असले तरी न्यायालयीन प्रक्रिया लांबेल, त्यामुळे आरोपीला कठोर शिक्षा मिळावी अशी मागणी करण्यात आली. निवेदनात पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली गेली असून सार्वजनिक स्थळी महिला सुरक्षेसाठी पुढील सूचना दिल्या आहेत.

नवरात्र उत्सवात अचलपूर परतवाडयातील गरबा नृत्याच्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त लावावा, संशयास्पद व्यक्तींचे ओळखपत्र तपासून योग्य ती कारवाई करावी. कन्या शाळेजवळ फिरणाऱ्या संशयित पुरुषांवर योग्य कारवाई (पान २ वर)

# गांजा तस्करीवर चांदूर रेल्वे पोलिसांची कारवाई

### ८ किलो गांजा जप्त, एकाला अटक



**अमरावती/प्रतिनिधीः-**
जिल्ह्यात गांजाची तस्करी धडाक्यात सुरू असताना चांदूर रेल्वे पोलिसांनी एकाच कारवाईत तब्बल ८ किलो गांजा जप्त करून तस्कराला गजाआड केले आहे. या अंमली पदार्थाची किंमत अंदाजे २ लाख रुपये असून आरोपीचे नाव संजय बापुराव (पान २ वर)

# १०० ग्रॅमपेक्षा अधिक अमली पदार्थ तस्करीची

### चौकशी अँटीनार्कोटिक्स विभाग करणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात वाढत्या अमली पदार्थांच्या तस्करीवर आळा घालण्यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी गतीने पावले उचलली आहेत. आता १०० ग्रॅमपेक्षा जास्त प्रमाणात आढळणाऱ्या एमडी ड्रग्ज, चरस, गांजा यांसारख्या अमली पदार्थांच्या प्रकरणांचा तपास अँटीनार्कोटिक्स सेल व गुन्हा शाखा करतील.

शहरात गेल्या काही महिन्यांपासून गुपचूप मार्गाने मोठ्या प्रमाणात ड्रग्जची खेप आणली जात असल्याचे समोर आले होते. या अवैध धंद्यामुळे अनेक तरुण व्यसनाधीनतेच्या गर्तेत सापडत आहेत. या चिंताजनक परिस्थितीवर अंकुश आणण्यासाठी सीपी चावरिया यांनी सर्वच संबंधित विभागांना कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. अलीकडेच नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने (पान २ वर)

# पलाश लाईन परिसरात ५.५० लाखांची चोरी

### गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-**
गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या पलाश लाईन भागात चोरट्यांनी एका घराला लक्ष्य करून तब्बल ५ लाख ५५ हजार ३१६ रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना १५ सप्टेंबर रोजी घडली असून, घरमालक गौरव भीमराव उमक (वय ४०, रा. खोडके लाईन, गाडगेनगर, अमरावती) यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला



आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ सप्टेंबर रोजी गौरव उमक यांनी घरातील बेडरूममधील आलमारी उघडून अंगठी काढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आलमारीतील (पान २ वर)

# विजय लोहकरे झाले अंजनगाव नगर परिषदचे नवे मुख्याधिकारी

**धारणी** – धारणी व चिखलदरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहिलेले विजय लोहकरे यांची प्रशासनिक बदली करण्यात आली असून, त्यांची अंजनगाव सुर्जी नगर परिषदेचे नवे मुख्याधिकारी तसेच प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आज त्यांनी अंजनगाव नगर परिषदेचा कार्यभार विधिवत स्वीकारला.

लोहकरे यांनी धारणी व चिखलदरा येथे आपल्या कार्यकाळात प्रामाणिक व विकासमुखी कार्यशैलीतून वेगळी



छाप निर्माण केली. कार्यशैलीतून (पान २ वर)

